SHERLOCK HOLMES 2

शेरलॉक होम्स-२

वृषाली जोशी

शेरलॉक होम्स-२

मूळ इंग्लीश लेखक – ऑर्थर कॉनन डॉयल

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी
सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.
दूरभाष ९९२१७४६२४५

शेरलॉक होम्स-२

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

शेरलॉक होम्स-२

लेखक : ऑर्थर कॉनन डॉयल

अनुवादक : वृषाली जोशी
चलभाष : ९९२१७४६२४५
इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ७ जून २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अनुवादिकेची ओळख

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून व सहा पुस्तके ई साहित्यतर्फे प्रसिद्ध

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन

संशोधन प्रकल्पात सहभाग

कॉलेजमध्ये प्राचार्यपद

सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके

सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा,

कविता करण्याचा

व शब्दकोडी बनवण्याचा छंद

संपर्क वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९

चलभाष ९९२१७४६२४५



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dorian_gray_oscar_wilde_vrishali_joshi.pdf



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sherlock_holmes_stories_1a_vrishali_joshi.pdf

वृषाली जोशी यांची ई साहित्यने प्रकाशित केलेली आजवरची पुस्तके.

काही काळासाठी विनामूल्य



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/saki_vrishali_joshi.pdf



http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/shakespere_stories_vrishali_joshi.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/mejavaanipurvi_and_other_stories_somerset_maughm_vrishali_joshi.pdf

शेरलॉक होम्सविषयी

ब्रिटीश लेखक सर आर्थर कॉनन डॉयल, यांच्या सिद्धहस्त लेखणीने निर्माण केलेले, शेरलॉक होम्स हे खासगी गुप्तहेराचे कपोलकल्पित पात्र आहे. निरीक्षणातील अचूकता, गुन्हेगारी शास्त्रातील जाणकारी व तर्कशास्त्रावरील हुकमत, ही त्याची गुन्हा अन्वेषणातील बलस्थाने आहेत. शेरलॉक होम्स हा, सतत तेवीस वर्षे गुप्तहेराचे काम करतो आहे. सतरा वर्षे त्याचा मदतनीस, डॉक्टर जॉन वॉटसन हा त्याच्या बरोबर काम करत असून, वॉटसनच्या लग्नापूर्वी व बायको वारल्यावर, तो आणि शेरलॉक हे दोघेही, २२१, ब, बेकर रस्ता येथे, मिसेस हडसन या मालकीणबाईंकडील सदनिकेत रहात असल्याचे दाखवले आहे. बहुतेक सगळ्या गोष्टी वॉटसनच्या तोंडून कथन केल्या गेल्या आहेत.

A Study In The Scarlet या आर्थर कॉनन डॉयल यांच्या पहिल्या पुस्तकातून हे पात्र उदयास आले व दिवसेदिवस त्याची लोकप्रियता वाढत गेली. काहीजण तर हे कल्पित पात्र नसून खराच माणूस असल्याचे समजू लागले व तो २२१, ब, बेकर रस्ता, येथे खरोखरंच रहातो, असे मानू लागले. रेडिओ व दूरदर्शनवरील नाटके, सिनेमे, शिवाय व्हिडीओ गेम्स, अशी सर्व ठिकाणे; सुमारे शंभर वर्षे, शेरलॉक होम्सने गाजवून सोडली. लंडनमध्ये शेरलॉक होम्स वस्तुसंग्रहालय आहे. सर आर्थर कॉनन डॉयल याच्या जन्मगावी, म्हणजे एडिंबरो येथील पिकार्डो येथे शेरलॉक होम्सचा पुतळाही आहे.

पहिला रहस्यकथा लेखक ॲलन पो याच्या गुप्तहेराची थोडीशी छाप, शेरलॉक होम्समध्ये भासत असली तरी, जोसेफ बेल नावाचा सर्जन, फ्रान्सिस टॅन्की स्मिथ हा पोलीस व सर हेन्री लिटील जॉन हा वैद्यकीय वकील; या खऱ्याखुऱ्या लोकांची छटाही, शेरलॉक या पात्रात कॉननने रंगवलेली दिसते. मॅक्समिलन हेलर हे फ्रेंच लेखक हेन्री कॉव्हेन निर्मित पात्रही शेरलॉक होम्स रंगवण्यासाठी त्याच्याकडून वापरले गेल्यासारखे वाटते. तरीही शेरलॉक होम्स हे अत्यंत गाजलेले, एकमेवाद्वितीय व्यक्तीचित्र असल्याचे मान्य करावेच लागेल.

प्रस्तावना

पानागणिक उत्सुकता वाढवणाऱ्या रहस्यकथा वाचायला कोणाला आवडत नाहीत? त्याच कारणाने मीदेखील त्या वाचत गेले व मराठी लोकांसाठी त्या अनुवादित कराव्या, असे वाटले. यास्तव हा प्रपंच. या पूर्वी सहा कथांचा संग्रह प्रकाशित केला. त्याला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. म्हणून हा सहा कथांचा दुसरा संग्रह!

डॉ. वृषाली जोशी

अर्पणपत्रिका

रहस्ये उकलणाऱ्या शेरलॉक होम्सच्या चातुर्यास

कथानुक्रम पृष्ठ क्र.

अविवाहित उमराव १२

तीन गॅरीडेब ५०

तीन गेबल्स ७८

नमुनेदार अशील १०९

बुरखाधारी भाडेकरू १५३

रत्नजडित मुकुट १७३

अविवाहित उमराव

उमराव सेंट सायमनचे लग्न व त्याची उत्सुकता वाढवणारी इतिश्री, हा विषय समाजाच्या उच्च वर्तुळात चर्चिला जाऊन, जुना झाला होता. नवनवीन प्रकरणांनी त्याला ग्रहण लावले व त्या प्रकरणांच्या मनाला भावणाऱ्या गोष्टीनी, या चार वर्षांपूर्वीच्या सायमनच्या लग्नाच्या नाटकाच्या गावगप्पांना, दूर सारले. तरीही मला असा विश्वास ठेवायचे कारण आहे की, सगळी हकीगत लोकांपर्यंत कधी पोचलीच नाही. माझा मित्र शेरलॉक होम्स, याचा हे प्रकरण तडीस नेण्यात, मोलाचा वाटा होता. त्यामुळे या उल्लेखनीय घटनेचे चित्रण केल्याशिवाय, त्याच्याबद्दलच्या आठवणी पूर्ण होणार नाहीत.

मी बेकर रस्त्यावरील खोलीत होम्स बरोबर रहात होतो, त्या दिवसात व माझ्या स्वतःच्या लग्नापूर्वी, काही आठवडे, तो दुपारची चक्कर मारून परत आला. टेबलावर एक पत्र पडले होते. एकदम पावसाला सुरवात झाली होती व मोसमी वारे वाहू लागले होते, त्यामुळे मी दिवसभर घरातच असे. अफगाण मोहिमेत, माझ्या हाताला एक लहानशी बंदुकीची गोळी लागली होती. संथ चिवटपणे, त्याची खूण मी अजून वागवत होतो. मी एका आरामखुर्चीत, दुसऱ्या एका खुर्चीवर पाय ठेवून बसलो होतो. माझ्याभोवती, वर्तमानपत्रांचा खच पडला होता. शेवटी मी दमून, तो ढीग बाजूला सारला. टेबलावर ठेवलेल्या पाकीटावरील, भव्य तुऱ्यासारखी दिसणारी दोन जोडलेली अक्षरांची सही, बघू लागलो व सुस्तपणे विचार करत राहीलो, की हा माझ्या मित्राचा अशील असलेला उमराव कोण बरं असेल?

तो आत आल्यावर मी बोललो, "हे एक नटवे पत्र इथे पडले आहे. तुझ्या सकाळच्या डाकेत, मला आठवते त्याप्रमाणे, एका माशांच्या दलालाचे व एका समुद्रातून उतरणाऱ्या मालावर देखरेख करणाऱ्याचे पत्र आहे."

तो हसत उत्तरला, "हो. मला येणाऱ्या पत्रांमध्ये, नक्कीच विविधतेचा गोडवा असतो आणि त्यातील नम्र असणारी पत्रे, जास्त रुचीपूर्ण असतात. दुसऱ्याला कंटाळा आणणारे, खोटे बोलणारे, नकोशा अशा सामाजिक वॉरंटसंबंधीचे काम असलेले, असे कोणीतरी हे लोक दिसतात."

त्याने ती पत्रे फोडून वाचली.

"अरेरे, हे असेच काहीतरी बेकार वाटते आहे."

"काही सामाजिक भानगडी का?"

“नाही. अगदी व्यावसायिक.”

“आणि उमराव अशीलाकडून, आलेले?”

“इंग्लंडमधील एका सर्वोत्तम घराण्यातील.”

माझ्या प्रिय मित्रा, अभिनंदन.”

“वॉटसन, मी तुला खात्रीने सांगतो, छाप पाडण्यासाठी म्हणून नव्हे, की केसमधील रुचीपूर्णतेपेक्षा, अशीलाचा सामाजिक दर्जा, मी महत्वाचा मानत नाही. पण तरीही असे शक्य आहे, की या नवीन शोधमोहिमेत, रुचीपूर्णतादेखील नसेल. तू जागरुकतेने व काळजीपूर्वक, ही वर्तमानपत्रे वाचतो आहेस, नाही का?”

मी कोपऱ्यात पडलेल्या मोठ्या ढीगाकडे, खंतपूर्वक बघत म्हणालो, “तसेच दिसते आहे. मला करायला दुसरे काहीच नाही.”

“तुला मला मदत करायला मिळून, तू कदाचित भाग्यवान ठरशील. मी गुन्हेगारी बातम्या व काळजीचे रकाने सोडून, काही वाचत नाही. काळजीची/दुःखाची पत्रे, नेहमीच काही करायला सांगत असतात. पण तू जर अलीकडील घटनांचा मागोवा घेतला असशील, तर तू नक्कीच उमराव सेंट सायमन व त्याच्या लग्नाबद्दल वाचले असशील.”

“हो. हो. अगदी खूप आवडीने.”

‘हे चांगले आहे. मी हातात धरलेले पत्र, उमराव सेंट सायमनकडून आलेले आहे. मी तुला ते वाचून दाखवतो. पण त्याच्या बदल्यात तू मला, याबद्दल

वर्तमानपत्रांमध्ये कायकाय आले आहे, हे सांगितले पाहिजेस. तो उमराव असे म्हणतो आहेः

माझ्या प्रिय शेरलॉक होम्स, उमराव बॅंकवॉटर मला असे सांगतो आहे की, मी तुमच्या निर्णयावर व खासगीपणा जपण्याच्या कारवाईवर, खोल विश्वास दाखवावा. म्हणून मी तुम्हाला भेटून, माझ्या लग्नासंबंधात घडलेल्या तापदायक घटनेविषयी, तुमचा सल्ला घ्यायला येणार आहे. यासंबंधात स्कॉटलंड यार्डचा लेस्ट्रेड, आधीच तपास करतो आहे. पण तुमची मदत घेण्यास, त्याचा विरोध नाही. उलट ते उपयोगी ठरेल, असे त्यास वाटते आहे. मी दुपारी चार वाजता येतो. जर तुम्हाला त्यावेळी दुसरे काही काम असेल, तर ते तुम्ही पुढे ढकलाल, अशी मी आशा करतो. कारण हे खूपच महत्वाचे आहे.

तुमचा विश्वासू,

सेंट सायमन

"हे ग्रॉसव्हेनॉर मॅंशनमधून, पिसांनी लिहिलेले आहे. दुर्दैवाने, त्या उमरावाच्या उजव्या हाताच्या करंगळीला शाईचा डाग पडलेले लक्षात येत आहे." होम्सने पत्र बंद करताना शेरेबाजी केली.

"तो चार म्हणतो आहे. आत्ता तीन वाजले आहेत. तासाभरात तो येईलच."

"मग या विषयाचा गाभा जाणून घेण्यासाठी, मला तुझी मदत घ्यायला, जेमतेम वेळ आहे. त्या वर्तमानपत्रांमध्ये त्यासंबंधी आलेला मजकूर, तारखेनुसार लाऊन ठेव. तोपर्यंत मी आपला अशील कोण आहे, याची झलक बघतो." संदर्भ पुस्तकांमधील लाल आवरण असलेले पुस्तक उघडून, त्यातील ते पान सरळ करून

गुडघ्यांवर धरत, तो बोलला, "इथे त्याच्यासंबंधी लिहिले आहे. उमराव रॉबर्ट वॉलशिंगहॅम डे वेरे सेंट सायमन, ड्युक बालमोरलचा दुसरा मुलगा. ड्युकच्या शर्टावर तीन काळ्या पट्ट्या असलेले सन्मानचिन्ह दिसते आहे. सेंट सायमन १८४६ मध्ये, जन्मला. तो आता एक्केचाळीस वर्षांचा आहे, म्हणजे लग्नासाठी जरा जास्त वय आहे. तो पूर्वीच्या वसाहती प्रशासनातील, उपसचिव होता. त्याचे वडील, ड्युक, एके काळी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयात सचिव होते. इंग्लिश राजघराण्याचे रक्त, वंशपरंपरेने त्यांच्यात वहात आहे. हं. यात लक्ष वेधून घेईल, असे विशेष काही नाही. मला वाटते, अजून काहीतरी भरघोस माहितीसाठी, मी आता तुझ्याकडे वळावे."

मी म्हणालो, "मला जे हवे आहे ते सापडवायला, फारसा त्रास नाही. कारण, घटना अलीकडील आहे. आणि ती मला उल्लेखनीय अशी वाटते आहे. तरीही तुझ्यापुढे तिचे वर्णन करायला, मी थोडा घाबरतो आहे. कारण मला माहिती आहे की, तुला ही केस मिळाली आहे आणि तुला त्यात दुसऱ्यानी नाक खुपसलेले आवडत नाही."

"ओहो. म्हणजे ग्रॉसव्हेनॉर चौकातील, फर्निचरच्या गाडीची समस्या म्हणतो आहेस का? ती आता पूर्णपणे सुटली आहे. तरीही सुरवातीपासून हे खरेच आहे की, -- पण आधी तू मला, वर्तमानपत्रांमध्ये त्यासंबंधी आलेल्या मजकूराबद्दल सांग."

मी शोधू शकलेली, ही पहिली नोटीस आहे. सकाळच्या वर्तमानपत्रातील, खासगी रकान्यात ती आहे. आणि तारखा, काही आठवड्यांपूर्वीच्या आहेत. त्यात म्हटले आहे, 'उमराव सेंट सायमन, ड्युक बालमोरल यांचा दुसरा मुलगा व मिस हॅटी डोरान, ॲलॉयसीस डोरान सॅनफ्रॅनसिस्को, कॅलिफोर्निया, अमेरिका यांची एकुलती

एक मुलगी, यांचे लग्न ठरले आहे. आणि जर अफवा खरी असेल, तर ते येत्या काही दिवसात होणार आहे.' एवढेच.

"थोडक्यात व नेमके." त्याचे लांब व बारीक पाय शेकोटीजवळ ताणत, होम्सने शेरा मारला.

त्याच आठवड्यातील एका सामाजिक वर्तमानपत्रात पण, एक परिच्छेद छापून आला होता. तो असा होताः

लग्नाच्या बाजारात, लवकरच संरक्षणासाठी मागणी येईल. कारण आत्ताच्या मुक्त देवाणघेवाण पद्धतीमुळे, आपल्याकडच्या इंग्लंडमधील मुलींची लग्ने होणे, अवघड झाले आहे. ग्रेट ब्रिटनमधील उमरावांची घरांचे व्यवस्थापन, एकामागून एक अटलांटिक महासागराच्या पलीकडील उच्चभ्रू मंडळींच्या हातात जात आहे. मागील आठवड्यात एक महत्वाची अशी भर पडली आहे, की या नवीन भूमीतील सुंदर मुलींनी, आपल्या येथील मुलाना लग्नासाठी फशी पाडले आहे. उमराव सेंट सायमनने गेली वीस वर्षे, त्याच्यावरील मदनबाणांचे शरसंधान रोखून ठेवले होते. पण आता त्याने, मिस हॅटी डोरान, या कॅलिफोर्नियाच्या लक्षाधीशाच्या सुंदर मुलीशी, त्याचे लग्न नक्की केले आहे.

त्याने आता ठामपणे जाहीर केले आहे, की लवकरच त्याचे लग्न, मिस हॅटी डोरान, कॅलिफोर्निया, येथील लक्षाधीशाच्या एकुलत्या एक, लक्षवेधक मुलीबरोबर होणार आहे. डौलदार तनु व सुंदर चेहरा, यामुळे तिने वेस्टबरी घरातील मंडळींचे लक्ष वेधून घेतले आहे. नुकतेच असे समजले आहे की तिचा हुंडा सहा आकड्याच्या वर असणार आहे. भविष्यात, तो वाढायची शक्यता आहे. हे उघड गुपित आहे, की

बालमोरलचा ड्युक गेले काही वर्षे, त्याच्या मुलाचे लग्न जमवण्याचा प्रयत्न करतो आहे. उमराव सायमनची बर्चमूरची छोटी इस्टेट सोडली, तर स्वतःची अशी खासगी मालमत्ता नाही. त्यामुळे हे स्पष्ट आहे की कॅलिफोर्नियाची वारस असलेली हॅटी ही काही लग्नामुळे लाभार्थी ठरणार नाही. पण लग्नामुळे तिला प्रजासत्ताक अमेरिकेतून, ब्रिटीश राजघराण्यात येणे, सहजसोपे होईल."

होम्सने जांभई देत विचारले, "आणखी काही?"

"हो तर. अजून खूप आहे. सकाळच्या वर्तमानपत्रात अजून एक बातमी आहे. त्यात असे म्हटले आहे की हे लग्न अगदी शांतपणे सेंट जॉर्ज येथील हॅनोव्हर चौकात होईल. फक्त पाच सहा जवळच्या मित्रांना, आमंत्रण असेल आणि मेजवानी, ॲलॉयसीस डोरानने घेतलेल्या लँकास्टर गेट येथे होईल. दोन दिवसांनी -- म्हणजे बुधवारी छोटेसे निवेदन होईल, की लग्न झाले आहे आणि मधुचंद्र, उमराव बॅकवॉटरच्या घरी पीटर्सफिल्ड येथे होईल. या सर्व बातम्या नवऱ्या मुलीच्या पलायनाच्या आधीच्या आहेत."

होम्सने चमकून विचारले, "कशाच्या पूर्वी?"

"ती बाई नाहीशी होण्यापूर्वी."

"ती केव्हा नाहीशी झाली?"

"लग्नाच्या दिवशी सकाळी, न्याहारीनंतर."

"खरे की काय? हे मला वाटले होते, त्यापेक्षा जास्त रुचीपूर्ण आहे. फारच नाटकी आहे."

"मलाही हे नेहमीपेक्षा, काहीच्या काहीच, वेगळे वाटले."

"या ललना नेहमीच समारंभापूर्वी किंवा कधीकधी मधुचंद्राच्या काळात, अदृष्य होतात. पण इतक्या लवकर, लग्नाच्या दिवशीच त्यांनी गायब होणे, याची मी कल्पनाही करू शकत नाही. मला याबद्दल जास्त कळले, तर बरे."

"मी तुला ताकीद देतो की हे कळणे, फार अपूर्ण असते.'

"कदाचित आपण, ती माहिती पूर्ण करू शकू." '

"ती तशी अपूर्णच असते. काल सकाळच्या वर्तमानपत्रात, याबद्दल एक लेख आला आहे. तो मी तुला, वाचून दाखवतो. त्याचे शीर्षक असे आहेः 'एका उत्सवी लग्नात जोडप्यापैकी एकानेच असणे.' व पुढील मजकूरः

विचित्र व दुःखदायक अशा लग्नासंबंधीच्या प्रसंगामुळे, उमराव रॉबर्ट सेंट सायमनचे कुटुंब, मोठ्या काळजीत पडले आहे. कालच्या वर्तमानपत्रात जाहीर केल्याप्रमाणे, समारंभ काल सकाळी झाला. पण आत्ता अशी काहीतरी, विचित्र अफवा पसरली आहे व त्याबद्दल खात्री करणे, शक्य आहे. सायमनच्या मित्रांनी या प्रकरणाची चर्चा होऊ नये, म्हणून प्रयत्न केले, पण त्या घटनेने सामान्य लोकांचे इतके लक्ष वेधून घेतले आहे, की तसे होऊ शकत नाही आहे. सेंट जॉर्ज येथील हॅनोव्हर चौक, ही एक शांत जागा आहे. मुलीचे वडील ॲलॉयसीस डोरान, बालमोरलचे उमराव बॅकवॉटर, उमराव युस्टास, लेडी क्लारा सेंट सायमन (नवऱ्या मुलाचे लहान भाऊ बहीण) व लेडी अलीसिया व्हिटीग्टन; ही सगळी मंडळी नंतर लँकास्टर गेट येथे मिस्टर ॲलॉयसीस डोरान यांच्या घरी गेली, तिथे न्याहारी चालू होती. असे वाटते आहे, की जिच्या नावाची खात्री केली गेली नाही व लग्नाच्या मेजवानीनंतर जिने हर

प्रकारे घरात शिरायचा प्रयत्न केला, त्या बाईमुळे, थोडा त्रास झाला. सेंट सायमनवर, तिचा बेकायदेशीर रित्या काही हक्क आहे, असे ती सांगत होती. अत्यंत दुःखदायक व लांबलचक तमाशानंतर, तिला स्वयंपाक्याने व दारवानाने हाकलून दिले. सुदैवाने या दुर्दैवी गोंधळापूर्वी, घरात शिरलेल्या नवऱ्या मुलीने, इतरांबरोबर बसून न्याहारी घ्यायला सुरवात केली. तेव्हा ती तिला थोडे बरे वाटत नसल्याची तक्रार करत, तिच्या खोलीत गेली. ती बराच वेळ न्याहारीच्या इथे आली नाही, म्हणून कुजबुज सुरु झाली. तिचे वडील तिच्यामागे गेले. पण त्याना, तिच्या नोकराणीकडून कळले, की ती वर खोलीत फक्त क्षणार्धाकरता आली होती. नवऱ्यामुलाचा लांब कोट व नवऱ्यामुलीची चेहऱ्याला आडोसा करणारी टोपी घेऊन, लगेच खाली पॅसेजमध्ये गेली. एका दरवानाने सांगितले, की त्याने एका बाईला नवरीच्या वेषात, घर सोडताना बघितले. पण ती त्याची मालकीण असल्याचे त्याला वाटत नव्हते. पण कुणाच्या तरी बरोबर मालकीणबाईसाहेब होत्या, असे तो म्हणाला. आपली मुलगी नाहीशी झाली आहे, याची खात्री झाल्यावर, मिस्टर ॲलॉयसीस डोरान यांनी नवऱ्या मुलाबरोबर जाऊन पोलिसांकडे तक्रार नोंदवली. आणि आता जोरात तपास सुरु आहे, ज्यामुळे बहुधा, लवकरच याचा निकाल लागेल. काल रात्री उशिरापर्यंत, हरवलेल्या बाईबद्दल, काहीही कळले नाही. याबाबत लोकांमध्ये उलटसुलट बोलले जात आहे. आणि असे कळते आहे, की पोलिसांनी सुरवातीला त्रास देणाऱ्या बाईला, असे समजून अटक केली आहे, की द्वेष किंवा काही अन्य कारणामुळे, तिचा या नवऱ्या मुलीने विचित्रपणे नाहीसे होण्याशी, काही संबंध असावा.'

"एवढेच का?"

“दुसऱ्या एका सकाळच्या वर्तमानपत्रात छोटीशी, फक्त थोडेफार काही सुचवणारी, बातमी आहे.”

“आणि ती अशी आहेः

“की मिसेस फ्लोरा मिलर, ती त्रास देणारी बाई, तिला खरेच अटक झाली आहे. असे वाटते आहे, की ती आधी, आलेग्रो येथे नर्तिका होती. आणि ती काही वर्षे, नवऱ्यामुलाला ओळखत होती. पुढे काहीही खास बातम्या नाहीत व आता सर्व काही, तुझ्या हातात आहे.

“ही फारच नावीन्यपूर्ण केस, वाटते आहे. मी ही माझ्या हातातून, मुळीच जाऊ देणार नाही. पण वॉटसन, आता चार वाजून काही मिनिटे झाली आहेत आणि हा आपला अशील, एक उमराव अशील असणार. जाऊ नकोस. माझ्या स्मरणशक्तीला पूरक म्हणून, मी एक साक्षीदार असणे पसंत करीन.”

आमच्या कामाच्या मुलाने दार उघडून, उमराव रॉबर्ट सेंट सायमन आल्याचे, सांगितले. एक आल्हाददायक व सुसंस्कृत चेहरा असलेला, नाकेला, अशक्त, सभ्य गृहस्थ, पोरकट दिसणारे तोंड घेऊन व स्थिर डोळे सताड उघडून आत शिरला. तो आज्ञा देणार व आपण त्या झेलायच्या अशा आविर्भावात तो दिसत होता. त्याच्या हालचाली झटपट होत होत्या. पण तो आहे, त्यापेक्षा जास्त वयस्क वाटत होता, कारण तो थोडा पुढे झुकलेला होता. चालताना त्याच्या गुडघ्यांना, थोडा बाक आलेला दिसत होता. त्याची गोलाकार टोपी, त्याने बाजूला केल्यावर, त्याचे विरळ करडे केस दिसत होते. तो त्याच्या पोशाखाबद्दल, कमालीची काळजी घेणारा वाटत होता. उंच कॉलर, काळा कोट, पांढरे जाकीट, पिवळे मोजे, चामड्याचे बूट व

पायातील फिकट रंगाची पँट; असा त्याचा पोषाख होता. त्याची मान डावीकडून उजवीकडे वळवत, तो सावकाश खोलीत शिरला. तो उजव्या हातात, त्याची सोनेरी चष्म्याची दोरी, झुलवत होता.

होम्स उभे राहून, वाकत बोलला, "शुभ दिवस, उमराव सेंट सायमन. कृपया खुर्चीत स्थानापन्न व्हा. हा माझा मित्र व बरोबर काम करणारा, डॉ वॉटसन. थोडे शेकोटीच्या बाजूला या. आता आपण या प्रकरणाची चर्चा करू."

"मिस्टर होम्स, तुम्ही कल्पना करू शकता त्याप्रमाणे, हे माझ्यासाठी, मला खोलवर जखम करणारे, फार तापदायक प्रकरण आहे. तुम्ही यासारखी नाजूक प्रकरणे, यापूर्वी हाताळली असल्याचे मला माहिती आहे. तरी ती मला वाटते, की ती उमराव घराण्यातील नसावीत."

"नाही. मी अशीलाच्या बाबतीत, खाली येतो आहे."

"मी नाही समजलो."

"अशा प्रकारची माझी पूर्वीची केस, राजाची होती.'

"ओहो, खरे की काय? मला माहिती नव्हते. आणि कुठला राजा?"

"स्कँडेनेव्हीयाचा राजा."

"काय! त्याची बायको हरवली होती?"

होम्स ठामपणे म्हणाला, "तुम्हाला समजेल, मी जसे तुम्हाला, तुमच्या केसचा मी कुठे बोलबाला करणार नाही, असे वचन देतो आहे, तसेच इतर अशीलानाही देतो."

“अर्थात, एकदम बरोबर! एकदम बरोबर! तुम्हाला तुमचे मत बनवता येईल अशी, माझ्या केसबद्दलची कुठलीही माहिती, द्यायला मी तयार आहे.”

“आभारी आहे. वर्तमानपत्रात वगैरे आलेला मजकूर, मी वाचलेला आहे, त्याहून अधिक काही, मला माहिती नाही. मी असे समजतो, की ती माहिती खरी असेल. उदाहरणार्थ यात नवऱ्या मुलीच्या, गायब होण्याबद्दल लिहिले आहे.”

उमराव सेंट सायमनने, त्या मजकुरावर नजर टाकली. “हो. हे खरे आहे.”

“पण याला पूरक माहितीची, जोड देण्याची गरज आहे. त्याशिवाय काही मत देणे, कठीण आहे. मला वाटते, मला जे हवे आहे, ते तुमच्याकडून काढून घेण्यासाठी, मी तुम्हाला प्रश्न विचारतो.”

“ठीक आहे.”

“तुम्ही पहिल्या वेळी, मिस हॅटी डोरानला कधी भेटलात?

“सॅनफ्रॅनसिस्को येथे, एक वर्षापूर्वी.”

‘तुम्ही त्यावेळी, परदेशी प्रवास करत होतात का?”

“हो.”

“मग तुम्ही तिला, नेहमी भेटू लागलात का?”

“नाही.”

“पण तुम्ही मित्र होतात का?”

“मला तिच्या समाजाने स्वीकारले होते. आणि तिच्या लक्षात आले होते, की मला ते आवडते आहे.”

“तिचे वडोल, फार श्रीमंत आहेत का?”

“पॅसिफिकच्या उतारावरील, ते सर्वात श्रीमंत व्यक्ती असल्याचे, समजले जाते.”

“त्यांनी एवढा पैसा, कसा मिळवला?”

“खाणींमधून. काही वर्षांपूर्वी त्यांच्याकडे काही नव्हते. मग त्याना सोने सापडले. त्याची त्यांनी गुंतवणूक केली. आणि ते कोट्याधीश झाले.”

‘तुमचे तुमच्या पत्नीच्या, त्या तरुण बाईच्या, चारित्र्याबद्दल काय मत आहे?”

त्या उमरावाने त्याचा चष्मा, अजून थोड्या जोराने झुलवला व शेकोटीकडे स्थिर नजरेने पाहिले.

“असे बघा मिस्टर होम्स, तिचे वडील श्रीमंत होण्यापूर्वी, माझी बायको वीस वर्षांची होती. त्यावेळी ती खाणींच्या परिसरात व दऱ्या डोंगरात, मोकळेपणे हिंडत असे. त्यामुळे तिचे शिक्षण शिक्षकांपेक्षा, निसर्गाकडून झालेले आहे. आपण इंग्लंडमध्ये ज्याला टॉमबॉय म्हणतो, तशी ती आहे. निसर्गसुलभ मोकळा स्वभाव व कुठल्याही परंपरांपासून मुक्त असलेली अशी, ती आहे. ती फार विचार करत न बसता, उसळून कृती करणारी आहे. ती झटपट, तिचे मन तयार करते व निर्भयपणे, तिचे निर्णय अंमलात आणते.” तो आब राखून खोकला. “मी तिला उच्च घराण्यातील,

खानदानी व एखाद्या नायिकेसारखा त्याग करायला तयार असणारी बाई, समजतो. काहीही मानहानीकारक, तिला पूर्णपणे नाकबूल असते. या गोष्टी बघूनच, मी तिच्याबरोबर लग्न करायला तयार झालो."

"तुमच्याकडे, तिचा फोटो आहे का?"

"हा, मी माझ्याबरोबर आणला आहे. त्याने त्याचे लॉकेट उघडून, आम्हाला त्या सुंदर बाईचा पूर्ण चेहरा दाखवला. तो फोटो नव्हता, तर जणू हस्तिदंती छोटी आकृती होती. ती बनवणाऱ्यानी चमकदार, काळ्याभोर केसांचा व देखण्या चेहऱ्याचा पूर्ण परिणाम, त्यात उतरवला होता. होम्सने बराच वेळ, प्रामाणिकपणे त्याकडे निरखून पाहिले. मग त्याने तो, उमराव सायमनकडे परत दिला.

"ती तरुणी इंग्लंडला आली व मग तुम्ही तिच्याशी, परिचय वाढवलात?"

"हो. तिचे वडील, लंडनच्या या शेवटच्या ऋतुत, तिला घेऊन आले होते. मी तिला, पुष्कळ वेळा भेटलो. तिच्याशी लग्न ठरवले व आता ते केले."

"मला असे कळले आहे, की तिने म्हणे, भरपूर हुंडा आणला होता?"

"बराच हुंडा. पण माझ्या कुटुंबात, नेहमी जेवढा दिला जातो, त्याहून जास्त नव्हे."

"आणि तो अर्थात, तुमच्याकडे राहीला असणार, कारण तुमचे लग्न आधीच झालेले होते."

"मी खरे तर, याची काही, चौकशी केली नाही."

"असे असणे, अगदी सहज शक्य आहे. तुम्ही मिस डोरानला, लग्नाच्या आदल्या दिवशी पाहिले का?"

"हो."

"ती आनंदात होती का?"

"कधी नाही एवढी! आम्ही आमच्या पुढच्या आयुष्यात काय करायचे, याबद्दल ती बोलत होती."

"खरे का? हे फार छान आहे. आणि विवाहाच्या दिवशी, सकाळी?"

ती अगदी पराकोटीची, चमकत होती. निदान लग्नानंतरपर्यंत तरी."

"मग तुम्ही तिच्यात काही बदल झालेला, पाहिलात का?"

"खरे सांगायचे तर, मी पहिली काही लक्षणे बघितली. तिची मनस्थिती, थोडी रागीट झाली होती. परंतु हे, नाहीसे होण्याच्या घटनेशी जोडणे, बरोबर ठरले नसते."

"असेच असू दे, अशी मी प्रार्थना करतो.'

"ओहो, ते पोरकट होते. आम्ही चर्चशेजारील कपडे बदलायच्या जागी चाललो होतो, तेव्हा तिच्या हातून फुलांचा गुच्छ खाली पडला. तेव्हा ती चर्चच्या पहिल्या बाकाजवळून, चालली होती. क्षणभर उशीर झाला. पण बाकावर बसलेल्या सभ्य माणसाने, उचलून तो तिच्या हातात दिला. त्यामुळे तो पडल्याचे, फार काही वाटले नाही. तरीही मी तिच्याशी जेव्हा त्याबद्दल बोललो, तेव्हा तिने अचानक

गडबडीने उत्तर दिले. आणि मग गाडीत बसल्यावर, ती या फालतू घटनेने, उगीचच चिडलेली वाटत होती."

"खरंच! तुम्ही म्हणालात, की बाकावर एक माणूस बसला होता. काही इतर लोकदेखील, तिथे हजर होते का?"

"हो. होते. चर्च उघडे असताना तिथे कुणी नसणे, अशक्य आहे."

"हा सभ्य गृहस्थ, तुमच्या बायकोचा मित्र नव्हता ना?"

"नाही. नाही. तो अगदी साधा दिसणारा, चारचौघांसारखा मनुष्य होता. मला त्याचे आस्तित्व, जेमतेम जाणवले. पण मला वाटते, की आपण मूळ मुद्यापासून भरकटतो आहोत.'

"तर मग तुझी बायको लग्नाहून परतताना, आधीच्यापेक्षा थोड्या कमी आनंदी मनस्थितीत होती. तिच्या वडीलांच्या घरात शिरताना, तिने काय केले?"

"मी तिला, तिच्या नोकराणीशी बोलताना पाहिले."

"आणि तिची नोकराणी, कोण आहे?"

"तिचे नाव ॲलीस आहे. ती अमेरिकन असून, कॅलिफोर्नियाहून, तिच्याबरोबर आली आहे."

"अगदी विश्वासू नोकराणी?"

“अगदी तशीच. मला असे वाटते, की तिची मालकीण, तिला जास्तच स्वातंत्र्य द्यायची. तरीही अर्थात, अमेरिकेत ते या गोष्टींकडे, वेगळ्या दृष्टीकोनातून बघतात.”

“ती किती वेळ, ॲलीसशी बोलत होती?”

“ओहो, काही मिनिटे. मी कसलातरी वेगळाच, विचार करतो आहे.”

“त्या काय बोलत होत्या, ते तुम्हाला ऐकू आले नाही का?”

“माझी बायको ताबा घेण्यासंबंधी, काहीतरी बोलली. तिला तिच्या नेहमीच्या अमेरिकन उच्चारात, बोलायची सवय होती. ती बोलली त्याचा अर्थ काय होता, याची मला काही कल्पना नाही.”

“कधीकधी अमेरिकन उच्चार, खूप बोलके असतात. आणि नोकराणीशी बोलणे संपल्यावर, तिने काय केले?”

“ती न्याहारीच्या खोलीत चालत गेली.”

“तुझा हात पकडून का?”

नाही एकटीच. लहानसहान बाबतीत, ती फार स्वावलंबी होती. आम्ही दहा मिनिटांकरता बसलो. मग ती घाईघाईने उठली. काही क्षमेचे शब्द बोलली व खोलीतून बाहेर गेली. ती परत कधीच, आली नाही.”

“पण ती नोकराणी, ॲलीस, मला समजले त्याप्रमाणे, अचानक तिच्या खोलीत गेली. नवऱ्या मुलीचे कपडे मोठ्या कोटात झाकून, वर टोपी ठेवली व बाहेर गेली.”

"असेच झाले असेल. मग ती माझी बायको, हाइड पार्कमध्ये फ्लोरा मिलरबरोबर, फिरताना दिसली. तीच ती मिलर, जी आता तुरुंगात आहे व जिने मिस्टर डोरानच्या घरी त्या सकाळी, थोडा तमाशा केला होता."

"हो. हो. तिच्याबद्दल थोडे ऐकायला, मला आवडेल आणि तुझे तिच्याशी काय नाते आहे, तेदेखील."

उमराव सेंट सायमनने त्याचे दोन्ही खांदे उंचावले व भुवया ताणल्या. "आम्ही काही वर्षे, मित्र होतो -- फार जवळचे मित्र होतो, असे मी म्हणेन. ती अलेग्रो येथे, रहात असे. मी कधी तिला दुष्टपणे, वागवलेले नाही. तिची माझ्याबद्दल तक्रार असायचे, काही कारण नाही. पण तुम्हाला माहिती आहे, की बायका कशा असतात, मिस्टर होम्स. फ्लोरा छान छोटीशी होती. पण फार भडक डोक्याची होती. माझ्यासाठी, खूपच जवळची होती. तिला जेव्हा समजले, की मी लग्न करतो आहे, तेव्हा तिने मला, फार भीतीची व दुःखाची पत्रे लिहिली. आणि खरे सांगायचे तर, मी इतक्या साधेपणाने लग्न का केले तर, मला चर्चमध्ये काही तमाशा होईल की काय, अशी भीती वाटत होती. आम्ही परतल्यावर ती, मिस्टर डोरान यांच्या दाराशी आली. ती दुसऱ्यांना धक्के देऊन बाजूला सारत व माझ्या बायकोला शिव्या देत पुढे आली. ती माझ्या बायकोला, धमक्याही देत होती, पण अशा स्वरूपाचे काहीतरी ती करेल, अशी माझी अटकळ होतीच. मी साध्या वेषातील दोन पोलिसाना, आणले होते. त्यांनी तिला, बाहेर हाकलून दिले. तिने जेव्हा पाहिले, की इथे तमाशा करून, काही उपयोग नाही, तेव्हा ती शांत झाली."

"तुझ्या बायकोने हे सर्व ऐकले का/"

“नाही. माझे नशीब, तिने ऐकले नाही.”

“आणि नंतर त्याच बाईबरोबर, ती चालताना दिसली?”

“हो. स्कॉटलंड यार्डच्या मिस्टर लेस्ट्रेड, याना पण ते गंभीर वाटले. असा विचार केला गेला की, फ्लोराने माझ्या बायकोची शिकार करुन, तिच्यासाठी काहीतरी भयानक सापळा रचला आहे.”

“हो. असे झाले असण्याची, शक्यता आहे.”

“तुम्हालाही तसेच वाटते का?”

“झाले असेलच, असे मी म्हणत नाही. पण तुम्हाला स्वतःला, अशी शक्यता वाटते का?”

“मला नाही वाटत, की फ्लोरा, एखाद्या माशीलाही मारू शकेल.”

“तरीही हेवा, ही चारित्र्यात जादुई स्थित्यंतर घडवून आणणारी, एक विचित्र शक्ती आहे. पण मग काय झाले असेल, याबद्दल तुमचे विचार काय आहेत?”

“तसे पाहिले तर, मी एक शक्यता शोधली आहे. ती कदाचित तितकी चपखल नसेल. मी तुम्हाला कायकाय झाले ते सर्व सांगितले आहे. तरीही, तुम्ही विचारत आहात, म्हणून सांगतो. या प्रकरणाची उत्सुक अधीरता व माझ्या बायकोची योग्य अशी सद्सदविवेकबुद्धी, यासकट तिला सामाजिक रित्या, फसवले गेल्याची भावना निर्माण होऊन, ती तिच्याबरोबर चालत राहिली असेल व त्यामुळे तिच्या मनात, थोडा राग व उतावळेपणा निर्माण झाला असेल.”

“थोडक्यात, ती अचानक वेडी झाली असेल?”

“मी म्हणेन की तिने, पाठ फिरवून पळ काढला. -- माझ्यामुळे नसावे पण बऱ्याच गोष्टी यश न मिळता घडत गेल्यामुळे असेल -- मी ते कशाही प्रकारे, स्पष्ट करून सांगू शकत नाही.”

होम्स हसत म्हणाला, “त्याची मी कल्पना करू शकतो. आणि आता उमराव सेंट सायमन, मला वाटते, मला सर्व माहिती मिळालेली आहे .तुम्ही सर्वजण न्याहारीच्या टेबलावर बसला होतात, तिथून तुला खिडकीबाहेरचे दिसत होते का?”

“आम्हाला, रस्त्याची दुसरी बाजू व बागही दिसत होती.”

“तसेच असणार. मग मला वाटते, तुला अजून जास्त वेळ थांबवण्यात, काही अर्थ नाही. मी तुझ्याशी नंतर बोलतो.”

अशील उठताउठता म्हणाला, “तुम्ही ही समस्या सोडवण्याइतके, भाग्यवान असाल तर छान!”

“मी ती सोडवली आहे.”

“ओहो! काय म्हणालात?”

“मी म्हटले, मी ती सोडवली आहे.”

“मग माझी बायको, कुठे आहे?”

ते थोडे लांबलचक आहे. मी लवकरच सांगतो.”

उमराव सेंट सायमनने, मान हलवली.

त्याने शेरा मारला, "तुमच्या माझ्यापेक्षा, एखादा हुशार माणूस ती सोडवू शकेल, असे मला वाटते." एवढे बोलून, जुन्या पद्धतीप्रमाणे थोडे खाली झुकून अभिवादन करत, तो गेला.

होम्स हसत बोलला, "उमराव सेंट सायमनने, माझे डोके त्याच्या बरोबरीचे असल्याचे बोलून माझा सन्मान केला आहे. या उलटतपासणीनंतर मला व्हिस्की, सोडा व सिगार हवा आहे. माझा अशील खोलीत येण्यापूर्वीच, मी माझा निष्कर्ष काढला आहे.'

"माझ्या प्रिय होम्स!"

"माझ्याकडे अशा पुष्कळ केसेसची टिपणे आहेत. तरीही, मी पूर्वी म्हटल्याप्रमाणे, माझा पूर्ण तपास, माझ्याकडील अर्धवट माहितीवर आधारित जो निष्कर्ष होता, त्यावरच मी ठाम असल्याचे दाखवतो.

जसे काही दुधातून ट्राउट मासा निघावा, त्याप्रमाणे प्रासंगिक पुरावे, क्वचितच खूप ठामपणे, काही सांगतात."

"पण तू ऐकलेस, तेच सर्व मीदेखील ऐकले."

"पण मला ज्यामुळे फायदा झाला, त्या माझ्या आधीच्या केसेसबद्दल तुला माहिती नाही. काही वर्षांपूर्वी ॲबर्डीन केसमध्ये, असाच एक प्रसंग होता. आणि वर्षभराने आलेली, फ्रांको पृशियन लढाईनंतरची म्युनिच केसही, अशीच होती. ही केस यापैकीच आहे. अरेच्चा! पण लेस्ट्रेड इथे आलेला दिसतो आहे. लेस्ट्रेड, शुभ दुपार. तुला टेबलावर एक जास्तीचा पेला दिसेल व खोक्यात सिगार पण आहेत."

पोलीस दलातील नेमलेल्या गुप्तहेराने, उघड्या गळ्याचा शर्ट, टाय व जाकीट घातले होते. त्यात तो खलाशासारखा दिसत होता. त्याच्या हातात एक काळी कॅनव्हासची पिशवी होती. अभिवादन करून, तो बसला व त्याला दिलेली सिगार पेटवली.

डोळ्यात मिस्कील झाक घेऊन, होम्सने विचारले, "सध्या काय चालू आहे? तू असमाधानी दिसतो आहेस."

"हो. मी असमाधानी आहे. ही ती सेंट सायमनची, डोकेखाऊ केस आहे. मला त्यात, ओ नाम ठो, काहीही कळत नाही."

"खरे की काय? तू मला चकित केलेस."

अशा गुंतागुंतीच्या प्रकरणाबद्दल, कोणी कधी ऐकले नसेल. प्रत्येक पुरावा माझ्या बोटांमधून निसटून जातो आहे. मी दिवसभर त्या केसच्या मागे आहे."

"आणि तुला तिने, फार दमवलेले दिसत आहे." लेस्ट्रेडच्या जाकिटाच्या हातावर हात ठेवत तो म्हणाला.

"मी एखाद्या सापासारखा वळवळतो आहे."

"अरे देवा, कशासाठी?"

"सेंट सायमनच्या बायकोचे मृत शरीर शोधण्यासाठी."

होम्स त्याच्या खुर्चीत, मागे रेलून बसला व मोठमोठ्याने हसू लागला.

"तू ट्रॅफलगर चौकातील कारंज्याच्या खाली, खणून पाहिलेस की काय?" त्याने विचारले.

"का? तुला काय म्हणायचे आहे?"

"कारण तुला ही बाई तिथे, वा तशाच एखाद्या अन्य ठिकाणी सापडायची, चांगली संधी होती."

लेस्ट्रेडने माझ्या मित्राकडे एक रागाचा कटाक्ष टाकला. तो गुरगुरला, "मला वाटतं, तुला याबद्दल सगळे काही माहिती आहे."

हे बघ, मी आतापर्यंत फक्त कायकाय घडले, एवढेच ऐकले आहे. पण माझा निर्णय ठरला आहे."

"ओहो, खरंच? म्हणजे तुला असे वाटते का, की यात सापाची काहीही भूमिका नाही.?"

"मला वाटते नक्कीच नाही."

मग तू दयाळूपणे, ते स्पष्ट करशील का?" असे बोलून, त्याने त्याची पिशवी उघडून, त्यातून लग्नाचा रेशमी पोशाख, पांढऱ्या सॅटीनच्या बुटांची जोडी व एक तोंडावर घ्यायचे झिरझिरीत वस्त्र जमिनीवर ओतले. त्या सर्व वस्तू पाण्याने भिजलेल्या व रंग उडालेल्या होत्या. लग्नासाठीची नवीन अंगठी त्या ढिगावर ठेवत तो बोलला, "मिस्टर होम्स, इथे तुम्हाला रहस्य फोडण्यासाठी छोटास ढीग ठेवला आहे."

“ओहो, खरे की काय! हे तू सापाखालून काढलेस का?” अंगठी हवेत उडवत, माझा मित्र म्हणाला.

“नाही. हे बागेतील माळयाला, पाण्याच्या कडेला तरंगत असलेले सापडले. ते त्याने मिसेस सायमनचे असल्याचे ओळखले. आणि मग मला वाटले, की जर कपडे इथे सापडले आहेत, तर मग प्रेत पण, इथेच जवळपास कुठेतरी असणार.”

अशाच हुशारीच्या तर्कबुद्धीने, प्रत्येक माणसाचे प्रेत त्याच्या कपड्यांच्या कपाटाजवळ, सापडायला पाहिजे. आणि यातून तू काय निष्कर्ष काढू इच्छितोस?”

“या नाहीसे होण्यामागे, फ्लोरा मिलरचा हात असल्याचा, पुरावा सापडण्याचा.”

मला वाटते, की ते तुला अवघड जाईल.”

लेस्ट्रेड कडवटपणे किंचाळला, “असे म्हणतोस? होम्स, तुझ्या निष्कर्षांच्या बाबतीत तू नुसतेस तर्क लढवतोस, तू फार कृतीप्रधान नाहीस. तू काही मिनिटात दोन चुका केलेल्या आहेस. हे कपडे निश्चितपणे, मिस फ्लोरा मिलरकडे, बोट दाखवतात.”

“आणि कसे?”

“या कपड्यात एक खिसा आहे. खिशात कार्डे ठेवायची केस आहे व त्यात एक चिठ्ठी आहे. त्याने ती होम्ससमोर, टेबलावर भिरकावली. ऐकः ‘सर्व तयारी झाली की तू मला भेट. लगेच ये. F. H. M.’ आता माझे म्हणणे असे आहे, की मिसेस सायमनला फ्लोरा मिलरने भुलवले. निःसंशय, तीच मिसेस सायमनला नाहीसे

करण्यासाठी, जबाबदार आहे. इथे तिने सही केलेली, चिठ्ठी आहे. ती दरवाज्यात नकळतपणे, तिच्या हातात पडली असावी व त्या चिठ्ठीने, तिला त्यांच्या सापळ्यात अलगद नेऊन पाडले असावे."

होम्स हसत उत्तरला, "फार छान, लेस्ट्रेड. तू खरोखर धन्य आहेस. मला हे बघूदे." त्याने संथपणे ती चिठ्ठी हातात घेतली. पण अचानक त्याचे लक्ष उडाले व त्याने समाधानाची आरोळी दिली. तो म्हणाला, "ही खरेच फार महत्वाची आहे."

"शेवटी तुला हे पटले तर?"

"अगदी पुरेपूर पटले. मी तुझे, अभिनंदन करतो."

लेस्ट्रेड विजयाने उठला व मान झुकवून अभिनंदन स्विकारले. पण लगेच, तो घाबरून ओरडला, "तू चुकीच्या बाजूला बघतो आहेस."

"उलट? हीच सुलट बाजू आहे."

"सुलट बाजू? तू वेडा झाला आहेस. इथे हे पेन्सिलीने लिहिले आहे."

"आणि इथे हा हॉटेलच्या बिलाचा तुकडा असल्यासारखे दिसते आहे. त्यात मला खूप रुची आहे."

"त्यात काही नाही. मी तो यापूर्वी पाहिला आहे. 'ऑक्टो ४, खोली ८ एस., न्याहारी २ एस. ६ पी., दारू १ एस., जेवण २ एस. ६ पी., एक पेला शेरी ८ पी.' बास. अजून काही मला यात दिसत नाही." लेस्ट्रेड बोलला. (एस म्हणजे शिलिंग व पी म्हणजे, पेनी.)

"कदाचित नसेल. तरीही, तो महत्वाचा आहे. त्या चिठ्ठीप्रमाणे, निदान सही तरी, महत्वाची आहे, आणि त्याबद्दल मी, तुझे पुन्हा अभिनंदन करतो."

लेस्ट्रेड उठत म्हणाला, "मी पुष्कळ वेळ फुकट घालवला. मी कानावर विश्वास ठेवतो. शेकोटीजवळ बसून विचारांचे जाळे विणण्यात नव्हे. मिस्टर होम्स, अच्छा. कोण या प्रकरणाच्या तळाशी लवकर पोचतो, ते बघू." त्याने कपडे गोळा करून, पिशवीत भरले व दाराकडे निघाला.

"लेस्ट्रेड, तुला एक गोष्ट सांगतो. मी तुला या प्रकरणाची, मेख सांगतो. मिसेस सायमन, ही अफवा आहे. अशा नावाची कुणी व्यक्ती नव्हती व नाही आहे." त्याचा प्रतिस्पर्धी जाण्यापूर्वी होम्स, सावकाश बोलला.

लेस्ट्रेडने हताश होऊन, माझ्या मित्राकडे बघितले. मग तो माझ्याकडे वळला. तीनदा डोक्यावर हात मारून घेतला. दुःखाने डोके हलवले व घाईने निघून गेला.

त्याने त्याच्यामागे, दार लावून घेतले न घेतले तोच, होम्स त्याचा मोठा कोट घालण्यासाठी उठला. तो बोलला, "दाराबाहेर जे काही घडले, असे हा माणूस म्हणतो आहे, त्यात काही तथ्य असावे. त्यामुळे वॉटसन, मी तुला तुझ्या या वर्तमानपत्राच्या ढीगात, सोडून जातो."

शेरलॉक होम्स इथून गेला, तेव्हा पाच वाजून गेले होते. पण मी एकाकी नव्हतो, कारण तासाभरात मोठी पेटी घेऊन, एक दुकानदार आला. ती पेटी त्याने त्याच्याबरोबर आलेल्या एका तरुणाच्या मदतीने उघडली आणि मला आश्चर्यचकित करून, आमच्या घराच्या महोगनी लाकडी टेबलावर, थोडे थंड ग्रीक पद्धतीचे जेवण,

मांडले. त्यात एकत्र बांधलेले, वूडकॉक पक्षी होते. लांब शेपटीचा, फेसंट होता. मासाचा केक होता. त्याबरोबर बऱ्याच जुन्या, मद्याच्या बाटल्या होत्या. या सर्व चैनीच्या वस्तू मांडल्यावर, अरेबिअन नाईटमधील जेनीसारखे, ते दोघेजण नाहीसे झाले. इथे, या पत्त्यावर या वस्तू मागवल्या होत्या व पैसे दिलेले होते. याव्यतिरिक्त काही स्पष्टीकरण, मिळाले नाही.

नऊपूर्वी थोडा वेळ शेरलॉक होम्स, घाईघाईने खोलीत आला. तो अगदी थंड होता. पण त्याच्या डोळ्यातील चमक पाहून, मी असा विचार केला, की त्याने काढलेल्या निष्कर्षांबद्दल, त्याची निराशा झाली नसावी.

तो त्याचे हात चोळत म्हणाला, "त्यांनी, जेवण आणले आहे तर!"

"तुला अजून कोणी येणे, अपेक्षित दिसते आहे. कारण हे पाचजणांचे जेवण मांडलेले आहे."

तो म्हणाला, "हो. मलाही वाटते, कोणीतरी येणार असेल. मला वाटले, उमराव सेंट सायमन आधीच आला असेल. मला वाटते, मी जिन्यावर त्याचा पदरव ऐकला. खरेच आमचा तो दुपारचा पाहुणा घाईघाईने गडबड करत, त्याचा चष्मा जास्त जोरात हलवत, त्याच्या खानदानी चेहऱ्यावर उत्सुकता घेऊन, आला होता. होम्सने विचारले, "माझा निरोप तुला मिळाला तर!"

"हो आणि मी कबूल करतो की मला त्यातील मजकूर वाचून, जोरदार धक्का बसला. तुम्ही हे जे बोलत आहात, ते अधिकारवाणीने बोलत आहात का?"

"जास्तीत जास्त शक्य असेल, तेवढे."

उमराव सेंट सायमन, खुर्चीत बसला व त्याचा हात कपाळावर, फिरवला.

तो पुटपुटला, "कुटुंबातील एक सदस्याच्या बाबतीत, असे काही लाजिरवाणे घडल्याचे कळल्यावर, ड्युक काय म्हणेल?"

तो खराखुरा अपघात होता. यात लाजिरवाणे काही नाही."

"ओहो, तुम्ही याकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघता."

"यात कोणाला दोष देण्याचे, काय कारण आहे? ती बाई, नाहीतर कशी वागली असती, याची मी कल्पना करू शकत नाही. अर्थात तिची हे अचानक करण्याची पद्धत, निःसंशय खंत करण्यासारखी होती. तिला आई नसल्यामुळे, अशा संकटाच्या वेळी चार उपदेशाचे शब्द सांगायला, कोणीच नव्हते.'

"हे फार थोडे होते. लोकांच्या दृष्टीने विशेष काही नव्हते.," उमराव सेंट सायमन, टेबलावर त्याची बोटे नाचवत बोलला.

"अशा कधीही कल्पना न केलेल्या प्रसंगी, त्या बिचाऱ्या मुलीला तू माफ केले पाहिजेस."

"होम्स म्हणाला, "मला वाटते मी घंटीचा आवाज ऐकला. हो. कुणीतरी येते आहे. उमराव सेंट सायमन, या प्रकरणी दयेचा दृष्टीकोन बाळगणयासाठी, मी तुझे मन वळवू शकलो नाही, तर मी एका वकिलाला आणले आहे. तो कदाचित यशस्वी होईल." त्याने दार उघडून एक सभ्य गृहस्थ् व एका बाईसाहेबाना घरात घेतले. तो म्हणाला, "उमराव सेंट सायमन, मला मिस्टर आणि मिसेस फ्रान्सिस एच मॉल्टन यांची ओळख करून देऊदे. मिसेस मॉल्टनना मला वाटते, तू आधी भेटला आहेस."

त्या अभ्यागतांना पाहून, आमचा अशील त्याच्या जागेवरून, टुणकण उडी मारून उठला, त्याचे डोळे खाली वळवून, व हात कोटावर ठेवून, ताठ उभा राहिला. शरणागत नम्रतेचे जणू चित्र! ती बाई चटकन एक पाऊल पुढे आली व त्याचे हात हातात घेतले. पण अजूनही तो, त्याची नजर वर करत नव्हता. त्याचा हो/नाहीचा निर्णय होत नव्हता, पण कदाचित तिचा भावनामय चेहरा, विरोध करण्यास कठीण होता.

ती म्हणाली, "रॉबर्ट, तू रागावला आहेस? मला वाटते, तुला तो अधिकार आहे."

उमराव सेंट सायमन कडवटपणे म्हणाला, "कृपया माझ्याजवळ, क्षमा मागू नका."

"ओहो, मला माहिती आहे, की मी तुझ्याशी खरंच, वाईट वागले आहे. मी जाण्यापूर्वी, तुझ्याशी बोलायला हवे होते. पण मी गडबडून गेले होते. मी फ्रँकला इथे पाहिल्यापासून, मी काय बोलते आहे व काय करते आहे, हे मला कळतच नव्हते. मी खाली कशी पडले नाही, याचे मला आश्चर्य वाटते. मी न्याहारीच्या इथे बहुतेक, शेवटी चक्कर येऊन, पडायलाच आले होते."

"मला वाटते, मिसेस मॉल्टन, तुम्ही हे सर्व स्पष्ट करत असताना, मी व माझा मित्र खोलीबाहेर गेलो, तर तुम्हाला बरे वाटेल का?"

विचित्र सभ्य गृहस्थ बोलला, "जर मला मत द्यायचे असेल, तर आम्हाला यासाठी, जरा जास्तच गुप्तता मिळालेली आहे. माझ्या मते, सर्व अमेरिका व युरोपने, आमचे बोलणे ऐकले तरी चालेल."

तो एक लहानसा, घोटून दाढी केलेला, तीक्ष्ण चेहऱ्याचा, सूर्यामुळे भाजल्याच्या खुणा असलेला, सावध असा, माणूस होता. ती बाई म्हणाली, "मग मी माझी गोष्ट, सरळ सांगूनच टाकते. इथे असलेला फ्रँक व मी १९८४ मध्ये भेटलो. रॉकीज जवळील, मॅक क्विरच्या शिबिरामध्ये भेटलो. तिथे माझे वडील, काम करत होते. फ्रँक व मी दोघांनी एकमेकांशी लग्न ठरवले. पण नंतर एक दिवस, वडीलांना घबाड सापडून, ते लखपती झाले. तर गरीब फ्रँक हळूहळू गाळात जात, कफल्लक झाला. वडील जितके श्रीमंत झाले, तितका फ्रँक दरिद्री झाला. माझे फ्रँकबरोबर ठरलेले लग्न, वडीलाना सहन होईना. म्हणून ते मला घेऊन, सॅनफ्रॅनसिस्कोला गेले. पण फ्रँकला काही, नकार कळवला नाही. त्यामुळे, फ्रँक माझ्या मगोमाग तिथे आला आणि वडीलाना टाळून, मला भेटला. आम्ही लग्न ठरवल्याचे ऐकून, वडील वेडे झाले असते, म्हणून आमचे आम्हीच, सर्वकाही ठरवले. फ्रँक म्हणाला, की तो त्याचे सामान घेऊन मला भेटायला तेव्हाच येईल, जेव्हा त्याच्याकडे माझ्या वडिलांएवढे, पैसे साठतील. मी त्याच्यासाठी, कितीही काळ थांबायचे ठरवले. तो असेपर्यंत, दुसऱ्या कुणाशीही लग्न करणार नाही, असे वचन त्याला दिले. तेव्हा तो म्हणाला, "आपण आत्ताच, लग्न का करू नये, म्हणजे मला तुझ्याबद्दल, खात्री वाटेल. पण मी तुझा नवरा असल्याचे मी परत येईपर्यंत, कोणालाही सांगणार नाही." आणि मग त्याने पाद्री आणण्यापासून, सर्व अगदी उत्तमपणे घडवून आणले. मग तो त्याचे भविष्य घडवण्यासाठी, निघून गेला व मी वडिलांकडे परत गेले.

नंतर मी तो मोन्टानामध्ये असल्याचे ऐकले. नंतर तो पैशाच्या मागे ॲरीझोनाला गेला. मग मी त्याच्याबद्दल न्यू मेक्सीकोहून ऐकले. नंतर वर्तमानपत्रात, अपाची इंडियन लोकांनी खाणीच्या परिसरावर कसा हल्ला केला, त्यासंबंधी एक

लांबलचक गोष्ट आली होती. त्यात माझ्या फ्रँकचे नाव मृत लोकांच्या यादीत होते. मी चक्कर येऊन, मृतप्राय होऊन पडले. नंतर अनेक महिने मी आजारी होते. वडीलांना वाटले की मी खंगत चालले आहे. म्हणून त्यांनी सॅनफ्रॅनसिस्कोमधील सगळे डॉक्टर पालथे घातले. मला वर्षभरात किंवा त्याहूनही जास्त काळात, काही बातमी समजली नाही. त्यामुळे फ्रँक खरंच मेला असणार, याबद्दल मला काही संशय उरला नाही. मग उमराव सेंट सायमन, सॅनफ्रॅनसिस्कोला आला. मग आम्ही लंडनला आलो. आमचे लग्न ठरले. माझे वडील खूप खूष होते. पण मला सर्व वेळ असे वाटत होते की, माझ्या हृदयात फ्रँकसाठी जी जागा होती, ती या पृथ्वीवरील कोणीही माणूस, घेऊ शकणार नाही.

तरीही मी उमराव सेंट सायमनबरोबर लग्न केले, ते केवळ कर्तव्य म्हणून केले. आपल्या प्रेमावर आपली काही हुकमत चालत नाही पण कृतीवर चालू शकते. माझ्यातील बायको जेवढी काही चांगली असू शकेल, तेवढी मी आहे हे दाखवण्यासाठी, मी त्याच्याबरोबर चर्चमध्ये गेले. पण तुम्ही कल्पना करू शकता, की मी चर्चमध्ये आल्यावर, मागे वळून पाहिले, तर मी फ्रँकला तिथे उभे असलेले पाहिले. तो पहिल्याच बाकावर बसून, माझ्याकडे बघत होता. मला पहिल्यांदा वाटले, की ते त्याचे भूत आहे. पण मी पुन्हा पाहिले, तेव्हा तो परत डोळ्यात प्रश्नचिन्ह घेऊन, मला जणू विचारत होता, की त्याला बघून मला वाईट वाटले, की आनंद झाला. मला नवल वाटले, की मी चक्कर येऊन पडले कशी नाही. सर्व जग माझ्याभोवती, फिरू लागले. पाद्री उच्चारत असलेले शब्द मला फक्त मधमाशीच्या गुणगुणण्यासारखे, ऐकू येत होते. मला कळत नव्हते, की काय करावे. मी हे लग्न मोडल्याचे जाहीर करून, चर्चमध्ये तमाशा करावा का? मी परत त्याच्याकडे पाहिले आणि त्याला बहुधा मी काय विचार

करत आहे, ते कळले असावे. त्याने त्याचे बोट उचलून त्याच्या ओठांवर ठेवले व मला गप्प रहाण्याबद्दल सुचवले. मग मी त्याला एका कागदावर काहीतरी खरडताना पाहिले. मला कळले, की तो माझ्याकरता चिठ्ठी लिहित आहे. मी त्याच्यासमोरील बाकावरून गेले, तेव्हा मी माझ्या हातातील फुलांचा गुच्छ खाली पाडला. आणि त्याने तो मला परत करताना, माझ्या हातात एक चिठ्ठी दिली. तो खूण करेल तेव्हा त्याला भेटण्यासाठी मी यावे, अशी फक्त एक ओळ त्यात, लिहिलेली होती. अर्थात मला, क्षणभरसुद्धा काय करावे, हा प्रश्न पडला नाही, कारण तो काय सांगेल ते ऐकणे, हेच माझे पहिले कर्तव्य होते.

मी कॅलिफोर्नियामध्ये असल्यापासून, त्याला ओळखणाऱ्या व त्याच्याबरोबर मैत्री असणाऱ्या माझ्या नोकराणीला, मी ते सांगितले. पण याबद्दल काही न बोलण्याबद्दल, बजावले व माझ्या काही वस्तू भरून ठेवून, माझा मोठा कोट तयार ठेवायला सांगितले. मला कळत होते, की मी उमराव सेंट सायमनला, सर्व काही सांगायला हवे होते. पण त्याची आई, व इतर सर्व मोठ्या माणसांसमोर ते सांगणे, फारच कठीण होते. मी सरळ असे ठरवले की, पळून जायचे आणि नंतर सर्व काही सांगायचे. मी टेबलाशी जाऊन दहा मिनिटे होत नाहीत तोच, मी फ्रँकला खिडकीतून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पाहिले. त्याने माझ्याकडे बघून हात हलवला. आणि मग पार्कमध्ये चालू लागला. मी सटकले. माझ्या वस्तू घेतल्या व त्याला गाठू लागले. कोणीतरी बाई माझ्याकडे येऊन, उमराव सेंट सायमनबद्दल, माझ्याशी काहीतरी बोलत राहिली -- त्याचे लग्नापूर्वीचे काही गुप्त रहस्य असल्याचे, ती मला सांगत असल्याचे, मी उडतउडत ऐकले. पण मी तिला टाळून, सटकले व फ्रँकला गाठले. आम्ही दोघेही एका टॅक्सीत बसलो व तो लांब जिथे उतरला होता, त्या गॉरडॉन

चौकातील एका लॉजमध्ये गेलो. इतकी वर्षे थांबल्यावर, ते माझे खरे लग्न होते. अपाची लोकांनी, फ्रँकला तुरुंगात टाकले होते. तिथून निसटून, तो सॅनफ्रॅनसिस्कोला पोचला. तेथे त्याला असे समजले, की मला तो मेला, असे वाटत आहे. मग तो मला शोधत, इंग्लंडला आला आणि शेवटी माझ्या दुसऱ्या लग्नाच्या सकाळी, तिथे हजर झाला."

त्या अमेरिकनाने स्पष्टीकरण दिले, "मी ते वर्तमानपत्रात पाहिले. त्यात मला बाईचे नाव व चर्चचे नाव कळले."

मग आता काय करावे, याबद्दल आम्ही चर्चा केली. फ्रँकला सर्व काही सांगून मोकळे व्हावे, असे वाटत होते, पण मला या प्रकाराची इतकी लाज वाटत होती, की मी तेथून निघून जाणे व परत त्या लोकाना कधीही न भेटणे, पसंत केले. -- वडीलाना फक्त एक ओळ लिहिली. कदाचित मी जिवंत आहे एवढे सांगण्यासाठीच. त्या न्याहारीच्या टेबलाशी बसलेले व माझी वाट बघणारे सर्व उमराव व प्रतिष्ठीत स्त्रिया, यांच्याबद्दल विचार करणे सुद्धा, मला भीतीदायक वाटत होते. त्यामुळे फ्रँकने माझे लग्नाचे कपडे व वस्तू, यांचे एक गाठोडे तयार केले व माझा माग कुणी काढू नये, म्हणून ते कुठेतरी टाकून दिले. आम्ही उद्या पॅरीसला गेलो असतो, पण हा चांगला सभ्य गृहस्थ, मिस्टर होम्स, संध्याकाळी आला आणि त्याने मोठ्या दयाळूपणे व स्पष्टपणे, मी चुकत असल्याचे व फ्रँक बरोबर असल्याचे आम्हाला पटवले. त्याने आम्हाला गाठले कसे, हे माझ्यासाठी गूढच आहे. त्याने आम्हाला असा सल्ला दिला, की आम्ही उमराव सेंट सायमनशी बोलून, सर्व खरे काय ते सांगून टाकावे. तो त्याची एकट्याची आमच्याशी भेट घडवून आणेल, असे तो म्हणाला. म्हणून आम्ही, आज इथे आलो. आता रॉबर्ट, तू हे ऐकले आहेस आणि मी तुला दुःख दिले असेल तर, त्याबद्दल

मनापासून माफी मागते. मी अशी आशा करते, की तू माझा सहानुभूतीने विचार करशील."

उमराव सेंट सायमनने कुठल्याही परिस्थितीत, त्याचा ताठर दृष्टीकोन बदलायचे, अमान्य केले. परंतु भुवई ताणून व ओठ शिवून, ती लांबलचक हकीगत ऐकून घेतली.

तो बोलला, "मला माफ करा. कारण खूप खासगी अशा आपल्या व्यक्तिगत बाबींची, अशी जाहीरपणे चर्चा करायची, मला सवय नाही."

"म्हणजे तू मला माफ करणार नाहीस? मी येथून जाण्यापूर्वी, माझ्याबरोबर हातमिळवणी करणार नाहीस?"

"ओहो, त्यामुळे तुला आनंद मिळणार असेल, तर नक्कीच करेन."

त्याने त्याचा हात पुढे केला व थंडपणे तिने पुढे केलेल्या हाताशी मिळवला. होम्सने सुचवले, "मी अशी आशा करतो, की तुम्ही या मित्रत्वाच्या जेवणात सामील व्हाल."

उमराव उत्तरादाखल म्हणाला, "मला वाटते, हे जरा जास्तच होते आहे. माझ्या मनात नसताना, तुम्ही मला समझोता करायला लावत आहात. पण मला आनंद झाला आहे, असे मी दाखवू शकत नाही. मला वाटते की तुमच्या परवानगीने, मी तुम्हाला सर्वाना शुभ रात्री असे म्हणून, प्रयाण करतो." तो आम्हा सर्वाना, तशा मनस्थितीत सोडून, खोलीबाहेर पडला.

शेरलॉक होम्स म्हणाला, “मला विश्वास वाटतो की निदान तुम्ही तरी मला, तुमच्या संगतीचा मान द्याल. अमेरीकनाना भेटणे, हे नेहमीच आनंददायी असते. मिस्टर मॉल्टन, मी असा विश्वास प्रकट करतो, की येत्या काही वर्षातील पुढील काळात, विशाल अशा पसरलेल्या, चांदण्या व पट्ट्या असलेल्या राष्ट्रध्वजाच्या देशाचे, अमेरिकेचे, नागरिक बनण्यापासून, आपण आपल्या मुलांना रोखू शकणार नाही. राजघराणयातील मूर्खपणा व मंत्र्याचा निष्काळजीपणाही त्याना असे करण्यापासून परावृत्त करू शकणार नाही.”

पाहुणे गेल्यावर, होम्सने असा शेरा मारला, “ही केस फारच रुचीपूर्ण होती. कारण ती स्पष्टपणे असे दाखवते, की कुठल्याही प्रकरणाचे स्पष्टीकरण, पहिल्यांदा जितके अवघड वाटते, तितके ते नसते. या बाईने सांगितलेल्या ह्कीगतीतील घटनाक्रमापेक्षा अधिक नैसर्गिक, काहीच असू शकत नाही आणि स्कॉटलंड यार्डच्या लेस्ट्रेडने काढलेल्या निष्कर्षांपेक्षा, अजून विचित्र काहीच असू शकत नाही.”

“मग याचा अर्थ तू स्वतः, काहीच चुकत नव्हतास?”

“पहिल्यापासून दोन गोष्टींवर मी अगदी ठाम होतो. पहिली म्हणजे ती बाई स्वखुशीने, लग्नसमारंभासाठी तयार झाली होती. दुसरी म्हणजे न्याहारीच्या खोलीत गेल्यावर, काही मिनिटात ती पश्चात्ताप करू लागली. म्हणजे तिने पलटी मारण्यासारखे, नक्कीच सकाळी काहीतरी घडले. ते काय असू शकेल? ती बाहेर गेली, तेव्हा कुणाशीच काही बोलली नाही, कारण तेव्हा ती नवऱ्या मुलाबरोबर होती. मग तिला कुणी दिसले का? जर कुणी असेल तर, तो अमेरिकेहून आलेला असला पाहिजे. कारण तिने या देशात, इतका थोडा वेळ घालवलेला आहे, की तिच्यावर इतका

खोलवर परिणाम करायला लावणारा कुणी इथे होता, हे शक्य वाटत नव्हते. इतका जबरदस्त परिणाम, की फक्त त्याला बघून, तिने तिचे बेत पूर्णपणे बदलले. असे बघ, आपण काहीजणाना वगळण्याच्या कृतीतून, आधीच अशा निर्णयाला आलो होतो, की तिने अमेरीकनाला पाहिले असणार.

मग हा अमेरिकन कोण? आणि त्याचा तिच्यावर इतका प्रभाव का असावा? तो प्रेमी असू शकेल, नवराही असू शकेल. तिचे नवतारुण्यातील दिवस, ओबडधोबड निसर्गाच्या सहवासात व विचित्र अवस्थेत गेले असणार, हे मला माहिती आहे. उमराव सेंट सायमनने केलेले वक्तव्य ऐकण्यापूर्वीपासून, मला हे माहिती होते. मला त्याने चर्चमध्ये पहिल्या बाकावर बसलेल्या माणसाबद्दल व नवऱ्या मुलीच्या वर्तनातील बदलाबद्दल, सांगितले. फुलांचा गुच्छ पाडून, चिठ्ठी हस्तगत करणे, नोकराणीच्या कानात, कुजबुज करणे व सर्वात विशेष म्हणजे, पळून जाणे -- म्हणजे दुसऱ्या माणसाने सांगितलेल्या गोष्टीच्या कह्यात जाणे -- यामुळे सगळी परिस्थिती पूर्णपणे स्पष्ट झाली.

ती त्या माणसाबरोबर निघून गेली आणि तो माणूस एकतर प्रियकर होता किंवा आधीचा नवरा होता – आधीचा नवरा असायची शक्यता जास्त वाटत होती."

"आणि या एवढ्या मोठ्या जगात, ते तुला सापडले तरी कुठे?"

"ते खरे तर कठीण झाले असते. पण मित्र लेस्ट्रेडने ही केस हातात घेऊन, मला जी माहिती दिली, ती इतकी महत्वाची असल्याचे, त्याला स्वतःलाही माहिती नव्हते. सही अर्थात सर्वात महत्वाची होती. पण F. M. म्हणजे फ्लोरा मिलर नसून ती सही फ्रँक मॉल्टनची होती. पण त्याहून जास्त महत्वाचे हे होते, की

आठवड्याभरात त्याने लंडनच्या एका मोठ्या हॉटेलचे बिल, चुकते करून टाकले होते."

"ते तुला कसे कळले?"

त्याने खर्च केलेल्या पैशांवरून! खोलीसाठी आठ शिलिंग, एका शेरीच्या पेल्यासाठी आठ पेनी; या किमतींवरुन हे मोठे महागडे हॉटेल असल्याचे मला कळले. या प्रकारे किंमत लावणारी फारशी हॉटेले लंडनमध्ये नाहीत. नॉर्थअंबरलँड ॲव्हेन्यू, हे मी गेलो होतो ते दुसरे हॉटेल. मी त्यांचे रजिस्टर बघून समजलो की फ्रांसिस एच मॉल्टन हा अमेरिकन माणूस, आदल्या दिवशीच ते सोडून गेला होता. त्याचे नाव तिथे शोधताना, मी डुप्लीकेट बिलामध्ये ज्या नोंदी पाहिल्या होत्या, त्याच आढळल्या. त्याच्या नावापुढे, २२६, गॉर्डन चौक, असा पत्ता लिहिलेला होता. तिथे मी पोचलो. आणि माझ्या नशिबाने, ते प्रेमळ जोडपे मला घरीच सापडले. मी धीर करून, त्याना एखाद्या पालकासारखा, उपदेश केला. त्याच्या असे निदर्शनास आणून दिले, की त्यांनी जनतेला व उमराव सेंट सायमनला, त्यांच्याबद्दल स्पष्टपणे सांगितले पाहिजे. मी त्याना इथे उमरावाला भेटण्यासाठी बोलावले. आणि तू बघतो आहेस, त्याप्रमाणे दोघांची, भेटीची वेळ ठरवून टाकली."

मी करवादलो, "पण त्याने फार चांगले काही, झाले नाही. उमराव सेंट सायमनचे वागणे, निश्चितच राजघराण्याला शोभेसे नव्हते."

होम्स हसत म्हणाला, 'ओहो वॉटसन, जर सगळ्या त्रासानंतर, लग्न ठरवून व करून, शेवटी ती क्षणभराचीच पत्नी ठरली असती तर, तूही इतका डौलदार राहीला नसतास. मला वाटते, आपण उमराव सेंट सायमनचा विचार, फार दयापूर्ण

दृष्टीकोनातून केला पाहिजे. आपल्यावर नशिबाने अशी वेळ आणली नाही म्हणून, आपण आभार मानले पाहिजेत. तुझी खुर्ची वर कर व मला व्हायोलीन दे. कारण आता आपल्यापुढे, एकच प्रश्न आहे. आणि तो म्हणजे, या पानगळीच्या उदासवाण्या संध्याकाळपासून, आपला बचाव कसा करायचा.

तीन गॅरीडेब

ही सुखांतिका असेल किंवा दुःखांतिका. एका माणसाला त्यासाठी त्याच्या बुद्धीची किंमत मोजावी लागली, मला रक्त वाहू द्यावे लागले, तर अजून एका माणसाला, कायदा मोडल्याबद्दलची जबर किंमत भरावी लागली. तरीही त्यात, काही हसवणारे होते. पण हे, तुमचे तुम्हीच ठरवा.

मला ती तारीख, पक्की आठवते आहे. कारण होम्सने, त्याच्या सेवेबद्दलचा सरदारकीचा किताब अव्हेरला, त्याच महिन्यातील ती तारीख होती. मी भागीदार असून ठाम असल्याने, मला काळजीपूर्वक बोलून, बेजबाबदारपणा टाळायचा होता. मी परत सांगतो की, दक्षिण आफ्रिकेची लढाई संपल्यावरची, जून १९०२ च्या शेवटाकडील, अशी ती तारीख होती. थोडक्यात, त्याच्या वेळोवेळीच्या सवयीप्रमाणे, होम्सने पुष्कळ दिवस आळसात घालवले. पण एके दिवशी सकाळी, तो मोठा फुलस्केप कागद हातात घेऊन व त्याच्या कडक करड्या डोळयात, मनोरंजन झाल्याची छटा घेऊन, उठला.

"तुला काही पैसे मिळवायची संधी, चालून आली आहे. तू कधी गॅरीडेबचे, नाव ऐकले आहेस का?"

मी, ते न ऐकल्याचे कबूल केले.

"असे बघ, तू जर तू या गॅरीडेब प्रकरणात लक्ष घातलेस, तर तुला पैशाची प्राप्ती होईल."

"का?"

"ओहो, ती लांबलचक गोष्ट आहे -- जरा विचित्र अशी. आपल्या आत्तापर्यंतच्या विविध प्रकारच्या माणसांच्या अनुभवविश्वात, असे काही आपण पाहिलेले नाही. तो मनुष्य, इथे खात्री करण्यासाठी येतो आहे. त्यामुळे, मी अधिक काही सांगत नाही. पण आपल्याला हवे असलेले, असे ते नाव आहे"

माझ्या शेजारील टेबलावर फोनची डिरेक्टरी पडली होती. मी निरर्थकपणे तिची पाने चाळू लागलो. कसे कुणास ठाऊक पण, योग्य जागी ते विचित्र नाव, तिथे होते. मी विजयोन्मादाने ओरडलो.

"होम्स, हे बघ. ते नाव इथे आहे."

होम्सने माझ्या हातातून, फोनची डिरेक्टरी घेतली.

त्याने वाचले, " 'नाथन गॅरीडेब, १३६, रायडर रस्ता, अँटॉप हिल'. माझ्या प्रिय वॉटसन, मी दिलगीर आहे, कारण, त्याच्या पत्रावर जो पत्ता आहे, तो खरा माणूस आहे. तो पत्ता जुळला पाहिजे."

मिसेस हडसन, एका ट्रेमध्ये एक कार्ड घेऊन आली. मी ते कार्ड घेऊन, न्याहाळले.

"हे बघ इथे काय आहे. वेगळी आद्याक्षरे आहेत. 'जॉन गॅरीडेब, कायदा सल्लागार, मुरव्हील, कन्सास, अमेरिका'." मी आश्चर्याने म्हणालो.

कार्डाकडे बघून होम्स हसला व बोलला, "मला वाटते वॉटसन, तुला अजून प्रयत्न करायला लागेल. हा माणूसदेखील, या प्रकरणात आधीपासून आहे. परंतु आज सकाळी तो आपल्याला भेटेल, अशी अपेक्षा मी करत नव्हतो. पण मला हवे असलेले बरेच काही, तो सांगू शकतो."

थोड्या वेळाने तो इथे हजर झाला. कायदा सल्लागार, मिस्टर जॉन गॅरीडेब. हा एक बुटका, दणकट, गोल चेहऱ्याचा, घोटून दाढी केलेला, अनेक अमेरीकनांसारखाच, एक मनुष्य होता. एकंदरीत पहाता, तो पोरकट, गुबगुबीत व

मोठ्या हसऱ्या चेहऱ्याचा तरूण, दिसत होता. त्याचे डोळे मात्र नजर खिळवणारे, दिसत होते. कुठल्याही माणसात क्वचितच आढळणारे असे त्याचे डोळे, आतल्या गाठीचे, तेजस्वी, दक्ष व प्रत्येक विचारागणिक, लगेच बदलणारे दिसत होते. त्याचे उच्चार अमेरिकन होते. पण ते काही वेगळे, विचित्र असे वाटत नव्हते.

आमच्या दोघांकडे आळीपाळीने बघत तो म्हणाला, "मिस्टर होम्स? हो. हो. मी असे म्हणू शकतो, की तुमचे चित्र, बरोबर तुमच्यासारखेच आहे. मिस्टर नाथन गॅरीडेब, या माझ्यासारखेच नाव असलेल्या माणसाचे पत्र तुम्हाला मिळाले असेल, असे मी गृहीत धरून चालतो, नाही का?"

शेरलॉक होंम्स म्हणाला, "आपण बसा. मला वाटते, आपल्याला बरेच काही बोलायचे आहे. पत्रात लिहिल्याप्रमाणे, तुम्ही अर्थात मिस्टर जॉन गॅरीडेब आहात. आणि तुम्ही नक्कीच काही काळ, इंग्लंडमध्ये रहात होतात."

"तुम्ही असे कशावरून म्हणता, मिस्टर होम्स?" मला त्या भावदर्शक डोळ्यांमध्ये, अचानक संशय दिसल्यासारखे वाटले.

"तुमचा पूर्ण गेट - अप इंग्लिश वाटतो आहे."

मिस्टर गॅरीडेब, उसने हसू हसले. "मिस्टर होम्स, मी तुमच्या युक्त्या-प्रयुक्त्यांविषयी ऐकून होतो. पण त्याचा प्रयोग, माझ्यावर होईल, असे मला कधी वाटले नव्हते. हे विधान, तुम्ही कशावरून करता?"

"तुमच्या कोटाच्या खांद्याचा आकार, बुटांची टाच -- हे पाहिल्यावर कोणाला काय संशय उरणार?"

“असो. असो. मला कल्पना नव्हती, की मी ब्रिटीश असल्याचे, इतके सहज कोणी ओळखेल. पण काही काळापूर्वी, व्यापाराने मला इथे आणले. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे, माझा एकंदर पोषाख, लंडनचा आहे. तरीही, माझ्या कल्पनेप्रमाणे तुमचा वेळ महत्वाचा आहे, असे मला वाटते. आपण काही माझ्या मोज्यांचा आकार कसा आहे, हे बोलण्यासाठी भेटलो नाही आहोत. तुम्ही हातात धरलेल्या कागदातील मजकुराबद्दल बोलायाला, मला वाटते, आपण सुरवात करुया.“

त्या भेटायला आलेल्या पाहुण्याचा गुबगुबीत चेहरा, होम्सच्या काही करणीने, अगदी कमी मित्रत्वाचा भाव दाखवत होता.

माझा मित्र शांत आवाजात म्हणाला, “थोडे सबुरीने, मिस्टर गॅरीडेब. डॉ वॉटसन तुम्हाला सांगेल, की हे माझे थोडे विषयांतर, हे अंतिमतः, कामाच्या फायद्याचे ठरू शकते. पण मिस्टर नाथन गॅरीडेब, तुमच्याबरोबर का नाही आले?”

आमचा पाहुणा अचानक रागारागाने ओरडला, “तुम्हाला, त्याच्याशी काय करायचे आहे? दोन सभ्य गृहस्थांमध्ये काही व्यवहार झाला आणि त्यातील एकाला, गुप्तहेराची मदत घेण्याची गरज भासली. आज सकाळी तो मला भेटला व त्याने मला, हे मूर्ख पाऊल उचलल्याचे सांगितले. आणि म्हणून, मी इथे आलो आहे. पण मला त्याबद्दल, फार चांगले वाटत नाही आहे.”

“मला वाटते की त्या गोष्टीचा, तुमच्यावर एवढा काही परिणाम व्हायचे कारण नाही. हा त्याने त्याच्या बाजूने दाखवलेला उत्साह आहे, जो मला वाटते त्याप्रमाणे, तुमच्या दोघांच्याही दृष्टीने महत्वाचा आहे. त्याला वाटत होते की, मला

तिसऱ्या गॅरीडेबबद्दल माहिती मिळू शकेल, आणि म्हणून अगदी सहज त्याने माझी मदत मागितली."

आमच्या पाहुण्याचा रागीट चेहरा, हळूहळू शांत झाला.

तो बोलला, "ठीक आहे मग. हे जरा वेगळे वाटते आहे. जेव्हा मी सकाळी त्याला भेटायला गेलो, तेव्हा त्याने मला गुप्तहेराकडे हे प्रकरण सोपवल्याचे सांगितले, तेव्हा मी तुमचा पत्ता घेऊन, सरळ इथे आलो. या खासगी प्रकरणात, पोलिसांचे काही काम आहे, असे मला वाटत नाही. पण तुम्ही आम्हाला, तो माणूस शोधायला मदत करणार असाल, तर मग सगळे ठीक आहे."

होम्स म्हणाला, "असे सर्व आहे तर. आणि सर, आता तुम्ही इथे आहात, तर तुम्ही तुमच्या तोंडाने सर्व सांगितलेत, तर बरे होईल. माझ्या या मित्राला ही हकीगत पूर्णपणे, माहिती नाही."

मिस्टर गॅरीडेबनी मला फार मित्रत्वाने नव्हे, पण आपादमस्तक न्याहाळले, व विचारले, "त्याना माहिती होणे जरुरीचे आहे का?"

"आम्ही सहसा, बरोबर काम करतो."

"ठीक आहे. ते सर्व गुप्त ठेवायचे, काही कारण नाही. मी थोडक्यात सर्व काही सांगतो. जर तुम्ही कन्सासला आलात, तर तुम्हाला मी अलेक्झांडर हॅमिल्टन गॅरीडेब कोण आहे, हे सांगायची गरज उरणार नाही. त्याने स्थावर मालमत्तेच्या व्यापारामध्ये आणि मग शिकॅगोच्या गव्हाच्या व्यापारात, बरेच पैसे मिळवले. मग त्याने अर्कान्सस नदीजवळील डॉज किल्ल्याच्या पश्चिमेकडील, जेवढी जमीन विकत घेता येईल तेवढी घेतली. बांधकामासाठी लागणारे लाकूड ज्या झाडांपासून मिळते

त्या झाडांची व कुरणे असलेली, अशी ती शेतजमीन होती. त्यात खनिजेही होती आणि मालकाला डॉलरमध्ये भरपूर उत्पन्न देणारी, अशी ती जमीन होती.

त्याला जवळचे असे कोणी नव्हते, किंवा असल्यास, मी तरी ऐकलेले नाही. पण त्याच्या नावातील विचित्रपणाबद्दल, त्याला अभिमान वाटू लागला. त्यामुळे आम्ही जवळ आलो. मी टोपेका येथे, कायद्याची कामे करत होतो. एक दिवस एक म्हातारा मनुष्य, मला भेटायला आला. त्याच्यासारखेच नाव असलेला दुसरा माणूस त्याला भेटल्यामुळे, तो फारच आनंदी झाला. तरीही गॅरीडेबना भेटणे हा त्याचा आवडता उद्योग होता. जगात आणखी कुणी गॅरीडेब आहे का, हे त्याला शोधून काढायचे होते. 'अजून कोणी दुसरे गॅरीडेब आहेत का ते माझ्यासाठी शोधून काढ.' तो म्हणाला. मी त्याला बोललो, "मी उद्योगी मनुष्य आहे व गॅरीडेबना जगभर शोधत बसायला, मला वेळ नाही." तो म्हणाला, "तरीही, मी ठरवल्याप्रमाणे सर्व घडत गेले तर, तू ते करशील." मला वाटले, तो चेष्टा करतो आहे. पण लगेचच माझ्या लक्षात आले, की ते जरबेने उच्चारलेले शब्द होते. ते शब्द उच्चारल्यानंतर, एका वर्षाच्या आत तो मेला. त्याने मागे, त्याचे इच्छापत्र ठेवले होते. कन्सास राज्यातील सर्वात विचित्र, असे ते मृत्युपत्र होते. त्याने त्याच्या संपत्तीचे, तीन भाग केले होते. त्यातील एक मला या अटीवर देण्यात आला होता, की मी दोन गॅरीडेब शोधून काढून, त्याना ते उरलेले दोन भाग द्यावेत. तिघांपैकी प्रत्येकाला पाच लाख डॉलर होते. पण आम्ही तिघे एकत्र आल्याशिवाय त्यातील एकही पैसा कुणाला मिळू शकत नव्हता.

ही इतकी मोठी संधी होती, की मी माझे कायद्याचे काम, खूप कमी केले व गॅरीडेबना शोधून काढायच्या कामाला लागलो. अमेरिकाभर मला कोणीही सापडला नाही. सर, मी अगदी बारकाईने शोधण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. मग मी जुन्या

जागा शोधल्या. लंडनच्या फोन डिरेक्टरीमध्ये, मला तसे एक नाव सापडले. मी दोन दिवसापूर्वी त्याचा शोध घेतला व त्याला सर्व काही समजावून सांगितले. तो पण माझ्यासारखाच, एकटा मनुष्य आहे. त्याला काही नातेवाईक महिला आहेत. पण नातेवाईक पुरुष कोणी नाहीत. मृत्युपत्रानुसार, तीन माणसे लागत होती. त्यामुळे तुमच्या लक्षात येईल की अजूनही, तशी तीन माणसे सापडलेली नाहीत. तुम्ही आमचे हे काम केलेत, तर आम्ही तुम्हाला, तुमची जी काही फी असेल ती देऊ."

होम्स हसून म्हणाला, "वॉटसन, मी तुला म्हटले नव्हते का, की हे जरा विचित्र प्रकरण आहे. सर, मी असा विचार केला असता की, वर्तमानपत्रातील दुःखद बातम्यांच्या रकान्यात यासंबंधी जाहिरात देणे योग्य ठरेल."

"मी ते केले, मिस्टर होम्स. पण काही प्रतिसाद मिळाला नाही."

"अरेरे, खरंच ही खात्रीपूर्वक लहानशी, पण विचित्र समस्या आहे. मी माझ्या रिकाम्या वेळात, याकडे नजर टाकेन. तसेही, तुम्ही टोपेकाहून आलात, हे थोडे नवल वाटण्याजोगे आहे. १८९० मध्ये महापौर असलेला, वयस्क, मधल्या दुव्याचे काम करणारा, डॉ लायसँडर माझ्याकडे होता, आता तो वारला.

"हो. हो. तो प्रसिध्द होता. त्याचे नाव अजूनही आदराने घेतले जाते. मला वाटते, या केसच्या बाबतीत तुम्हाला वेळोवेळी अहवाल पाठवून प्रगती कळवायचे काम, आम्ही करू शकतो. एक दोन दिवसात, तुम्ही अंदाज बांधू शकाल." असे आश्वासन देऊन व अभिवादन करून, तो अमेरिकन पाहुणा निघून गेला.

होम्सने त्याचा पाईप पेटवला आणि चेहऱ्यावर उत्सुक असे हास्य ठेऊन, तो काही वेळ शांत बसला.

शेवटी मी विचारले, “काय करायचे?”

“वॉटसन, मी निव्वळ आश्चर्यचकित झालो आहे.”

“कशामुळे?”

होम्सने तोंडातून पाईप काढला. ”वॉटसन, मी आश्चर्य करतो आहे की, या माणसाला अशी लांबलचक, गुंतागुंतीची व खोटी अट आपल्याला सांगायचे, कारण तरी काय असावे. मी त्या अमेरीकनाला जवळजवळ तसे विचारले -- कारण अशा वेळी क्रूरपणे सरळसरळ हल्ला करणे, हाच चांगला उपाय असू शकतो. पण त्याने आपल्याला मूर्ख बनवले आहे हे त्याला कळावे, अशी अपेक्षा मी करतो आहे. कोपरात चुरगळलेला कोट, वर्षापूर्वीची गुडघ्यात घडी पडलेली पँट घातलेला हा खेडवळ माणूस, त्याच्याकडील कागद दाखवून खोटे बोलणारा, आत्ताच अमेरिकेहून लंडनला आलेला मनुष्य वाटतो. वर्तमानपत्रातील दुःखद बातम्यांच्या रकान्यात, काहीही जाहिरात आलेली नाही. पक्ष्याला पिंजऱ्यात कोंडायला, त्या जाहिराती माझ्या आवडत्या आहेत. अशा प्रकारची जाहिरात माझ्या नजरेतून निसटणे, शक्यच नाही. टोपेकाचा डॉ लायसँडर माझ्याकडे कधीच नव्हता. प्रत्येक बाबतीत मिस्टर जॉन गॅरीडेब, खोटा ठरतो आहे. मला वाटते, तो खरा अमेरिकन आहे, पण त्याने लंडनमध्ये बरेच दिवस राहून त्याचे उच्चार, गुळगुळीत बनवले आहेत. त्याचा काय डाव आहे व गॅरीडेबना शोधायचे त्याचे काय मूर्खपणाचे नाटक आहे, ते बघायला हवे. हे काहीतरी लक्ष देण्याजोगे आहे. तो मनुष्य धूर्त, ठग व काहीतरी गुंतागुंतीचा वाटतो. आता तो दुसरा मनुष्यदेखील, तसाच आहे की काय, ते बघायला हवे, वॉटसन, त्या नाथन

गॅरीडेबला फोन कर बघू. मी तसे केले, तेव्हा पलीकडून बारीकसा, थरथरणारा आवाज आला.

“हो. हो. मी नाथन गॅरीडेब आहे. मिस्टर होम्स, तिथे आहेत का? मला त्यांच्याबरोबर बोलायला आवडेल.”

माझ्या मित्राने फोन घेतला आणि नेहमीचा हळू आवाजातील अर्धवट संवाद, माझ्या कानावर पडला.

“हो. तो इथे आला आहे. मला माहिती आहे त्याप्रमाणे, तुम्ही त्याला ओळखत नाही. -- कधीपासून? फक्त दोन दिवस! हो, हो. अर्थात, हे फारच रुचीपूर्ण भविष्य असलेले आहे. आज संध्याकाळी तुम्ही घरी असाल का? मी अशी आशा करतो की तुमच्या नावावर, मला अजून कोणी भेटणार नाही. --- छान. छान. मग तुम्ही याल तर. कारण मला तो नसताना, तुमच्याशी बोलायचे आहे. --- माझ्याबरोबर डॉ वॉटसन असेल. -- मला तुमच्या चिठ्ठीवरून असे समजले की तुम्ही सहसा बाहेर जात नाही – मग आम्हीच साधारण सहा वाजता येतो. तुम्ही ते अमेरिकन वकिलाला सांगायची गरज नाही. -- ठीक आहे तर मग, अच्छा.”

छानशा वसंत ऋतुतील, ती संध्याकाळ होती. लहानशा एग्वेअर रस्त्यापासून फुटलेला रायडर रस्ता, उतरत्या सूर्यकिरणात सोनेरी व वेगळाच दिसत होता. प्रशस्त, जुन्या वळणाच्या, जॉर्जियन काळाच्या सुरवातीचे बांधकाम असलेल्या, चपट्या विटांचा दर्शनी भाग असलेल्या अशा, घराच्या दिशेने आम्ही चाललो होतो. त्यात तळमजल्याला, दोन मोठ्या खिडक्या होत्या. आमचा अशील तळमजल्यावर रहात होता. त्या मोठ्या खिडक्या असलेल्या लांबट खोलीत, तो

त्याचा दिवसाचा वेळ घालवत होता. आम्ही त्यावरून जाताजाता, रंग उडालेल्या लहानशा ब्रासच्या, उत्सुकता वाढवणाऱ्या नावाच्या पाटीकडे, होम्सने निर्देश केला.

ते विचित्र नाव लिहिलेल्या त्या जुनाट पाटीकडे बोट दाखवत, होम्स म्हणाला, "वॉटसन, ही पाटी काही वर्षांपूर्वीची असल्याचे कळते आहे व हेच त्याचे खरे नाव आहे. आणि ते नीट लक्ष देऊन बघ."

त्या घराला एक सर्वांकरता असलेला जिना होता. तिथे काही खासगी, तर काही कार्यालये असलेल्या पाट्या होत्या. ही काही इथे रहाणाऱ्या लोकांची इमारत, वाटत नव्हती, तर बोहेमिअन, लग्न न झालेल्या लोकांची वसाहत वाटत होती. येथे काम करणारी बाई, चार वाजता येथून गेली, असे सांगून माफी मागत, आमच्या अशीलाने आमच्यासाठी स्वतःच, दार उघडले. मिस्टर नाथन गॅरीडेब हा खूप उंच, सहज हालचाल करणारा व गोलाकार पाठ असलेला, साधारण साठीचा इसम होता. रुक्ष मेल्या कातडीचा, प्रेतासारखा चेहरा असलेला व व्यायाम माहितीदेखील नसलेला, असा तो दिसत होता. बोकडासारखी दाढी बाहेर आलेला, मोठा गोल चष्मा असलेला, झुकणाऱ्या दृष्टीचा, असा तो नवलपूर्ण हावभावाने, बघत होता. तरीही सर्वसाधारण परिणाम मित्रत्वाचा व चांगला, तरीही थोडा चक्रम वाटत होता.

ती खोली, त्यात रहाणाऱ्याइतकीच, चमत्कारीक होती. ती एखाद्या छोट्याशा वस्तूसंग्रहालयासारखी, दिसत होती. कपाटे व कप्पे सभोवार असलेल्या, रुंद व खोल अशा त्या खोलीत, भूगर्भशास्त्रीय व शरीरशास्त्र विषयक नमुने, ठासून भरले होते. आत शिरायच्या दाराच्या इथे फुलपाखरे व अळ्यांचे नमुने लटकत होते. मध्यभागी असलेल्या टेबलावर, तुटकेफुटके अवशेष पडले होते. शक्तिशाली

सूक्ष्मदर्शकाची ब्रासची नळी त्या सर्वामध्ये पडली होती. मी चहुकडे पाहिले आणि जगात सर्वत्र असलेल्या मनुष्याच्या रुचीपूर्णतेने, मी आश्चर्यचकित झालो. गारगोटीच्या दगडाची आयुधे असलेला, एक भाग होता. मध्यभागी असलेल्या टेबलाच्या मागे हाडांचे अवशेष होते. निअॅनडर्थल, हायडेलबर्ग, क्रोमॅगनॉन अशी नावे दिलेल्या प्लास्टरच्या कवट्या वर एका ओळीत टांगलेल्या होत्या. असे स्पष्ट दिसत होते, की तो अनेक विषयांचा विद्यार्थि होता. आता तो जेव्हा आमच्या समोर उभा ठाकला, तेव्हा त्याच्या उजव्या हातात, काळविटाच्या चामड्याचा तुकडा होता व त्याने तो एका नाण्याला चकाकी आणत होता.

"सायराक्युसन -- सर्वोत्तम काळ", त्याने तो तुकडा हातात धरून स्पष्टीकरण दिले, "जास्त प्रमाणात, तो शेवटी हळूहळू नाहीसा झाला. काहीजण अलेक्झांड्रीअन विचारसरणी मानत असले, तरी मी त्याना त्या काळातील सर्वोत्तम मानतो. मिस्टर होम्स, तुम्हाला इथे एक खुर्ची दिसेल. कृपया, मला या हाडांचे काम पूर्ण करु दे. आणि तुम्ही -- डॉ वॉटसन, तुम्ही जरा ती जपानी फुलदाणी बाजूला ठेऊ शकलात तर, फार बरे होईल. माझ्या आयुष्यातील, माझ्या आवडीच्या असलेल्या वस्तू, तुम्हाला सभोवताली दिसतील. माझा डॉक्टर मला, कधीही बाहेर न जाण्यावरून छेडतो. पण मला इतके काम असताना, मी बाहेर का जावे? तुम्हाला सांगतो, यातील एका कप्प्यातील वस्तूंची योग्य अशी नोंद ठेवायला, मला तीन महिने लागतात."

होम्सने स्वतःच्या भोवताली, कुतुहलाने पाहिले.

त्याने विचारले, "तू कधीच बाहेर जात नाहीस, असे तू मला म्हणालास?"

"आता परत सांगतो. मी खाली सॉथेबाय किंवा ख्रिस्टी इथे कधीकधी जातो. नाहीतर अगदी क़्वचित मी माझी खोली सोडतो. मी काही, फार बळकट नाही. आणि माझे संशोधनाचे काम, खूप दमवणारे आहे. पण मिस्टर होम्स, तुम्ही कल्पना करू शकता, की हे पैसे मिळायचे, किती आनंददायी पण भयानक असे वेगळेच, चांगले भविष्य मला वाटले असेल. हे प्रकरण पूर्ण होण्यासाठी अजून एक गॅरीडेब मिळायची गरज आहे, आणि नक्की आम्हाला तो मिळेलच. मला एक भाऊ होता. पण तो वारला. आणि महिला नातेवाईक अटीत बसत नाहीत. पण जगात अजून कोणीतरी गॅरीडेब असतीलच. मी असे ऐकले आहे, की तुम्ही विचित्र प्रकारच्या समस्या हाताळलेल्या आहेत आणि म्हणून मी तुम्हाला, भेटलो आहे. अर्थात हा अमेरिकन सभ्य गृहस्थ, बरोबर आहे. मी त्याचा सल्ला प्रथम घ्यायला हवा होता. पण मी उत्कृष्टतेच्या मागे आहे."

होम्स म्हणाला, "खरंच, तू अगदी शहाणपणा दाखवला आहेस. पण अमेरिकेतील संपत्ती मिळवण्यासाठी, तू खरोखर राजी आहेस का?"

"अर्थातच नाही. सर माझे काम सोडून, मला कसलाही मोह नाही. पण हा गृहस्थ मला सर्व पूर्तता झाली, की विकत घेणार म्हणतो आहे. पाच लक्ष डॉलर इतकी रक्कम मिळणे, अपेक्षित आहे. माझ्या संग्रहात भर घालतील असे, जगात अजून हजारो नमुने पडले आहेत, आणि ते विकत घ्यायला पुरेसे पौंड माझ्याकडे नाहीत. पाच लाख डॉलर इतकी रक्कम मला मिळाल्यास, मी काय काय करू शकतो! जरा विचार करा. मी राष्ट्रीय संग्रहाचे केंद्रस्थान ठरेन. माझ्या काळातील मी श्रेष्ठ ठरेन." चष्म्यामागे त्याचे डोळे चकाकले. पण हे अगदी स्पष्ट होते, की तिसरा माणूस शोधायला तो काही प्रयत्न करेल, असे वाटत नव्हते.

“मी फक्त तुमची ओळख होण्यासाठी, तुम्हाला भेटायला आलो. नाहीतर तुमचा कामाचा वेळ मी फुकट घालवण्याचे, दुसरे काहीही कारण नाही. मी ज्यांच्यासाठी काम करतो, त्यांच्याशी माझे व्यक्तिशः संबंध असावेत, असे मला वाटते इतकेच. मला काही प्रश्न विचारायचे आहेत. या आठवड्यापर्यंत, तुम्हाला हा अमेरिकन गृहस्थ माहिती नव्हता आणि मी त्याला भेटलो, तेव्हा मी गाळलेल्या जागा भरल्या.” होम्स बोलला.

“हे बरोबर आहे. तो मला मागच्या, मंगळवारी भेटला.”

“त्याने तुम्हाला, आमच्या आजच्या भेटीबद्दल सांगितले का?”

“हो. तो तुमच्याकडून, सरळ इथेच आला. तो फार रागावला होता.’

“तो रागवायचे काय कारण?”

“त्याला असे वाटले, की त्याचा पुसटसा अपमान झाला. पण नंतर तो परत आला, तेव्हा अगदी आनंदी होता.”

“त्याने काही करण्याचे, ठरवले का?”

“नाही सर, तसे काही नाही.”

“त्याने तुमच्याकडे, काही पैसे मागितले का?”

“नाही सर, मुळीच नाही.”

त्याच्यापुढे काही निश्चित असे ध्येय असल्याचे, तुम्हाला जाणवले का?”

“नाही. तो जे काही बोलत होता, तेवढेच.”

"तुम्ही त्याला आपण फोन करून भेटायचे ठरवल्याचे, सांगितले का?"

"हो सर, मी सांगितले."

होम्स विचारात पडला. मला तो चक्रावून गेल्याचे, दिसले..

"तुमच्या संग्रहात, एखादी किमती वस्तू आहे का?"

"नाही सर, मी काही श्रीमंत मनुष्य नाही. माझा संग्रह चांगला आहे, पण मौल्यवान नव्हे.

"तुम्हाला चोरांची, भीती वाटत नाही का?"

"जराही नाही."

"तुम्ही इथे कधीपासून रहाता?"

"साधारण पाच वर्षे."

दारावरच्या थापेमुळे होम्सच्या उलट तपासणीत अडथळा आला. आमच्या अशीलाने दार उघडताच, अमेरिकन वकील, उत्तेजित होऊन आत शिरला.

"तू इथे आहेस तर! मला वाटले, मी तुला वेळेवर गाठीन. मिस्टर नाथन गॅरीडेब, अभिनंदन! आता तू एक श्रीमंत माणूस आहेस. आपला कार्यभाग यशस्वीपणे संपला आणि सर्व काही उत्तम झाले. मिस्टर होम्स, आम्ही तुम्हाला फुकटचा त्रास दिल्याबद्दल, माफी मागतो." त्याच्या डोक्यावर एक कागद फडफडवत, तो म्हणाला. त्याने तो कागद आमच्या अशीलाच्या हातात दिला. अशील त्यातील ठळक

जाहिरातीकडे, रोखून बघत राहिला. होम्स व मी दोघांनी त्याच्या खांद्यावरून पुढे वाकून, असे वाचलेः

हॉवर्ड गॅरीडेब

शेतीची अवजारे बनवणारा

बांधायची साधने, कापणी मशीन, वाफेवर व हाताने चालणारा नगर, भोके पाडायचे मशीन, मातीची ढेकळे फोडायचे यंत्र, शेतकऱ्याची गाडी, विहिरीवर मोट बसवण्यासाठीचे अंदाजपत्रक, टांग आणि इतर बरेच काही.

"मी बर्मिंगहॅम मध्ये चौकशीची मोहीम उघडली आणि माझ्या तिथल्या दलालांनी मला, स्थानिक वर्तमान पत्रातली ही जाहिरात दाखवली. आपण आता घाई करून, गोष्ट तडीला न्यायला हवी. मी त्या माणसाला पत्र लिहून कळवले आहे, की तू उद्या त्याला चार वाजता, त्याच्या कार्यालयात भेटशील." जॉन गॅरीडेब म्हणाला.

"मी त्याला भेटावे, अशी तुझी इच्छा आहे?"

"मिस्टर होम्स, तुम्ही काय म्हणता? तुम्हाला हे शहाणपणाचे ठरेल, असे वाटते का? मी एक मजेशीर गोष्ट घेऊन फिरणारा, भटक्या अमेरिकन आहे. त्याने मी सांगेन त्यावर, विश्वास का ठेवावा. पण मिस्टर नाथन, तुम्ही ब्रिटीश आहात व इथे काही वर्षे रहात आहात. तुम्ही सांगितलेत, तर तो ऐकेल. तुमची इच्छा असेल, तर मी तुमच्याबरोबर येईन. पण मला उद्या खूप काम आहे आणि तुम्हाला काही अडचण आली, तर मी आहेच."

"असा प्रवास, मी अनेक वर्षात केला नाही." इति नाथन

"मिस्टर गॅरीडेब, त्यात एवढे विशेष काही नाही. आपण कुठे भेटायचे ते मी ठरवले आहे. तुम्ही बारा वाजता निघा. दोननंतर तुम्ही तिथे असाल. मग त्याच रात्रीपर्यंत तुम्हाला परतता येईल. तुम्हाला काय करायचे आहे, तर फक्त या माणसाला भेटायचे आहे, त्याला सर्व काही समजावून सांगायचे आहे आणि तो तिथे जिवंत असल्याचा पुरावा आणायचा आहे. मी मध्य अमेरिकेतून, एवढ्या लांबून आलो आहे. तर हे काम पूर्ण करण्यासाठी, तुम्हाला काही शे मैल जाणे नक्कीच फार नाही." जॉन गॅरीडेब थोड्या रागाने म्हणाला.

होम्स बोलला, "ठीक आहे. हे जे काही म्हणतात, ते अगदी खरे आहे."

मिस्टर नाथन गॅरीडेबनी त्रयस्थपणे व थोड्या नाराजीने खांदे उडवले. "ठीक आहे. तुम्ही आग्रह करत असाल, तर मी जातो. तुम्ही माझ्या आयुष्यात जी बहार आणत आहात, त्यामुळे तुम्हाला नाही म्हणणे, मला अवघड आहे."

होम्स त्याच्या घड्याळाकडे पाहून म्हणाला, "मग ठरले तर. आणि शक्यतो लवकरात लवकर, तुम्ही मला अहवाल पाठवालच."

अमेरिकन म्हणाला, "ते मी बघतो. बरं, आता मला निघायला हवे. मिस्टर नाथन, मी तुम्हाला उद्या फोन करतो आणि बर्मिंगहॅममध्ये तुम्हाला निरोप द्यायला येतो. मिस्टर होम्स, माझ्याबरोबर येत आहात का? नाहीतर मग अच्छा. उद्या रात्री आमच्याकडून, तुमच्यासाठी चांगली बातमी असेल."

जेव्हा अमेरीकनाने खोली सोडली, तेव्हा माझ्या मित्राचा चेहरा, मी उजळलेला पाहिला. काहीतरी अगम्य गोष्ट उलगडत नसल्याची खंत, आता नाहीशी झाली होती.

तो बोलला, "मिस्टर नाथन गॅरीडेब, तुमचा संग्रह पहायची माझी इच्छा आहे. माझ्या व्यवसायात, मला सर्व प्रकारचे ज्ञान उपयोगी पडते आणि आमच्याकडून पण तुमच्यासाठी, उद्या चांगली बातमी असेल."

आमचा अशील आनंदी झाला. चष्म्यामागून त्याचे डोळे चकाकले. तो म्ह्णाला, "सर, मी नेहमी तुमच्या हुशारीबद्दल ऐकले आहे. तुम्हाला वेळ असेल तर, आपण एक चक्कर मारू."

दुर्दैवाने, आत्ता मला वेळ नाही. पण ह्या वस्तूंचे व्यवस्थित वर्गीकरण करून, नमुन्याना योग्य अशी नावे दिलेली आहेत. त्यामुळे, खासगी स्पष्टीकरणाची, फारशी आवश्यकता नाही. जर मी उद्या ते पहायचे म्हटले तर, तुमची त्याला काही हरकत नसावी, असे मी घरून चालू का?"

"माझी मुळीच हरकत नाही. तुम्ही अवश्य या. पण, ही जागा बंद असेल. मिसेस साँडर चार वाजेपर्यंत इथे असेल व ती तुम्हाला कुलूप उघडून देईल."

"उद्या दुपारी मी नक्की येतो. जर तुम्ही मिसेस साँडरना सांगून ठेवलेत, तर बरे होईल. तसेही, तुमच्या घराची दलाल कोण आहे?"

एकदम विचारलेल्या प्रश्नाने, आमच्या अशीलाला नवल वाटले.

'एग्वेअर रस्त्यावरील होलोवे व स्टील. पण का?"

“मी थोडा वास्तूंच्या बांधकाम इतिहासाचा, अभ्यासक आहे. मी विचार करत होतो, की हे राणी ॲनच्या काळातील असावे की जॉर्जियन काळातील असावे.”

“संशयातीतपणे, जॉर्जियन काळातील.”

“खरे की काय! मला थोड्या आधीच्या काळातील वाटत होते. तरीही, तशी खात्री करणे, सोपे आहे. ठीक आहे. अच्छा. तुमच्या बर्मिंगहॅम सफरीसाठी शुभेच्छा.”

घराच्या दलालाचे कार्यालय जवळच होते पण त्या दिवशी बंद होते. त्यामुळे आम्ही, बेकर रस्त्याला परत गेलो. रात्रीच्या जेवणानंतर, होम्स त्या विषयाकडे वळला.

“आपली छोटी समस्या, सुटण्याच्या मार्गावर आहे. तू तुझ्या मनाशी, ती सोडवण्याचा आराखडा, तयार केला असशील.”

“मला, ती काहीच सुटलेली नाही.”

“मला अर्धवट सुटली आहे. बाकीची उद्या बघू. तुला त्या जाहिरातीत, काही वेगळे वाटले नाही?”

“नांगर हा शब्द चुकीचा लिहिला होता.”

“ओहो, तुझ्या ते खरंच लक्षात आले का? अरे वा वॉटसन, तुझ्यात सुधारणा होते आहे. ते चांगले अमेरिकन पण वाईट इंग्लिश होते. जसे दिले तसे ते छापले गेले असणार. टांगा शब्द पण तसाच चुकीचा लिहिलेला, होता. पण तो शब्द अमेरिकनदेखील आहे. विहिरीवर मोट बसवण्यासाठीचे अंदाजपत्रक, हे आपल्यापेक्षा,

त्यांच्याकडे जास्त वापरले जाते. ही सरळसरळ अमेरिकन जाहिरात होती. पण इंग्लीश कंपनीने, ती केल्याचे भासवले होते. यावरून तू काय म्हणू शकतोस?"

"मी एवढेच म्हणू शकतो, की ती त्या अमेरिकनाने, स्वतः लिहिली होती. त्याने असे करायचे, कारण काय कुणास ठाऊक!"

"असे बघ, यासाठी वेगवेगळी स्पष्टीकरणे आहेत. कसेही करून त्याला त्या नाथनला बर्मिंगहॅमपर्यंत आणायचे होते. ते अगदी स्पष्ट आहे. मी त्याला म्हणू शकलो असतो, की हे सरळसरळ व्यर्थ कुणाचा तरी पाठलाग करण्यासारखे, आहे. पण नंतर विचार केल्यावर, मला असे वाटले, की त्याला जाऊ द्यावे. वॉटसन, उद्याचा -- उद्याचा दिवस, याबद्दल बोलेल."

दुसऱ्या दिवशी होम्स लवकर जागा होऊन, बाहेर पडला. जेव्हा तो जेवायच्या वेळी आला, तेव्हा त्याचा चेहरा मला पडलेला वाटला.

"वॉटसन, मी अपेक्षा करत होतो, त्यापेक्षा ही बाब जरा गंभीर आहे. तुझे डोके उगीच धोक्यात घातल्या सारखे, ते होईल. तरीही, हे तुला सांगितलेले, चांगले ठरेल. आत्तापर्यंत माझ्या लक्षात आले आहे, की यात धोका आहे. आणि हे तुला माहिती असलेले बरे."

होम्स, हा काही आपण जाणलेला, पहिलाच धोका नाही आणि शेवटचाही नसेल. या वेळेस नेमका काय धोका आहे?"

"ही एक अत्यंत अवघड केस आहे. मी वकिली सल्ला देणाऱ्या मिस्टर जॉन गॅरीडेबला, ओळखले आहे. तो किलर इव्हान्स आहे. तो काहीतरी वाईट घडवण्याबद्दल व खून करण्याबद्दल प्रसिध्द आहे."

"यातले काहीही, माझ्या लक्षात आले नव्हते."

'अरे, न्यूगेट (लंडनमधील तुरुंग) मधील कैद्यांची नावे लक्षात ठेवणे, हा काही तुझ्या व्यवसायाचा भाग नाही. मी स्कॉटलंड यार्ड मधील माझा मित्र लेस्ट्रेड, याला भेटायला गेलो होतो. काहीतरी प्रासंगिक गरजेपोटी झालेल्या अंतःस्फूर्तीने, मला त्या केसच्या आरपार बघण्याची पद्धत सापडली. मला अशी कल्पना सुचली, की आपण आपल्या अमेरिकन मित्राचे रेकोर्ड तपासावे. आणि खरंच मला त्याचा गुबगुबीत चेहरा चोरांच्या चित्रांच्या यादीत माझ्याकडे बघून हसताना सापडला. जेम्स विंटर उर्फ मोरेक्रॉफ्ट उर्फ किलर इव्हान्स अशी नावे खाली लिहिलेली होती." होम्सने त्याच्या खिशातून एक पाकीट काढले. "मी त्याच्याबद्दलच्या छापील माहितीतून, काही मुद्दे उतरवून घेतले. वय चव्वेचाळीस, शिकॅगो येथे रहाणारा, राज्यातील तीन माणसांना बंदुकीच्या गोळ्या मारणारा, सुधारगृहातून राजकीय बळाचा वापर करून, निसटून १८९३ यावर्षी लंडनला आलेला असा, आणि याशिवाय वॉटरलू रस्त्यावरील रात्रीच्या क्लबमध्ये जानेवारी १८९५ मध्ये पत्ते खेळताना, एका माणसाचा गोळी मारून खून केलेला, असा हा इसम आहे. क्लबमधील तो माणूस मेला. पण त्याने प्रथम गॅरीडेबला मारायचा प्रयत्न केला असे दाखवले गेले. मेलेल्या माणसाचे नाव, रॉजर प्रेसकॉट होते व तो शिकॅगोमधील खोट्या नोटा छापणारा व खोटी नाणी पाडणारा होता. किलर इव्हान्स १९०१ मध्ये तुरुंगातून सुटला. तेव्हापासून तो पोलिसांच्या निरीक्षणाखाली आहे. आणि आतापर्यंत सचोटीचे जीवन जगला आहे. सहसा पिस्तुल बाळगणारा व ते वापरण्याची तयारी असलेला असा तो, फार भीतीदायक आहे. तोच आपला खेळातील पक्षी आहे, बरका वॉटसन."

“पण त्याचा डाव आहे तरी काय?”

“हे बघ, सुरवातीपासून ते अगदी उघड आहे. मी घराच्या दलालाकडे गेलो होतो. आपला अशील काय सांगतो, तर तो इथे पाच वर्षे रहातो आहे. पण तो इथे येण्यापूर्वी एक वर्ष, ते रिकामे असल्याचे मला कळले व वाल्ड्रोन नावाचा एक इसम, आधीचा भाडेकरू होता हे उघड झाले. काही वर्षांपूर्वीचा वाल्ड्रोन कसा दिसतो, हे कार्यालयाला चांगले ठाऊक होते. तो काळा, उंच व दाढी असलेला मनुष्य होता. एकाएकी तो नाहीसा झाला व त्याच्याबद्दल नंतर काहीही समजले नाही. आता किलर इव्हान्सने ज्याला मारले, तो रॉजर प्रेसकॉटदेखील काळा, उंच व दाढी असलेला मनुष्य होता. म्युझियममधील ज्या जागी, आपला निरागस मित्र रहातो, तेथे पूर्वी हा प्रेसकॉट रहात असावा, असा माझा अंदाज आहे .म्हणजे शेवटी आपल्याला काहीतरी संबंध सापडला.”

“आणि पुढचा संबंध?”

“आता आपल्याला जाऊन, तो शोधून काढला पाहिजे.”

त्याने खणातून पिस्तुल काढून मला दिले.

“माझ्याकडे माझे जुने आवडते पिस्तुल आहे. जर आपल्या अमेरिकन रानटी मित्राने, त्याच्या टोपण नावाने रहाण्याचा प्रयत्न केला, तर त्यासाठी आपण तयार असले पाहिजे. आता मी तुला दुपारच्या विश्रांतीसाठी, तासाभराची सुट्टी देतो. नंतर, मला वाटते आपल्याला, रायडर रस्त्याच्या साहसासाठी निघावे लागेल.”

जेव्हा आम्ही नाथन गॅरीडेबच्या, उत्कंठावर्धक घरी पोचलो, तेव्हा चार वाजले होते. मिसेस साँडर, तेथील व्यवस्था बघणारी, बाहेर पडायच्या तयारीत

होती. पण आम्हाला आत घेण्यास, तिची काही हरकत नव्हती. दार बंद झाले आणि आम्ही निघण्यापूर्वी, होम्सने सर्व काही सुरक्षित असल्याचे बघितले. नंतर लगेच बाहेरचे दार बंद झाले व खिडकीतून मिसेस साँडरच्या डोक्यावरील, टोपी दिसली. खालच्या मजल्यावर आम्ही एकटेच असल्याचे, आमच्या लक्षात आले. होम्सने त्या परिसराचे, झटपट निरीक्षण केले. अंधाऱ्या कोपऱ्यात एक कपाट होते. ते थोडे भिंतीपासून थोडे लांब ठेवल्यासारखे दिसत होते. त्याच्यामागे आम्ही अंग वाकवून गेलो. होम्सने कुजबुजत्या आवाजात, त्याचा असे करण्याचा उद्देश सांगितला.

"मिस्टर जॉन गॅरीडेबला त्याच्या मित्राला, नाथनला, त्याच्या खोलीतून बाहेर काढायचे होते -- हे अगदी स्पष्ट होते. आणि -- तो कधीच बाहेर जात नसल्याने, तसे करायला थोडी आखणी करावी लागली. गॅरीडेबच्या या सर्व खटाटोपाला काही अंतच नव्हता. वॉटसन, मला यात काहीतरी वाईट प्रकारची, लबाडी दिसते आहे, हे मला तुला सांगितलेच पाहिजे. भाडेकरूच्या नुसत्या विचित्र नावामुळे त्याला, त्याने कधी अपेक्षा न केलेले कृत्य करायची, संधी मिळाली. त्याने मोठ्या लबाडीने त्याचे जाळे विणले.

"पण त्याला, हवे आहे तरी काय?"

"तेच तर आपल्याला शोधून काढायचे आहे. एकंदरीत मला असे दिसते आहे की आपल्या अशीलाशी याचा काही संबंध नसावा. त्याने खून केलेल्या माणसाशी संबंधित असे काहीतरी असावे. मला वाटते तो त्याचा गुन्ह्यातील भागीदार असावा. या खोलीत काही गुन्हेगारी गुपित दडलेले आहे, असा मला संशय आहे. पहिल्यांदा मला वाटले, की आपल्या मित्राच्या संग्रहात काही मौल्यवान असावे, जे त्याला

माहिती नाही. पण एखाद्या तरबेज गुन्हेगाराचा त्यावर डोळा असावा. पण रॉजर प्रेसकॉट हा पापी माणूस इथे राहीला होता, त्याअर्थी त्याचे काही खोलवर कारण असावे. वॉटसन, आपल्याला थोडा धीर धरून, काय काय घडते आहे त्यावर नजर ठेवायला हवी."

आश्चर्यकारक रित्या, हा धीर धरायचा काळ फार नव्हता. आम्ही लपून बसलेलो असताना, बाहेरचे दार उघडून लावल्याचा आवाज आला. नंतर धातूचा काही धारदार आवाज आला व अमेरिकन खोलीत अवतीर्ण झाला. त्याने त्याच्यामागे, हळूच दार लावले. सर्व ठाकठीक असल्याची खात्री करण्यासाठी, चौफेर शोधक नजर टाकली. त्याच्या अंगातील मोठा कोट काढला. नेमके काय व कसे करायचे आहे हे पक्के माहिती असलेला भाव, त्याच्या चेहेऱ्यावर होता. तो मध्यभागी असलेल्या टेबलाकडे घाईघाईने चालत गेला. त्याने टेबल एका बाजूला ढकलले. त्याखालील कार्पेटचा चौकोन फाडला व व तो मागे गुंडाळून ठेवला. मग खिशातून एक हिरा काढून, तो गुडघ्यावर वाकून खाली बसला. जमिनीवर जोराने काहीतरी करू लागला. नंतर आम्ही दोन पृष्ठभाग एकमेकावर घासल्याचा आवाज ऐकला. क्षणभरात एक प्लायवूडचा चौकोन उघडला. जॉन गॅरीडेबने उर्फ किलर इव्हान्सने काडी ओढून, मेणबत्ती लावली व दिसेनासा झाला.

लख्खपणे, आम्ही वाट बघत असलेला, क्षण आला. होम्सने खूण म्हणून, माझ्या मनगटाला स्पर्श केला आणि आम्ही दोघेही त्या विवरामधून आत शिरलो. परंतु आमच्या पावलाखालील प्लायवूडचा आवाज आला असावा. कारण त्या अमेरीकनाचे डोके, दचकून उघड्या जागेतून अवतरले. आमच्याकडे त्याचा खुनशी चेहरा वळला. आमच्या दोघांच्या हातातील त्याच्यावर रोखलेली पिस्तुले बघून मात्र,

तो खुनशी चेहरा हळूहळू, थोड्या लज्जित हसऱ्या चेहऱ्यात बदलला. ओहोहो, असे उद्गारत तो थंडपणे, उताराच्या पृष्ठभागावरून चालू लागला. "मिस्टर होम्स, मला वाटते, तुम्ही दोघे माझ्याकरता, फार भारी आहात. मला वाटते माझा खेळ संपला आहे. सर, मी हे तुमच्या हवाली करतो. तुम्ही माझ्यावर, कुरघोडी केली आहे. -- "

अचानक क्षणार्धात, त्याने त्याच्या छातीखालून पिस्तुल काढले आणि दोन गोळ्या चालवल्या. मला मांडीजवळ गरम लाल लोखंड चाटून गेल्यासारखे वाटले. होम्सचे पिस्तुल त्याच्या डोक्यावर रोखले गेल्याचा आवाज आला व त्याच्या चेहऱ्यामधून जमिनीवर रक्त वाहताना मी पाहिले. होम्सने त्याच्याकडे अजून काही शस्त्र आहे का, हे तपासून बघितले. माझ्या मित्राने त्याचे वायरीसारखे हात, माझ्या गळ्यात टाकून, मला एका खुर्चीकडे नेले.

"वॉटसन, तुला लागले नाही ना? देवाच्या कृपेने, तुला काही लागले नसल्याचे सांग."

मला जखम झाली होती -- अनेक जखमांएवढी, ती मोठी होती – त्याच्या थंड चेहऱ्यामागे असलेल्या प्रेमाची व नेकीची, मला जाणीव झाली. कठोर, कोरडे डोळे, थोडे लुकलुकले आणि घट्ट मिटलेले ओठ थरथरत होते. या एकमेव वेळी, मला त्याच्या हृदयाच्या विशालतेची व हुशार डोक्याची जाणीव झाली. एवढे वर्षांच्या माझ्या नम्र व मनापासून केलेल्या सेवेचा, नकळत कळसाध्याय गाठला गेला होता.

"विशेष काही नाही. होम्स, थोडेसे खरचटले आहे." त्याने त्याच्या खिशातील चाकूने माझ्या पँटचा तुकडा कापला. मोठ्या सुटकेच्या भावनेने निःश्वास टाकत, तो बोलला, "तुझे खरे आहे. ही वरवरची जखम आहे. घाबरलेल्या चेहऱ्याने

बसलेल्या, त्या कैद्याकडे बघताना, होम्सचा चेहरा काचेसारखा कठोर झाला. "देवाच्या कृपेने, तुझे ठीक चालले आहे. जर तू वॉटसनला ठार मारले असतेस, तर या खोलीबाहेर तू जिवंत जाऊ शकला नसतास. आता तुला, तुझ्याबद्दल काय सांगायचे आहे?"

त्याला स्वतःबद्दल, काहीच सांगायचे नव्हते. तो नुसता बसून, रागाने धुमसत राहिला. मी होम्सच्या हातावर रेललो व दोघांनी मिळून, आम्ही जिथून एका प्लायवूडच्या गुप्त विवरातून आलो, त्या लहानशा तळघराकडे पाहिले. इव्हान्सने आत शिरताना काडी ओढून लावलेली मेणबत्ती अजून जळत होती. गंजलेल्या मशिनरीकडे, कागदांच्या गुंडाळ्यांकडे व बाटल्यांच्या कचऱ्याकडे, आमचे लक्ष गेले. छोट्या टेबलावर खूपशी लहान बंडले रचून ठेवली होती.

होम्स म्हणाला, "छापखाना -- कुणालातरी फसवण्यासाठी केलेली, ती नोटांची नक्कल होती."

कैदी अस्वस्थपणे पायाची हालचाल करत व खुर्चीत नीट बसत म्हणाला, "हो सर, लंडनमधील सर्वात फसवे कागद! ते प्रेसकॉटचे मशीन आहे आणि टेबलावरील त्याची ती बंडले, प्रत्येकात शंभरच्या नोटा असलेली दोन हजार बंडले आहेत. त्या नोटा, कुठेही चालू शकतात. असे बघा. तुम्ही दोघे, माझ्याबरोबर करार करा व मी तो ठरवेन."

होम्स हसला.

"मिस्टर इव्हान्स, आम्ही असे काही करत नाही. या देशात, तुला काही पळवाट नाही. तू प्रेसकॉटला मारलेस, हे खरे आहे ना?"

“हो सर, त्यासाठी, त्यानेच मला चिथावले आणि त्यासाठी, मला पाच वर्षे तुरुंगात काढावी लागली. पाच वर्षे -- त्याला मारल्याबद्दल खरे तर मला, एक मोठे पदक मिळायला हवे. इंग्लंडच्या बँकेला फसवणारा प्रेसकॉट, कुणालाही सापडला नसता. जर मी त्याला संपवले नसते तर, त्याने अख्खे लंडन धुऊन काढले असते. त्याने त्याचे लबाड बेत कसे व कुठे बनवले, हे माहिती असणारा मी, जगातील एकमेव होतो. मला ती जागा, शोधून काढायची होती, याबद्दल तुम्हाला आश्चर्य वाटत नाही का? जेव्हा मला हा वेगळ्याच नावाचा, ढेकणांना मारणारा, गुडघ्यात पाय दुमडून बसणारा, कधीही त्याच्या खोलीबाहेर न पडणारा, मूर्ख व विचित्र नावाचा माणूस सापडला, तेव्हा त्याला तिथून घालवून लावण्यासाठी, मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली, याचे तुम्हाला आश्चर्य वाटत नाही का? जर मी त्याला ठार मारू शकलो असतो, तर मी शहाणा ठरलो असतो. ते खूप सोपे होते. पण मी दयाळू मनुष्य आहे. दुसऱ्याच्या हातात पिस्तुल असल्याशिवाय, मी गोळीबार सुरु करत नाही. तसेही मिस्टर होम्स, मी काय चुकीचे केले आहे, ते सांगा. मी या जागेचा वापर केलेला नाही. मी त्या म्हाताऱ्याला, धक्का लावलेला नाही. मी या कशात पडलो का?”

होम्स म्हणाला, ‘मला असे दिसते आहे की, फक्त खुनाचा प्रयत्न केला. पण ते आमचे काम नाही. ते अजून पुढच्या टप्प्याला होईल. आम्हाला आत्ता काय हवे होते तर, गोड असा तू. वॉटसन, स्कॉटलंड यार्डला फोन लाव. त्याना पण, याची थोडीशी कल्पना असेल.”

तर अशी किलर इव्हान्स व त्याच्या तीन विशिष्ट गॅरीडेबच्या शोधाची, गोष्ट होती. आम्ही असे ऐकले की आमच्या गरीब बिचारा मित्र, त्याच्या स्वप्नभंगाचा धक्का कधीच पचवू शकला नाही. जेव्हा त्याच्या स्वप्नांचे मनोरे कोसळले, तेव्हा त्याने

स्वतःची दुर्दशा करून घेतली. तो शेवटी ब्रिक्स्टन येथील दवाखान्यात होता. प्रेसकॉटचे काळे धंदे सापडले, हा स्कॉटलंड यार्डच्या दृष्टीने आनंददिन होता. खुनानंतर खुनी इसम अस्तित्वात असल्याचे, त्याना माहिती होते, पण त्याचा थांगपत्ता, त्याना लागू शकत नव्हता. नोटांची नक्कल करून फसवणूक करणे, हे प्रेसकॉटचे समाजविघातक कृत्य होते. अनेक सी आय डी इन्स्पेक्टरना, सुखाची झोप लागेल असे योग्य कृत्य, किलर इव्हान्सने करून, खरे तर चांगली सेवा बजावली होती. इव्हान्स बोलल्याप्रमाणे, खरे तर पोलिसांनी त्याला खुशीने, मोठे पदक द्यायला हवे होते. पण कठोर शासनाने दयेचा दृष्टीकोन न घेता, त्याला परत तुरुंगाची हवा खायला पाठवले.

तीन गेबल्स

मला नाही वाटतं, की तीन गेबल्सइतक्या नाटकीपणे किंवा अचानक, शेरलॉक होम्सबरोबरचे माझे कुठले साहस, सुरु झाले असेल. मी काही दिवस, होम्सला भेटलो नव्हतो आणि त्याचे सध्या काय चालले आहे, हे मला माहिती नव्हते. त्या सकाळी, तो गप्पा मारायच्या मनस्थितीत होता. शेकोटीशेजारील आरामखुर्चीत, त्याने मला बसवले होते. तो माझ्यासमोर तोंडात पाईप ठेऊन, बसला होता. तेव्हा एक पाहुणा आला. एक मस्तवाल, वेडा बैल आला असे मी म्हटले तर, काय ते तुम्हाला

व्यवस्थित कळेल. दार पूर्ण उघडले जाऊन, एक महाकाय निग्रो आत घुसला. त्याने गडद चौकडीचा सूट व सामन माशाच्या रंगाचा टाय बांधला होता. तो भयंकर दिसत नसता, तर विनोदी दिसला असता. त्याचा फताडा चेहरा व बसके नाक, बाहेर आल्यासारखे दिसत होते. त्याचे गडद व वाईट भाव असलेले, पाप करायला आतुर असे, आग ओकणारे डोळे; विशेषतः त्यावर प्रकाश पडला की, चकाकत होते. तो आमच्या दोघांकडे आळीपाळीने नजर टाकत होता.

"तुमच्यापैकी कोण मिस्टर शेरलॉक होम्स आहे?" त्याने विचारले. होम्सने पाईप उंचावून, तोच तो असल्याचे दर्शवले.

सावधानतेने, आल्हाददायक न भासणारी पाऊले टेबलाच्या दिशेने टाकत, आमचा पाहुणा पुढे चालत आला व म्हणाला, "ओहो, तो तू आहेस तर! असे बघ. दुसऱ्या लोकांची कामे, तू सोडून दे. कळले का, मिस्टर होम्स?"

शेरलॉक होम्स बोलला, "छान. बोलत रहा."

तो रानटी माणूस गुरगुरला, "छान? मला तुझी थोडीशी काटछाट करावी लागली, तर ते फार छान होईल. मी तुझ्यासारख्यांना, पूर्वी हाताळलेले आहे आणि त्यानंतर ते काही मला छान दिसले नाहीत, मिस्टर होम्स!"

त्याने माझ्या मित्राच्या नाकाखाली, वळलेल्या मुठीचा ठोसा मारल्यासारखे केले. होम्सने नीट रस घेऊन, त्याचे जवळून निरीक्षण केले.

त्याने विचारले, "तू असाच जन्माला आलास, की नंतर हे गुण पैदा केलेस?

तो माझ्या मित्राचा बर्फासारखा थंडगार, शांतपणा होता, की मी एक काठी उचलल्याच्या धडपडाटाचा परिणाम होता, कुणास ठाऊक; पण काही झाले तरी, आमच्या पाहुण्याचा, लक्ष वेधून घेण्याचा तो खटाटोप, थोडा कमी झाला.

तो म्हणाला, "असे बघ, मी तुला चांगली ताकीद दिली आहे. हॅरो विल्ड (वायव्य लंडनचा एक भाग) मधील एक घर घेण्यात रस असलेला, माझा एक मित्र आहे. -- मला काय म्हणायचे आहे, ते तुला कळले असेल. त्याला तू त्या गोष्टीत नाक खुपसलेले, नको आहे. समजले? तू म्हणजे कायदा नव्हे व मी म्हणजेही कायदा नव्हे. जर तू मध्ये आलास तर, मी तुला पिटून काढायला, कमी करणार नाही. हे विसरू नकोस."

"मला कधीतरी, तुला भेटायचे होते. मी तुला बसायला सांगणार नाही कारण तुला येणारा वास, मला आवडत नाही आहे. पण तू स्टीव्ह डीक्सी, तो पक्का मारामारीपटू, तर नाहीस?"

"मिस्टर होम्स, ते माझे नाव आहे. आणि जर तू मला काही उलट उत्तर दिलेस, तर ते तुला महागात पडेल."

त्याच्या कुरूप चेहऱ्याकडे बघत, होम्स म्हणाला, "शेवटी तुला, त्याचीच गरज आहे. पण तू हॉलबॉर्न बारच्या बाहेर, तरूण पर्किन्सला ठार केलेस, बरोबर? तू जात नाही आहेस का?"

तो निग्रो मागे झाला व त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला. तो म्हणाला, "मिस्टर होम्स, मी असले काही ऐकून घेत नाही. तुझ्या या पर्किन्सशी, मला काय

करायचे आहे? बर्मिंगहॅममध्ये मी बैलांच्या झुंजीचे प्रशिक्षण घेत होतो, तेव्हा हा मुलगा माझ्यामध्ये तडमडला.

होम्स म्हणाला, “हो. स्टीव्ह, तू न्यायाधीशाला त्याबद्दल सांग. मी तुला आणि बार्ने स्टॉकडेलला बघत होतो –"

“अरे देवा, कृपा करुन मला मदत कर, मिस्टर होम्स -- “

“पुरे झाले. आता चालू लाग. मला हवे असेल, तेव्हा मी तुला बोलावेन.”

“मिस्टर होम्स, शुभ सकाळ. आपल्या या भेटीविषयी, तुझ्या मनात काही आकस नसावा.”

“तू आत्ता मला जे धमकावलेस, ते करायला तुला कोणी प्रवृत्त केले?”

“खरे सांगतो. मिस्टर होम्स, ते काही गुपित नाही. तू आत्ता ज्याचा उल्लेख केलास, तोच तो.”

“त्याला कोणी, असे करायला सांगितले?”

“मला त्याचे नाव, माहिती नाही. पण तो मला म्हणाला, ‘स्टीव्ह जा. मिस्टर होम्सला भेट आणि त्याला सांग, की परत तो जर हॅरो मध्ये दिसला, तर त्याचे आयुष्य सुरक्षित नाही.’ असे खरे तर आहे.” एवढे बोलून, पुढे काही प्रश्न न करता, आमचा पाहुणा, जसा आडदांडपणे घुसला, तसाच खोलीबाहेर चालू पडला. होम्सने गालातल्या गालात हसत, त्याच्या पाईपमधली राख झटकली.

‘वॉटसन, त्याचे मूर्ख डोके तू उडवले नाहीस, म्हणून मला बरे वाटले. मी काठी बाबतच्या तुझ्या प्रतिक्रिया बघत होतो. पण तो फारसा उपद्रवी नाही. पण,

तगडा, मूर्ख व अद्वातद्वा बोलणारा आहे. तू बघितल्याप्रमाणे, सहज घाबरणारा आहे. तो स्पेन्सर जॉनच्या, गँगमधील आहे. आणि त्याने अलीकडील काही वाईटसाईट कामात, भाग घेतलेला आहे. मला वेळ मिळाला, की मी त्याचा, बंदोबस्त करेन. त्याचा बॉस बार्ने, जास्त चाणाक्ष आहे. ते सर्वजण मारामारीबद्दल व धमकावण्याबद्दल, जास्त प्रसिध्द आहेत. त्यांच्यामागे या विशिष्ट प्रसंगी, मुख्य सूत्रधार कोण आहे, हे मला जाणून घ्यायचे आहे."

"पण त्यांची मनमानी चालावी, म्हणून तुला धमकावायचे काय कारण?"

"ही हॅरो विल्डची केस आहे, ती मला त्यात लक्ष घालायला लावते आहे, त्याअर्थी त्यात काहीतरी विशेष असणार."

"पण असे त्यात काय आहे?"

"मी तुला सांगणार होतो, तर मध्येच हे विनोदी पात्र तडमडले. ही इथे, मिसेस माबर्लीची चिठ्ठी आहे. जर तू माझ्याबरोबर येणार असलास, तर आपण तिला तारेने तसे कळवू व ताबडतोब बाहेर पडू."

प्रिय मिस्टर शेरलॉक होम्स, (मी वाचले)

मला माझ्या या घरासंबंधी, एकामागून एक अशा विचित्र घटना घडलेल्या दिसल्या. या बाबतीत तुमचा सल्ला, माझ्या दृष्टीने फार मोलाचा आहे. उद्या कुठल्याही वेळी मी घरी असेन. माझे घर विल्ड स्टेशनपासून थोड्याच अंतरावर आहे. मला वाटते, माझे पती मिस्टर माबर्ली, तुमच्या अनेक अशीलांपैकी एक होते.

तुमची विश्वासू,

मेरी माबर्ली

पत्ता होता, तीन गेबल्स, हॅरो विल्ड."

होम्स म्हणाला, "तर हे असे आहे. आणि आता तुला वेळ असेल तर, तर आपण जाण्यासाठी निघूया."

थोडा रेल्वे प्रवास, मग गाडीने थोडे अंतर कापल्यावर ते घर आले. ते विटांचे व लाकडाचे घर, उजाड गवताळ माळरानावर उभे होते. घरावर तीन टोके होती. वरच्या खिडकीजवळ पुसट अक्षरात घराचे नाव दिसत होते. मागील बाजूस, अनाम उदासी दाटली होती. अर्धवट उगवलेले पाईन वृक्ष दिसत होते एकंदरीत त्या ठिकाणचे वातावरण मळभ आल्यासारखे निरुत्साही होते. घरात छान फर्निचर होते. आमचे स्वागत करणारी स्त्री उत्साही, सुसंस्कृत, घर आवरून आटपून ठेवणारी व वयाने मोठी वाटत होती.

होम्स म्हणाला, "बाईसाहेब, जरी मिस्टर माबर्लीनी काही वर्षांपूर्वी, काही क्षुल्लक बाबतीत माझी सेवा घेतली होती तरी, मला ते चांगले आठवत आहेत."

"मला वाटते माझा मुलगा डग्लस याला, तुम्ही बहुधा जास्त चांगले ओळखत असाल."

होम्सने तिच्याकडे रस घेऊन बघितले. " अरेच्चया! तुम्ही डग्लस माबर्लीची आई होय? मी त्याला थोडेसे ओळखतो. अर्थात सर्व लंडन त्याला ओळखते. तो केवढा मोठा असामी होता! आता तो कुठे असतो?"

"मिस्टर होम्स, तो वारला. तो रोमला राजदूत होता आणि मागच्या महिन्यात तो तिथे न्यूमोनियाने वारला."

अरेरे! त्याच्यासारखा माणूस, मरेल असे वाटले नव्हते. इतका उत्साही माणूस, मी कधीच पाहिला नव्हता. तो अगदी समरसून जगला. त्याच्यातला कणनकण, फार उत्फुल्ल असायचा."

"मिस्टर होम्स, ते खरेच आहे. तो गेला, हे फार वाईट झाले. तो आत्मविश्वासपूर्ण, नीटनेटका, छाप पाडणारा व मोहक असल्याचे तुम्हाला आठवत असणार. नंतर तो चिडचिडा, लहरी व दुःखी होत गेलेला, तुम्ही पाहिले नसेल. त्याचा हृदयभंग झाला होता. एका महिन्यात माझ्या शूर व छान मुलाला मी स्वार्थी, अविश्वासू व अप्रामाणिक माणसामध्ये किंवा एका राक्षसामध्ये, बदलताना पाहिले! ठीक आहे मिस्टर होम्स, मी काही तुम्हाला माझ्या मुलाविषयी बोलण्यासाठी, बोलावलेले नाही."

"डॉ वॉटसन आणि मी, तुमचे काम करण्यासाठी आलो आहोत."

"इथे काहीतरी विचित्र गोष्टी घडत आहेत. आता या घरात येऊन, मला एक वर्ष होऊन गेले. आणि शेजाऱ्यांपाजाऱ्यांची फार दखल न घेता, माझे निवृत्त व निवांत आयुष्य मी जगावे, अशी माझी इच्छा आहे. तीन दिवसांपूर्वी, मला एका माणसाचा फोन आला. तो घरांचा दलाल असल्याचे, व हे घर त्याच्या एका अशीलासाठी अगदी योग्य असल्याचे, तो म्हणाला. जर हे मला मान्य असेल तर, पैशाचा काही प्रश्न नाही, असे बोलणे झाले. बाजारात अनेक रिकामी व त्याला हवी तशी, घरे असल्याने, मला त्याचे हे बोलणे विचित्र वाटले. तरीही मला सहजच, त्याच्या बोलण्यात रस वाटू

लागला. मी त्याला मी घर ज्या किमतीला विकत घेतले होते, त्यापेक्षा पाचशे पौंड जास्त, इतकी किंमत सांगितली. त्याने ताबडतोब ती कबूल केली. पण तो म्हणाला, की त्याच्या अशीलाला फर्निचर सुद्धा हवे आहे. तर ते धरून तुम्ही किमत सांगावी. त्यातील काही फर्निचर, माझ्या जुन्या घरातील होते आणि तुम्ही बघता आहात त्याप्रमाणे, ते खूपच चांगले होते. म्हणून मी एक बऱ्यापैकी आकडा सांगितला. त्यालाही तो लगेच तयार झाला. मला नेहमी प्रवास करायला आवडतो. आणि हा सौदा चांगला जमला. मग मला वाटले आता उरलेले आयुष्य मनमानी करावी.

"काल तो मनुष्य, विक्रीचा मसुदा घेऊन आला. सुदैवाने मी तो, हॅरोत राहणारे माझे वकील, मिस्टर सुत्रोना दाखवला. ते मला म्हणाले, की ते फार विचित्र असे कागदपत्र आहेत. जर तुम्ही यावर सही केलीत, तर तुम्हाला एकही वस्तू, घराबाहेर नेता येणार नाही, तुमच्या खासगी गोष्टीदेखील नाही. जेव्हा संध्याकाळी तो मनुष्य परत आला, तेव्हा मी त्याला ते दाखवले. मी म्हणाले, की मला फक्त फर्निचर विकायचे आहे.

"नाही. नाही. सर्व काही." तो बोलला.

"पण माझे कपडे, दागिने?"

"ठीक आहे. ठीक आहे. तुमच्या खासगी गोष्टींसाठी, आपण थोडी सूट देऊ शकतो. पण तपासल्याशिवाय, काहीही घराबाहेर जाणार नाही. माझा अशील फार उदार मनुष्य आहे. पण त्याच्या काही लहरी व स्वतःची काही तत्वे आहेत. तो काहीही करू शकतो."

मी म्हणाले “मग मला हे काहीच करायचे नाही आणि तिथेच, ते प्रकरण संपले. पण हे सर्व मला, इतके वेगळेच वाटले की -- “

इथे आम्हाला एक असामान्य, अडथळा आला.

होम्सने त्याचा हात शांततेसाठी उंचावला. मग त्याने खोलीत फेऱ्या मारून दार सताड उघडले. एक दमलेली व चिंतित दिसणारी बाई आत घुसली. त्याने त्या थरथरणाऱ्या बाईला, खांद्याला घट्ट धरून आश्वस्त केले. ती अस्वस्थ व संकोचलेली वाटत होती. खुराड्यातून बाहेर पडलेल्या एखाद्या मोठ्या, बावचळलेल्या कोंबडीच्या पिल्लासारखी केकाटत होती.

ती किंचाळली, “मला, एकटीला राहू दे. तुम्ही, काय करता आहात?”

“अग सुसान, हे काय चालले आहे?”

“हे बघा बाईसाहेब, मी असे विचारायला आले होते, की हे लोक जेवायला आले आहेत का? आणि तेव्हा या माणसाने, माझ्यावर उडी मारली.”

“गेली पाच मिनिटे, मी तुझे बोलणे ऐकत होतो आणि सर्वात जास्त महत्वाचे तू जे सांगत होतीस, त्यात मला अडथळा आणायचा नव्हता. सुसान, तू धापा टाकते आहेस, खरे ना? या कामासाठी तू फार जोरात श्वासोच्छवास करते आहेस.” होम्स म्हणाला.

सुसान चिडली, पण आपण पकडले गेलो, असा नवल वाटल्याचा भाव, तिच्या चेहऱ्यावर होता. “तू कोणीही असलास तरी, तुला माझ्याशी असे वागायचा, बोलायचा अधिकार कोणी दिला?”

“मला तुम्हाला समोरासमोर एक प्रश्न विचारायचा आहे. मिसेस माबर्ली, तुम्ही माझा सल्ला घेणार असल्याचे, कुणाजवळ बोलला होतात का?”

“नाही. मिस्टर होम्स. नाही.”

“तुम्ही कोणामार्फत पत्र पाठवले?”

“सुसान मार्फत.”

‘बरोबर. सुसान, आता तू मला सांग, तू कोणाला निरोप पाठवून कळवलेस, की तुझ्या मालकीणबाई, माझा सल्ला घेणार आहेत.”

“हे खोटे आहे. मी निरोप पाठवला नाही.”

“असे बघ सुसान, तुला माहिती आहे की, धापा टाकणारे लोक, जास्त जगत नाहीत.

खोटे बोलणे, ही दुष्टपणाची गोष्ट आहे. हे तू कुणाला सांगितलेस?”

तिची मालकीण ओरडली, “सुसान, हे दुष्टपणाचे आहे. तू कुणाला सांगितलेस?” तू एक फसवणारी, वाईट बाई आहेस, असे मी समजते. तुला कुंपणापलीकडील कुणाशी तरी बोलताना, मी बघितल्याचे मला आता आठवले.”

“ते माझे मी बघून घेईन.” तो बाई तोऱ्यात बोलली.

“समजा, मी तुला सांगितले, की तो बार्ने स्टॉकडेल होता तर?” होम्स म्हणाला.

“ठीक आहे. जर तुम्हाला माहिती आहे, तर मग मला कशासाठी विचारता?”

“माझी खात्री नव्हती, पण आता झाली. आता बार्नेच्या मागे कोण आहे, हे तू मला सांगितलेस तर, मी तुला दहा पौंड देईन.”

“तुमच्या दहा पौंडाच्या बदल्यात, हजार पौंड द्यायला कुणी तयार असेल तर काय?”

“इतका श्रीमंत माणूस? नाही. तू हसते आहेस -- एक श्रीमंत बाई. आता आपण इथपर्यंत आलो आहोत, तर मग नावही सांगून, दहाची नोट तू मिळवावीस.”

‘तू खड्ड्यात जा.”

“ओहो सुसान, काय तुझी ही भाषा!”

“ आता, मी येथून जाते आहे. तुमचे फार ऐकून घेतले. मी तुमच्याकडे उद्या बघून घेते.” एवढे बोलून ती रागारागाने निघून गेली.

अचानक बाजूला होऊन, खेळीमेळीकडून कडकपणाकडे वळत, तो म्हणाला. “अच्छा सुसान, तुझ्या दम लागण्यावर, कापूर असलेले औषध घे. – “ तेव्हा त्या चिडलेल्या बाईच्या मागे दार लागले. “ही टोळी म्हणजे धंदेवाईक लोक आहेत. बघा किती झटपट, ते त्यांच्या युक्त्या वापरतात. तुम्ही मला पाठवलेल्या पत्रावर, १० वाजताचा शिक्का आहे. आणि तरीही सुसान, बार्नेला त्यातील शब्दनशब्द सांगते. बार्नेला त्याच्या मालकाकडे किंवा मालकिणीकडे, सुसानच्या हसण्यावरुन मला वाटते मालकिणीकडेच, जाऊन सूचना घ्यायला वेळ मिळतो. तिला वाटते, मी काही

मूर्खपणा केला आहे, तेव्हा ती एक बेत आखते. ब्लॅक स्टीव्हला बोलावले जाते. मला दुसऱ्या दिवशी अकरा वाजता धमकी दिली जाते. हे किती झटपट काम आहे, बघा."

"पण त्याना, हवे आहे काय?"

"तोच तर प्रश्न आहे. तुम्ही इथे रहाण्यापूर्वी, कोण रहात होते?

"एक फर्ग्युसन नावाचा, नौसेनेतील कॅप्टन."

"त्याच्याबद्दल, काही विशेष सांगता येईल?"

"मी तरी असे काही, ऐकलेले नाही."

"मला शंका आहे, की त्याने घराखाली काही पुरून ठेवले आहे की काय. अर्थात हल्ली लोक जेव्हा खजिना पुरुन ठेवतात, तेव्हा तो पोस्ट ऑफिसच्या बँकेत ठेवतात. पण काही, वेडे लोक असतात. त्याच्याशिवाय, जग सुने होईल. पहिल्यांदा मला, काही किंमती माल पुरून ठेवला आहे, असे वाटले. पण मग तसे असेल, तर त्याना तुमचे फर्निचर का हवे आहे? तुमच्याकडे काही चुकून आलेले, राफेल किंवा शेक्सपिअरच्या महान कामातील कागद नाहीत ना?"

"मला नाही वाटत की, माझ्याकडे डर्बीच्या नाजूक चहाच्या संचापेक्षा, अजून काही मौल्यवान आहे."

"त्यामुळे या गूढाची, काहीच उकल होत नाही. शिवाय त्याना काय हवे आहे ते, ते सरळ उघडपणे सांगत का नाहीत? जर त्याना तुमच्या त्या संचाची लालसा असेल, तर तुम्हाला त्याची किंमत देऊन, तो घेऊ शकतात. पण तुम्हाला धमकी देऊन, सगळ्या वस्तू हडप करणार, असे सांगण्याची काय गरज? नाही. मला वाटते,

तुम्हाला माहिती नसलेले काहीतरी, इथे आहे आणि जर तुम्हाला ते माहिती असेल, तर तुम्ही ते त्याना देणार नाही."

'मी पण, असाच तर्क करतो आहे." मी म्हणालो.

"डॉ वॉटसनला हे पटत असेल, तर मग असेच असले पाहिजे."

"ठीक आहे मिस्टर होम्स, ते काय असू शकेल?"

आपण पूर्णपणे मानसिक विश्लेषण करून बघू. त्यामुळे आपल्याला, त्यावर जास्त प्रकाश पाडता येईल. तुम्ही या घरात, गेले वर्षभर रहात आहात."

"जवळजवळ दोन."

आणखीनच चांगले. या काळात कोणाला, तुमच्याकडून काहीही नको होते. आणि आता अचानक तीन चार दिवसांपूर्वीपासून, तुमच्याकडे तातडीच्या मागण्या, येऊ लागल्या आहेत. यावरून तुमच्या काय लक्षात येते आहे?"

मी म्हणालो, "की कुठलीही वस्तू का असेना, पण ती आताच, घरात आली आहे."

होम्स बोलला, 'एवढे नक्की. आता मिसेस माबर्ली, अलीकडे तुमच्या घरात काही वस्तू आली आहे का?"

"नाही. यावर्षी, मी नवीन काही घेतले नाही."

“खरंच! हे फार उल्लेखनीय आहे. मला वाटते आपण ही बाब, थोडी पुढे जाऊ द्यावी, जेणेकरून आपल्याला अजून माहिती मिळेल. तुमचा तो वकील हुशार माणूस आहे का?”

“मिस्टर सुत्रो, फारच क्षमता असलेला माणूस आहे.”

आताच रागारागाने घराबाहेर पडलेली सुसान सोडून, आणखी कुणी नोकराणी तुमच्याकडे आहे का?”

“माझ्याकडे एक तरुण मुलगी येते.’

“सुत्रोला एकदोन रात्री तुमच्या घरात घालवण्यासाठी, तुम्ही राजी करा. तुम्हाला कदाचित संरक्षणाची गरज आहे.”

“कोणापासून?”

“कोणाला माहीत? हे जरा अगम्य प्रकरण, वाटते आहे. ते कशाच्या मागे आहेत, ते मी शोधून काढू शकलो नाही, तर मला दुसऱ्या बाजूने विचार करणे, क्रमप्राप्त आहे. या घराच्या दलालाने, त्याचा पत्ता दिला आहे का?”

फक्त त्याचे कार्ड व व्यवसाय. हॅनीज जॉन्सन, लिलाव घडवून आणणारा व किंमत ठरवणारा.”

त्याचे नाव आपल्याला, फोन डिरेक्टरीमध्ये सापडेल, असे मला वाटत नाही. प्रामाणिक व्यावसायिक, त्यांची व्यवसायाची जागा बदलत नाहीत. ठीक आहे. काही नवीन घडामोडी झाल्यास, मला कळवा. मी तुमची केस घेतली आहे. तुम्ही माझ्यावर, खुशाल अवलंबून रहा. मी ती तडीस नेईनच.”

आम्ही हॉलमधून चाललेलो असताना, दृष्टीतून काही न निसटणारी होम्सची नजर, एका कोपऱ्यात रचून ठेवलेल्या बऱ्याच बॅगांवर व खोक्यांवर पडली. त्यावर लेबले झळकत होती.

" 'मिलॅनो'. 'लुसेरने'. ही इटलीहून आली आहेत."

"त्या बिचाऱ्या डग्लसच्या, वस्तू आहेत."

"तुम्ही अजून, त्या उघडल्या नाहीत? त्या येऊन, किती दिवस झाले?"

"त्या मागील आठवड्यात आल्या."

"पण तुम्ही म्हणालात -- नक्कीच यासंबंधी आपण काही बोललो नाही. यात काही किंमती माल नसेल कशावरुन?"

"मिस्टर होम्स, अशी शक्यता नाही. बिचाऱ्या डग्लसकडे त्याचा पगार व बँकेतील मुदत ठेव सोडून, काहीच नव्हते. त्याच्याकडे काय जडजवाहीर असणार?"

होम्स विचारात बुडून गेला.

"मिसेस माबर्ली, उशीर करू नका. या वस्तू, वर तुमच्या झोपायच्या खोलीत घेऊन जा. लवकरात लवकर त्या तपासा. त्या काय आहेत ते पहा. मी उद्या येतो तेव्हा मला, त्याबद्दल सांगा."

तीन गेबल्स, अगदी सूक्ष्म निरीक्षणाखाली होते, हे अगदी नक्की होते. कारण आम्ही गल्लीच्या उंच भागाशी आलो तेव्हा गल्लीच्या शेवटच्या टोकाशी तो घराच्या किमतीची घासाघीस करणारा निग्रो, सावलीत उभा होता. आम्ही अचानक त्याच्या समोर आलो आणि त्या सुनसान जागी तो आम्हाला एकाकी व धोकादायक वाटला.

होम्सने त्याचे खिसे चाचपून पाहिले.

“मिस्टर होम्स, तुम्ही पिस्तुल शोधत आहात का?”

“नाही. माझी सेंटची बाटली, स्टीव्ह.”

मिस्टर होम्स, तुम्ही विनोदी आहात, नाही का?”

“स्टीव्ह, जर मी तुझ्या मागे लागलो तर, तुझ्यासाठी हे विनोदी नसेल. मी सकाळीच तुला चांगल्या भाषेत, ताकीद दिलेली आहे.”

“हो. मिस्टर होम्स, तुम्ही जे बोललात, त्यावर मी विचार केला आहे. मला मिस्टर पर्किन्सच्या प्रकरणावर, अजून काही संभाषण नको आहे. मिस्टर होम्स, मला वाटते, मी तुम्हाला मदत करू शकेन.”

“ठीक आहे. तर मग मला सांग, यात तुझ्यामागे कोण आहे?”

“मिस्टर होम्स, खरे सांगतो. मी तुम्हाला यापूर्वी सत्य सांगितले आहे. मला माहिती नाही. माझा बॉस, मला आज्ञा देतो एवढेच.”

“ठीक आहे. स्टीव्ह, एवढे लक्षात ठेव, की त्या घरातील बाई व त्या छपराखालील प्रत्येक वस्तू, माझ्या संरक्षणाखाली आहे. हे विसरू नकोस.”

“हो. मिस्टर होम्स, मी हे लक्षात ठेवीन.”

आम्ही पुढे चालताना होम्सने शेरा मारला, “वॉटसन, त्याला मी त्याच्या स्वतःसाठीच, पूर्णपणे घाबरवून सोडले आहे. मला वाटते तो आता त्याच्या मालकाला, त्याचा बॉस कोण आहे हे माहिती असेल तर, प्रश्न विचारून भंडावून

सोडेल. मला मी भाग्यवान समजतो कारण, स्पेन्सर जॉनच्या गँगबद्दल मला थोडी माहिती आहे व तो स्टीव्ह त्यापैकीच एक आहे.. वॉटसन, आता ही लॅगडेल पाईकची केस आहे आणि मी आता त्याला भेटणार आहे. जेव्हा मी परत येईन, तेव्हा मला या केसबद्दल जास्त समजलेले असेल."

नंतर मला दिवसाभरात होम्स भेटला नाही. पण त्याने वेळ कसा घालवला असेल, याची पूर्णपणे कल्पना करू शकतो. कारण, लॅगडेल पाईक, हा त्याच्यासाठी, सामाजिक भानगडींचे, मानवी संदर्भपुस्तक होता. तो एक विचित्र, आरामशीर असामी होता व तो आपला जागेपणाचा वेळ, सेंट जेम्स रस्त्यावरील क्लबमधील खिडकीत घालवत असे. गावगप्पांमधून, माहिती मिळवण्याचे व पसरवण्याचे, तो एक साधन होता. असे म्हणत, की टुकार वर्तमानपत्रांसाठी दर आठवड्याला रकानेच्या रकाने भरू माहिती चौकस लोकाना देऊन, तो चार आकडी उत्पन्न मिळवत असे. लंडनच्या गढूळ खोली असलेल्या आयुष्यात, एखादा भोवरा तयार झाल्यास, तो पृष्ठभागावर आणण्याचे काम, हा मानवी फोन करत असे. काळजीपूर्वक गुप्ततेने, होम्सने लॅगडेलला तीन गेबल्सची हकीगत सांगितली व प्रसंगवशात, त्यालाही लॅगडेलकडून हवी ती माहिती मिळाली. जेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी मी माझ्या मित्राला भेटलो, तेव्हा सर्व काही सुरळीत असल्याचे, मला समजले. पण वाईट आश्चर्य, दबा धरून बसले होते. त्याने खालील तारेचा आकार घेतला.

'कृपया ताबडतोब या. तुमच्या अशीलाच्या घरात चोरी झाली आहे. पोलीस आले आहेत.'

सुत्रो.

होम्सने शिट्टी वाजवली. आमची केस, संकटात बदलली. होम्स म्हणाला, "हे माझ्या अपेक्षेपेक्षा, फार लवकर झाले. वॉटसन, हे सर्व घडले, त्यामागे एक फार मोठी शक्ती आहे. मी जे काही ऐकले आहे, त्यानंतर मला याचे आश्चर्य वाटत नाही. हा सुत्रो, अर्थात तिचा वकील आहे. तुला तिथे रात्रभर घर राखायला न सांगून, मी चूक केली. हा माणूस, स्पष्टपणे सिध्द करतो आहे, की तो मरतुकडे झुडूप आहे. ठीक आहे. आता त्याचे काही नाही. पण हॅरो विल्डला, आता आपला दुसरा प्रवास."

आम्हाला तीन गेबल्स, आधीच्या दिवसापेक्षा फार वेगळे, कडक शिस्तीचे, असे वाटले. आळशी लोकांचा एक लहान गट बागेतील दाराजवळ उभा होता. तर काही कॉन्स्टेबल खिडक्यांची व जास्वंदीच्या फुलांच्या ताटव्याची तपासणी करत होते. तिथे आम्हाला एक करड्या रंगाचा वयस्क माणूस भेटला. त्याने आम्हाला वकील म्हणून स्वतःची ओळख करून दिली. लगबग करणाऱ्या एका सावळ्या इन्स्पेक्टरने, होम्स त्याचा जुना मित्र असल्यासारखे, अभिवादन केले.

"कसे काय मिस्टर होम्स, या केसमध्ये तुम्हाला काही संधी दिसत नाही. ही साधी सर्वसामान्य चोरी वाटते आहे. आणि गरीब बिचाऱ्या वयस्क पोलिसांच्या आवाक्यातले, असे हे काम दिसते आहे. कुणा माहीर माणसाची, यात जरुरी नाही."

होम्स म्हणाला, "मला खात्री आहे, की ही केस योग्य माणसांच्या हातात आहे. पण तुम्ही म्हणता, निव्वळ चोरी?"

"हो. तसेच. हे कोणी केले आहे व त्याना कुठे शोधायचे, हे आम्हाला माहिती आहे. हे बार्ने स्टॉकडेल टोळीचे काम आहे. यात काळे निग्रो लोक, सामील आहेत. त्याना आम्ही, इथे आसपास बघितले आहे."

"उत्तम! त्यांनी काय चोरले?"

"असे वाटते आहे की, त्याना फारसे काही मिळाले नसावे. मिसेस माबर्लीना बेशुद्ध केले गेले होते. ओहो, त्या स्वतःच इथे आल्या आहेत."

एका नोकराणीच्या अंगावर रेलून अशक्त व आजारी दिसणाऱ्या त्यांनी खोलीत प्रवेश केला.

खेदपूर्वक हसत म्हणाल्या, "मिस्टर होम्स, तुम्ही मला चांगला सल्ला दिलात. पण मी तो मानला नाही. मला मिस्टर सुत्रोना त्रास द्यायचा नव्हता. त्यामुळे मी संरक्षित नव्हते."

त्या वकिलाने स्पष्टीकरण देत म्हटले, "मला हे आता सकाळीच कळले."

"मिस्टर होम्सनी मला, कुणातरी मित्राला घरी ठेवून घेण्यासंबंधी सांगितले होते. मी त्याकडे दुर्लक्ष केले व आता त्याची फळे भोगते आहे."

होम्स म्हणाला, "तुम्ही फार आजारी दिसत आहात. कदाचित काय घडले, हे सांगायच्या स्थितीत तुम्ही दिसत नाही.'

इन्स्पेक्टर एक जाड वही दाखवत म्हणाला, "ते सर्व यात आहे. तरीही बाईसाहेब, जर फार दमलेल्या नसतील तर -- "

"यात सांगणयासारखे फारच थोडे आहे. मला खात्री आहे, की दुष्ट सुसानने, त्यांना घरात शिरू देण्याचा बेत आखला. त्याना घरातील, इंचनइंच माहिती होता. क्लोरोफॉर्म माझ्या तोंडावर शिंपडले जाण्यापूर्वी, क्षणभर मी सजग होते. मला कल्पना नाही, की मी किती काळ बेशुध्द होते. जेव्हा मी उठले, तेव्हा एकजण माझ्या

बाजूला होता व एकजण माझ्या मुलाच्या बॅगेतून एक गठ्ठा बाहेर काढत होता. तो गठ्ठा थोडासा उघडा होता व जमिनीवर पसरला होता. तो पळून जाण्यापूर्वी, मी झडप घालून, त्याला पकडले."

इन्स्पेक्टर म्हणाला, "तुम्ही फार मोठा धोका पत्करलात."

"मी त्याला धरून ठेवले. पण त्याने मला हिसडा दिला व दुसऱ्याने मला बहुधा, धक्का दिला. कारण नंतर मला, काही आठवेनासे झाले. मेरी नावाच्या नोकराणीने काही गडबड ऐकली व ती खिडकीबाहेर तोंड काढून ओरडू लागली. बाहेरील लोकांनी पोलिसाना बोलावले. पण तोपर्यंत चोर पसार झाले."

"त्यांनी काय चोरले?"

"मला नाही वाटत, की त्यांनी मूल्यवान असे काही चोरले. माझ्या मुलाच्या बॅगांमध्ये काही नव्हते.'

"त्यांनी काही माग, ठेवला नाही का?"

"तिथे एक कागद पडला होता. तो मी पकडलेल्या माणसाच्या हातातून घेऊन मी बहुधा फाडला. तो जमिनीवर चुरगळून, तुकडे होऊन पडला होता. तो माझ्या मुलाच्या हस्ताक्षरातील होता."इन्स्पेक्टर म्हणाला, "याचा अर्थ ते काही, फार उपयोगाचे नव्हते. पण जर ते चोराच्या –"

होम्स बोलला, "बरोबर. किती फालतू सामान्य ज्ञान! मला ते बघायला उत्सुकता वाटते आहे."

इन्स्पेक्टरने त्याच्या खिशातून, तो दुमडलेला फुलस्केप कागद काढला. तो फुशारकी मारत बोलला, "कितीही फालतू असले तरी, मी कधीच त्याकडे दुर्लक्ष करत नाही. मिस्टर होम्स, तुम्हाला माझा हाच उपदेश राहील. माझ्या पंचवीस वर्षांच्या आयुष्यात, मी बरेच शिकलो. काहीतरी बिनमहत्वाचे देखील, महत्वाचे ठरण्याची शक्यता, नाकारता येत नाही.

होम्सने त्या कागदाची, तपासणी केली.

"इन्स्पेक्टर, तुम्ही याचे काय करणार आहात?"

"मला वाटते त्याप्रमाणे, हा नक्कीच या विचित्र कादंबरीचा शेवट आहे."

होम्स म्हणाला, "कदाचित हा या विचित्र गोष्टीचा शेवट ठरेल. या पानाच्या वर लिहिलेला आकडा तुमच्या लक्षात आला का? तो दोनशे पंचेचाळीस आहे. मग आधीची दोनशे चव्वेचाळीस पाने कुठे आहेत?"

"मला वाटते ती चोरांनी पळवली. त्यात त्यांचा, काही फायदा असावा!"

"असे कागद पळवण्यासाठी, त्यांनी घरावर धाड घालावी, हे जरा विचित्रच वाटते. इन्स्पेक्टर, ही गोष्ट तुम्हाला काही सुचवते का?"

"हो सर, ही असे सुचवते की घाईमध्ये त्या बॅगेतील सामान हाताळताना, जे प्रथम हातास लागले ते त्यांनी हस्तगत केले. जे त्याना मिळाले, त्यात त्यांनी आनंद मानावा, अशी मी इच्छा करतो."

मिसेस माबर्ली म्हणाल्या, "माझ्या मुलाच्या वस्तुना, त्यांनी हात का लावावा?"

“खाली दुसरे काहीच किंमती न मिळाल्याने, त्यांनी वर त्याचे नशीब आजमावले असणार, असे मला वाटते. मिस्टर होम्स, तुम्हाला काय वाटते?”

“इन्स्पेक्टर, मला यावर विचार करावा लागेल. वॉटसन, खिडकीजवळ ये.”

आम्ही खिडकीजवळ उभे राहिल्यावर, त्याने त्या कागदाच्या तुकड्यावर लिहिलेले परत वाचले. मध्यभागी असलेल्या खालील वाक्यापासून त्याने सुरवात केली:

“ -- जखमा व गुद्दे यामुळे, चेहऱ्यावरून रक्त गळत होते. पण हृदयातून गळणाऱ्या रक्तापुढे ते काहीच नव्हते. त्याने तो सुंदर चेहरा पाहिला, ज्यासाठी तो स्वतःच्या आयुष्याचा बळी देण्यास देखील तयार होता. त्याचा त्रास व लाज वाटणे बघता, ते तसेच होते. त्याने तिच्याकडे वर बघितले, तेव्हा ती हसली -- हो. देवाच्या कृपेने, ती हसली. एखाद्या निर्दय राक्षसिणीसारखी हसली. त्या क्षणी प्रेम संपले व द्वेष सुरु झाला. मनुष्याला जगायला काही कारण लागते. माझ्या प्रिये, तेच माझ्याकडे नसेल आणि तुला कसलीच लाज नसेल, तर मग मी तुला बदनाम करू शकतो. सूड उगवू शकतो.”

इन्स्पेक्टरला कागद परत दिल्यावर होम्स हसत म्हणाला, “विचित्र व्याकरण. तुम्ही पाहिलेत का, की कसे झटक्यात ‘तो’ चे ‘माझा’ असे बदलले? लिहिणारा त्याच्या गोष्टीत इतका गुंगून गेला, की कळसाध्यायात, तो स्वतःला नायक समजू लागला.”

तो कागद परत स्वतःच्या पुस्तकात ठेवत, इन्स्पेक्टर बोलला, "तो बलवान पण, गरीब बिचारा प्राणी, दिसतो आहे. मिस्टर होम्स, आता तुम्ही काय करणार आहात?"

"आता या केसमध्ये मला करण्यासारखे काही उरले आहे, असे मला वाटत नाही. शिवाय इतक्या सक्षम हातात, ही केस आहे. बरं मिसेस माबर्ली, अजून तुमची प्रवास करायची इच्छा आहे का?"

"मिस्टर होम्स, माझे नेहमीच, ते स्वप्न होते."

"कुठे जायला तुम्हाला आवडेल? कैरो, माद्रिद की रिव्हीएरा?"

'ओहो, जर माझ्याकडे पैसे असतील, तर जगाची सफर करायला, मला आवडेल."

"खरे आहे. जगाची सफर. ठीक आहे. शुभ प्रभात. मी तुम्हाला एखाद्या ओळीचे पत्र संध्याकाळी पाठवेन." आम्ही खिडकी जवळून गेलो, तेव्हा मी इन्स्पेक्टरला हसताना व डोके हलवताना पाहिले. 'या हुशार लोकांमध्ये नेहमी, थोडा वेडेपणाचा अंश असतो.' असा त्याच्या हसण्याचा अर्थ, मी लावला.

मध्य लंडनच्या कोलाहलात आम्ही आलो, तेव्हा होम्स म्हणाला, "वॉटसन, आता आपण आपल्या छोट्या प्रवासाच्या, अंतिम टप्प्यावर आहोत. मला वाटते, आपल्याला सर्व बाबी एकदम स्पष्ट झाल्या आहेत. आणि तू माझ्याबरोबर आलास तर बरे. कारण मी इसाडोरा क्लेइन सारख्या बाईबरोबर असताना, कुणीतरी साक्षीदार असलेला बरा."

आम्ही एक टॅक्सी केली व ग्रॉसव्हेनॉर चौकाच्या दिशेने जोरात निघालो. होम्स विचारात बुडाला होता. पण अचानक तो उठून उभा राहिला.

“वॉटसन, मला वाटते, तुला सर्व काही स्पष्ट झाले आहे.”

“नाही. हो, असे मी म्हणू शकत नाही. मला एवढेच कळले आहे की आपण, हा सर्व विनोद करण्यामागे असलेल्या महिलेला भेटण्यासाठी, चाललो आहोत.”

“बरोबर. पण इसाडोरा क्लेइन हे नाव ऐकून, तुझ्या काहीच लक्षात येत नाही का?”

“अर्थात, ती सुंदरी म्हणून प्रसिध्द होती. कोणीही तिच्याशी स्पर्धा करू शकत नसे. मास्टरफुई कॉनक्युस्टॅडोर्सच्या, शुध्द स्पॅनिश रक्ताची ती होती. तिने म्हाताऱ्या जर्मन साखरसम्राटाशी लग्न केले. हल्ली ती जगातील सर्वात श्रीमंत व सर्वात सुंदर विधवा, म्हणून प्रसिध्द आहे. नंतर काही काळ, ती स्वतःचे लाड पुरवून घ्यायला, हवी तशी मनमानी करू लागली. तिचे अनेक प्रियकर होते. आणि त्यातील डग्लस माबर्ली, हा लंडनमधील सर्वात आगळावेगळा व लक्ष वेधून घेणारा होता. सर्व दृष्टीने त्याच्यासाठी हे, एका धाडसापेक्षा अधिक काही होते. तो काही समाजातील छचोर माणूस नव्हता, तर अभिमानी माणूस होता. त्याने तिच्यावर भरभरून प्रेम केले व तिच्याकडूनही, तो तशीच अपेक्षा करत होता. पण ती, कल्पनाविश्वात रमणारी, किट्सच्या कवितेतल्यासारखी सुंदर, परंतु क्रूर अशी, बाई होती. जेव्हा तिची मर्जी बदलेल, तेव्हा ती संबंध तोडून टाकायची. आणि दुसऱ्याला हे मान्य नसेल तर, त्याला ताळ्यावर कसे आणायचे, हेदेखील तिला ठाऊक होते.”

“मग ही त्याची, स्वतःचीच गोष्ट झाली -- “

“ओहो, तू हे तुकडे जोडतो आहेस. मी असे ऐकतो आहे, की जवळजवळ तिचा मुलगा शोभेल, अशा लोमोंडच्या तरूण राजाशी ती लग्न करणार आहे. त्याची आई कदाचित, याकडे दुर्लक्ष करेल, पण त्याचे मोठे प्रकरण होईल. म्हणून ते फार महत्वाचे आहे -- ओहो, आपण इथे आलो.”

लंडनच्या पश्चिमेकडील शेवटच्या भागातले, सर्वात देखण्या घरांपैकी ते एक कोपऱ्यावरचे घर होते. एका मशीनसारख्या वॉचमनने आमची कार्डे घेतली व असे सांगत आला, की बाईसाहेब घरात नाहीत. होम्स उत्साहाने म्हणाला, “त्या येईपर्यंत आम्ही थांबतो.”

ते मशीन चिडले.

“घरी नाही, म्हणजे घरी नाही.” तो ओरडला.

होम्स उत्तरला, “ठीक आहे. म्हणजे आम्हाला, थांबावे लागणार नाही. कृपया ही चिठ्ठी तुझ्या मालकिणीला दे.”

त्याने उद्धटपणे त्याच्या वहीमधून, एक पान काढून त्यावर तीन चार शब्द लिहिले व तो कागद दुमडून, एका माणसाच्या हातात दिला.

मी विचारले, “होम्स, तू काय लिहिलेस?”

“मी असे लिहिले,’आम्ही पोलीस असलो तर, मग?’ मला वाटते, आता आपल्याला आत प्रवेश मिळेल.”

तसेच झाले – आश्चर्यकारक रित्या बिनबोभाट झाले. एका मिनिटाने आम्ही अरेबिअन नाईटमधील प्रशस्त व नवल वाटेल अशा, हॉलमध्ये होतो. अर्धवट धुरकट

व कारणपरत्वे, गुलाबी दिव्याच्या प्रकाशात, तो हॉल उजळून निघत होता. त्या बाईसाहेब आल्या. अर्धवट उजेडात सुद्धा, ती सौदर्याभिमानी बाई, उठून दिसत होती, असे मला वाटले. आम्ही आत शिरल्यावर ती तिच्या आसनावरून उठून उभी राहिली. एक उंच, रुबाबदार, प्रमाणबद्ध; सुंदर मुखवटा घातल्यासारखा चेहरा असलेली, पण आमच्या दोघांकडे खुनशी, नवलपूर्ण स्पॅनिश डोळ्यांनी बघणारी!

"काय हा अगोचरपणा -- आणि हा अपमानास्पद निरोप? हातात तो कागदाचा तुकडा धरून तिने विचारले.

"मी स्पष्टीकरण द्यायची गरज नाही, मॅडम. मला तुमच्या बुद्धीमत्तेबद्दल, पूर्ण आदर आहे -- तरी मी असे कबूल करतो की बुद्धीमत्ता ही आश्चर्यकारक रित्या, फार उशिरा आलेली आहे."

"कसे काय, सर?"

"असे गृहीत धरल्यामुळे, की तुमचे भाडोत्री बैल मला घाबरवून, काम करू देणार नाहीत. जर त्यात काही आकर्षक धोके नसतील, तर कुठलाच माणूस, माझा व्यवसाय स्वीकारणार नाही. मला तरुण माबर्लीच्या केसमध्ये लक्ष घालायला, तुम्ही भाग पाडलेत."

तुम्ही काय म्हणत आहात, मला काहीच कळत नाही. भाडोत्री बैलांशी मला काय करायचे आहे?"

होम्स दमल्यासारखा उसासा टाकून लांब वळला.

"हो. मी तुमच्या बुद्धीमत्तेला कमी लेखतो. ठीक आहे. शुभ दुपार!"

“थांबा. कुठे चाललात?”

‘स्कॉटलंड यार्डला.”

आम्ही दाराकडे अर्धेअधिक अंतर कापण्यापूर्वीच, तिने आम्हाला गाठले व होम्सचा हात पकडला. क्षणार्धात तिचे रुपांतर स्टीलकडून मखमलीकडे झाले.

‘महाशय, या. खाली बसा. आपण ह्याबद्दल बोलू. मिस्टर होम्स, मला वाटते, मी तुम्हाला मोकळेपणे सर्व सांगावे. तुमच्या भावना सभ्य गृहस्थाच्या आहेत. माझ्यासारखी बाई किती झटपट, हे जाणू शकते. मी तुम्हाला मित्र समजते.”

“मॅडम, पण मी तसे समजू शकत नाही. मी म्हणजे काही कायदा नाही. माझ्या क्षीण शक्तीप्रमाणे, मी न्यायाने वागायचा प्रयत्न करतो. मी ऐकायला तयार आहे. मी कसे वागेन, हे मी त्यानंतर तुम्हाला सांगेन.”

“तुमच्यासारख्या शूर माणसाला धमकी देणे, हा निःसंशय माझा मूर्खपणा होता.”

“मॅडम, तुम्हाला ब्लॅकमेल करणाऱ्या किंवा उडवून लावणाऱ्या हलकट टोळीच्या हुकमतीखाली, तुम्ही स्वतःला ठेवले आहे, हा तुमचा खरा मूर्खपणा आहे.”

“नाही. नाही. मी इतकी साधी नाही. मी तुम्हाला मोकळेपणे बोलण्याचे वचन दिलेले असल्यामुळे, सांगू इच्छिते की बार्ने स्टॉकडेल आणि त्याची बायको सुसान सोडून, त्याच्यासाठी कोणकोण काम करते, ते त्यांनाही माहिती नाही. तसेही ही काही पहिली -- “ ती हसली व मोहक कामोत्सुकपणे जवळीक दाखवत, तिने मान हलवली.

“अस्स!. तुम्ही पूर्वी पण याचा प्रयोग, केलेला आहे तर.”

‘ते चुपचाप पळणारे, चांगले शिकारी कुत्रे आहेत. “

“असे कुत्रे आज ना उद्या, त्याना खायला घालणाऱ्यांच्या, हाताला चावतात. त्यांना या चोरीबद्दल अटक होईल. पोलीस यापूर्वीच, त्याना पकडायच्या मागे आहेत.”

“ते त्यांचे ते, बघून घेतील. त्यासाठीच, त्याना पैसे दिले जातात. यात मी पडणार नाही.”

‘जोपर्यंत, मी तुम्हाला यात पाडत नाही, तोपर्यंत.”

“नाही. नाही. तुम्ही असे करणार नाही. तुम्ही सभ्य गृहस्थ आहात. हे एका बाईचे, गुपित आहे.”

“पहिल्या प्रथम, तुम्ही ते पुस्तक मला दिले पाहिजे.”

ती हसत सुटली व व शेकोटीकडे चालत गेली. तिथे पुस्तकाचे जळलेले अवशेष पडले होते. ते तिने धातूच्या काठीने हलवले. “हे तुम्हाला परत देऊ?” तिने विचारले. आमच्यासमोर आम्हाला आव्हान देत उभी असलेली ती, लबाड व अति सुंदर, अशी दिसली. होम्सला या गुन्हेगाराचा सामना करणे, इतर सर्व गुन्हेगारांपेक्षा अवघड जाणार आहे, असे मला वाटले. तरी तो भावनेच्या आहारी न जाता, बधिरपणे उभा होता.

तो थंडपणे म्हणाला, “आता तुमचे नशीब फुटले म्हणून समजा. मॅडम, तुम्ही फार जलद हालचाली करता, पण यावेळी तुम्ही जास्त अगाऊपणा, केलेला आहे.’

तिने मोठा आवाज करत, काठी खाली टाकली.

ती ओरडली, “तुम्ही किती कठोर आहात. मी तुम्हाला सगळी कथा सांगू का?”

“मला वाटते, मीच ती, तुम्हाला सांगू शकेन.”

“मिस्टर होम्स, पण तुम्ही ते सर्व, माझ्या चष्म्यातून पाहिले पाहिजे. आयुष्यातील सर्व महत्वाकांक्षा आता लयाला जाणार आहेत, असे शेवटच्या क्षणी दिसणाऱ्या, एका बाईच्या दृष्टीकोनातून, तुम्ही त्याकडे पाहिले पाहिजे. अशा स्त्रीने स्वतःचे संरक्षण केले, तर तुम्ही तिला दोष द्याल का?”

“पण मूळ पाप, तुमचेच होते.”

हो. हो. मी ते कबूल करते. डग्लस फार प्रिय मुलगा होता, पण असे झाले की तो माझ्या बेतांमध्ये बसला नाही. त्याला लग्न हवे होते. लग्न! मिस्टर होम्स, काही करिश्मा नसलेला निर्धन माणूस! मी दिले त्याहून अधिक, त्याला काय मिळणार होते? पण तो तेच, धरून बसला. मी त्याला एकदा जे दिले, ते मी वारंवार त्याला आणि फक्त त्यालाच द्यावे, असा हट्ट तो धरून बसला. ते असह्य होते. शेवटी मला त्याला, ते वेगळ्या प्रकारे समजवावे लागले.’

“तुझ्या खिडकीखाली, त्याच्या अंगावर घालण्यासाठी गुंड पैदा करून.”

“तुम्हाला खरंच, प्रत्येक गोष्ट माहिती दिसते. हो. पण हे खरे आहे. बार्ने व त्याच्या माणसांनी त्याला हाकलून दिले. मी कबूल करते की असे करण्यात, मी फार आततायीपणा दाखवला. एक सभ्य माणूस असा वागू शकेल, याची मी कल्पना करू

शकत नव्हते. त्याने स्वतःची गोष्ट वर्णन करणारे, पुस्तक लिहिले. मी त्यात अर्थातच लांडगा होते. नावे बदलून, त्यात सर्व काही होते. पण सबंध लंडनमध्ये ते कुणाला ओळखू आले नसते का? मिस्टर होम्स, तुम्ही याला काय म्हणाल?"

"काही म्हणा, पण तो त्याचा हक्क होता. त्याला लेखनस्वातंत्र्य होते."

"त्याच्यात जणू इटालीचे वारे संचारले होते. ते जुने दुष्ट इटालियन भूत, अवतरले होते. त्याने मला लिहून कळवले व मला पुस्तकाची एक प्रत पाठवली. त्यामुळे माझा छळ होऊन, मला दुःख होईल, असे त्याला वाटले. पुस्तकाच्या दोन प्रती होत्या. असे तो म्हणाला. एक माझ्यासाठी व एक प्रकाशकासाठी."

प्रकाशक त्याच्यापर्यंत पोचले नाहीत, हे तुम्हाला कसे कळले?"

"त्याचा प्रकाशक कोण आहे हे मला माहिती होते. तुम्हाला माहिती आहे का, की ही एवढीच काही त्याची कादंबरी नव्हती. मी शोधून काढले, की त्याला इटलीहून काही कळलेले नाही. मग अचानक डग्लस मेला. जोपर्यंत दुसरी प्रत, या जगात होती, तोपर्यंत मला काही सुरक्षितता नव्हती. अर्थात, त्याच्या सर्व वस्तू त्याच्या आईकडे, जाणार होत्या. मी एका टोळीला कामाला लावले. त्यातील एकजणाची बायको, त्याच्या आईच्या घरात नोकर म्हणून घुसली. मला मनापासून हे करायचे होते. आणि मी खरेच, ते केले. मी त्यातील सामानासकट, घर विकत घ्यायला तयार होते. तिने सांगितलेली कुठलीही किंमत, मी मान्य करणार होते. जेव्हा इतर कुठलाच मार्ग सापडेना तेव्हाच, मी हा मार्ग अवलंबला. मिस्टर होम्स, आता मी डग्लसवर फार अन्याय केला -- आणि देव जाणतो, की मला त्याबद्दल

पश्चात्ताप होतो आहे. माझा भविष्यकाळ पणाला लागलेला असताना, मी दुसरे काय करू शकत होते?"

शेरलॉक होम्सने त्याचे खांदे उडवले.

तो म्हणाला, 'ठीक आहे. ठीक आहे. मला वाटते, मला नेहमीप्रमाणे या क्रूर गुन्ह्याची, दुसऱ्या एका गोष्टीशी सांगड घालावी लागेल. पहिल्या वर्गाने जगाची सफर करायला, किती खर्च येईल?"

ती बाई आश्चर्याने बघत राहिली.

"पाच हजार पौंडात, हे जमेल का?"

"ठीक आहे मी खरंच, यावर विचार करतो."

"फार छान. मला वाटते त्यासाठी, मी तुम्हाला चेक देईन आणि तो मिसेस माबर्लीना मिळायची व्यवस्था करीन. तुम्ही तिला थोडा बदल, घडवून आणू शकता."

"पण बाईसाहेब मध्यंतरीच्या काळात," -- त्याने धमकी म्हणून त्याचे बोट हलवले. -- "काळजी घ्या. नक्की काळजी घ्या. तुम्ही नेहमीच काही तुमचे नाजूक हात कापल्याशिवाय, धारदार शस्त्राने खेळू शकत नाही."

नमुनेदार अशील

गेल्या अनेक वर्षात, मी त्याला जेव्हा खालील घटना प्रसृत करण्यासंबंधी, दहाव्यांदा विचारले, तेव्हा मिस्टर शेरलॉक होम्सने म्हटले, “आता मी तुला दुखवू शकत नाही.” त्यामुळे मग शेवटी काय झाले, त्याची नोंद ठेवायला, मला परवानगी मिळाली. तो माझ्या मित्राच्या कामगिरीतील कळसाचा क्षण होता.

होम्स आणि मी, दोघांसाठी टर्किश अंघोळ हा अत्यंत आवडीचा विषय आहे. अंग कोरडे करायच्या खोलीतील उबदार व सुखदायक धुराखाली बसल्यावर मी असे

ओळखतो, की आता तो, कमी घुमा झाला आहे व इतर कुठल्याही ठिकाणापेक्षा, अधिक माणसाळला आहे. नॉर्थअंबरलँड इमारतीच्या वरील मजल्यावर, एक एकांडा कोपरा आहे. तिथे दोन आरामशीर खुर्च्या जवळजवळ ठेवलेल्या आहेत. त्या खुर्च्यांवर आम्ही, ३ सप्टेंबर १९०२ ला बसल्यावर, मी माझे वर्णन सुरु केले. मी त्याला विचारले की त्याच्या भावनांचा उद्रेक होतो आहे का, तेव्हा उत्तरादाखल त्याने त्याचा लांब, बारीक, हात, शेजारी टांगलेल्या कोटाच्या खिशातील पाकिटातील कागदांवरुन, बाजूला काढला.

"हे कदाचित जास्त रंगवलेले, स्वतःला अति महत्व देण्याचा मूर्खपणा करणारे व जीवनमरणाचा प्रश्न असणारे, असू शकेल. या निरोपाव्यतिरिक्त मला काहीही माहिती नाही." असे म्हणून, त्याने एक कागद माझ्याकडे दिला.

तो कार्लटन क्लबकडून, आदल्या दिवशी संध्याकाळी आलेला होता. सर जेम्स डॅमरीकडून, शेरलॉक होम्सला आमंत्रण मिळालेले होते. त्यात असे लिहिलेले होतेः

'तो उद्या ४.३० वाजता, शेरलॉक होम्सला फोन करणार होता. सर जेम्स डॅमरीना, ज्या बाबतीत, शेरलॉक होम्सकडून सल्ला हवा होता, ती बाब अतिशय नाजूक व खूप महत्वाची होती. त्यामुळे मिस्टर होम्स या मुलाखतीला नक्की मान्यता देतील व मग कार्लटन क्लबमध्ये कधी भेटायचे ते फोनवर ठरवले जाईल.'

"मी त्या मुलाखतीला मान्यता दिली, हे काही तुला सांगण्याची आवश्यकता नाही, वॉटसन. तुला जेम्स डॅमरीबद्दल काही माहिती आहे का?" मी कागद परत केल्यावर होम्स म्हणाला.

"आपल्या समाजातील हे घरगुती नाव आहे, एवढेच."

"मी त्याहून थोडे अधिक, सांगू शकतो. कागदावर न लिहिण्याजोग्या गोष्टी मार्गी लावण्याबद्दल, तो कीर्ती राखून आहे. सर जॉर्ज लेविसबरोबरची त्याची हॅमरफोर्डच्या मृत्युपत्राच्या बाबतीतील चर्चा, तुला आठवत असेल. निसर्गदत्त असे, गोष्टी हाताळण्याचे शहाणपण , त्याच्याइतके जगात कोणाकडे नसेल. त्यामुळे मला अशी आशा आहे, की हे काही खोटेनाटे नसेल व त्याला आपल्या मदतीची, खरोखर आवश्यकता असेल.

"आपल्या?"

"वॉटसन, जर तू तयार असशील तर."

"हा तर माझा सन्मान आहे."

"तर मग ४.३० ची वेळ लक्षात ठेव. तोपर्यंत डोक्यातील तो विचार बाजूला ठेऊ."

राणी ॲन रस्त्यावरील माझ्या खोलीत मी त्यावेळी रहात होतो. वेळेपूर्वीच मी बेकर रस्त्याला पोचलो. बरोबर अर्ध्या तासाने, सर जेम्स डॅमरी येत असल्याचे कळले. बहुतेकांना त्यांचे उंचीपुरे, व प्रामाणिक व्यक्तिमत्व, तो रुंद, नीट दाढी केलेला चेहरा आणि त्यावर कडी म्हणजे सुखकारक, मृदु आवाज, आठवत असेल, त्यामुळे त्यांचे वर्णन करायची बहुधा गरज नसावी. त्याच्या करड्या, आयरिश डोळयांमधून मोकळेपणा आणि हलणाऱ्या हसऱ्या ओठांमधून नम्र विनोदी स्वभाव, दृगोचर होई. त्यांच्या डोक्यावरील तेजस्वी टोपी, गडद ढगळ कोट, खरे तर, प्रत्येक बारीकसारीक गोष्ट, काळया सॅटीनच्या नेकटायमधील मोत्याचा पिनेपासून ते लव्हेंडरचा थर

असलेल्या चकचकीत बुटांपर्यंत सर्व गोष्टी, त्यांचा एकंदरीत व्यवस्थितपणा दर्शवत होत्या. त्यासाठी तो प्रसिध्द होता. असा तो मोठा शक्तिशाली उमराव, खोलीत येऊन एकदम उठून दिसू लागला.

नम्रपणे अभिवादन करून, झुकत त्याने शेरा मारला, "अर्थात मी डॉ वॉटसनला, शोधण्याची तयारी ठेवली होती. त्याचा सहभाग कदाचित, खूप जरुरीचा भासेल. कारण मिस्टर होम्स, यावेळी आपण रक्तपात ज्याच्या बाबतीत नेहमीचा आहे आणि जो कसलाही विधिनिषेध बाळगत नाही, अशा माणसाशी सामना करणार आहोत. त्याच्याहून अधिक भीतीदायक मनुष्य युरोपमध्ये नाही, असे मी म्हणू शकतो."

होम्स हसून म्हणाला, अशी वर्णने लागू पडणाऱ्या अनेक शत्रूंबरोबर, मी सामना केलेला आहे. तुम्ही सिगरेट ओढत नाही का? मग मी माझा पाईप पेटवला, तर तुम्ही मला माफ कराल? मृत प्रोफेसर मोरीआर्टी किंवा जिवंत कर्नल सेबॅस्टीअन मोरान, यांच्यापेक्षा तुमचा माणूस जास्त भीतीदायक असेल तर, तो खरंच भेटण्यायोग्य आहे. मी त्याचे नाव विचारू शकतो का?"

"तुम्ही बॅरॉन ग्रुनरचे नाव, ऐकले आहे का?"

"म्हणजे तो ऑस्ट्रीअन खुनी?"

कर्नल डॅमरीने हसतहसत, त्यांचे मऊ हातमोजे काढून टाकले. मिस्टर होम्स, तुमच्याशी बोलणे अशक्य आहे. छान! तेव्हा तुम्ही आधीच, त्याला खुनी म्हणून ओळखले आहे."

"जगातील गुन्ह्यांची नोंद घेणे, हा माझ्या व्यवसायाचा भाग आहे. नाहीतर प्रागमध्ये काय झाले व त्या माणसाने काय गुन्हा केला होता, याबद्दल कोण वाचणार! तो पूर्णपणे तांत्रिक व कायदेशीर मुद्दा होता आणि साक्षीदाराच्या संशयास्पद मरणाने, त्याला वाचवले. स्प्लुजेन खिंडीतील तथाकथित अपघात झाला, तेव्हा त्यानेच त्याच्या बायकोला ठार केले होते, याबद्दल मी अगदी ठाम आहे. तो इंग्लंडला आला व त्याला अंतरज्ञानाने कळले की, पुढे तो मला काहीतरी काम देणार आहे. बरं. बॅरॉन ग्रुनरने काय केले? मी गृहीत धरतो, की ती जुनी दुःखांत गोष्टच, परत वर आलेली नसेल."

"नाही. ही त्यापेक्षा गंभीर आहे. केलेल्या गुन्ह्याचा सूड घेण्यापेक्षा, तो रोकणे जास्त महत्वाचे आहे. मिस्टर होम्स, ही भयानक गोष्ट आहे. भयंकर घटना, अतिशय दुष्ट परिस्थिती, तुमच्या डोळ्यादेखत घडणारी व ती कुठल्या थराला जाईल याची कल्पनाही करता येणार नाही, अशी गोष्ट! मनुष्यप्राण्याला याहून जास्त अवघड पेचात पकडणे शक्य आहे का?"

"कदाचित नाही."

"मग ज्या माझ्या अशीलासाठी मी लढत आहे, त्याच्याबद्दल तुम्हाला नक्कीच सहानुभूती वाटेल."

"मला कळत नाही, की तुम्ही फक्त दोघांच्या मधले आहात, तर मग तुमचा अशील कोण आहे?"

"मिस्टर होम्स, मी तुम्हाला विनंती करतो की या प्रश्नाचा तुम्ही आग्रह धरु नये. मी त्याला, त्याचे नाव यात येणार नाही, असे आश्वासन देणे, महत्वाचे आहे.

त्याचा उद्देश अगदी पूर्णपणे सन्मान्य व धीटपणाचा आहे. पण तो या प्रकरणात, निनावी राहू इच्छितो. तुम्हाला किती फी लावायची, ते स्वातंत्र्य असेल आणि ती नक्की दिली जाईल. मला वाटते, अशीलाचे खरे नाव माहिती नसले, तरी काही बिघडत नाही.

होम्स बोलला, "मी माफी मागतो. माझ्या केसमध्ये गूढ असलेली एक बाजू असते. पण इथे तर दोन्ही बाजू, गोंधळ उडवणाऱ्या आहेत. सर जेम्स, मला वाटते, मी यातून माघार घ्यावी."

आमचा पाहुणा फार नाराज झाला. त्याचा विशाल व भावनामय चेहरा निराशेने उतरला.

तो म्हणाला, "तुमच्या या कृत्याचा परिणाम, तुमच्या लक्षात येत नाही आहे. तुम्ही मला धर्मसंकटात टाकले आहे. जर मी तुम्हाला या केसबद्दल सांगितले, तर तुम्हाला ही केस घ्यायला, नक्की अभिमान वाटेल, याची मला खात्री आहे. पण वचन दिलेले असल्यामुळे, मी काही गोष्टी उघड करू शकत नाही. मला शक्य आहे तेवढे, मी तुमच्यासमोर मांडू शकतो का?"

"जोपर्यंत माझ्यावर केस हातात घेण्याचे काही बंधन नाही, तोपर्यंत तुम्ही नक्कीच, तसे करू शकता."

"ठीक आहे. प्रथमतः तुम्ही जनरल डी मरव्हील बद्दल नक्कीच ऐकले असेल."

"खैबर केसच्या बाबतीत प्रसिध्द असलेला, डी मरव्हील? मी ऐकले आहे."

"त्याला एक मुलगी आहे. तरुण, श्रीमंत, सुंदर, किर्तीवान अशी, व्हॉयोलेट डी मरव्हील. सर्व बाबतीत आश्चर्यकारक तरुणी आहे. ही सुंदर, निरागस मुलगी, एका राक्षसाच्या तावडीतून वाचावी, म्हणून आम्ही प्रयत्न करत आहोत."

"बॅरॉन ग्रुनरने तिच्यावर काही कब्जा केला आहे का?"

"बाईचा संबंध येणारा सर्वात शक्तिमान कब्जा -- प्रेमाचा कब्जा. तुम्ही कदाचित ऐकले असेल, त्याप्रमाणे तो आकर्षक पद्धतीने, असामान्य रित्या, देखणा आहे. गंभीर आवाज, रोमांचक वागणूक व गूढरम्यता, ही स्त्रियांना आवडणारी सर्व लक्षणे, त्याच्यात आहेत. तो कामचतुर आहे आणि त्याचा त्याने, पुरेपूर उपयोग करून घेतलेला आहे."

"पण व्हॉयोलेट डी मरव्हील बाईसाहेब, त्याला कशा काय भेटल्या?"

"भूमध्य समुद्र सफरीतील जहाजावर, ते भेटले. कंपनी निवडकपणे, त्यांच्या प्रवाशाना निवडत असते. पण बहुधा ही सफर घडवणाऱ्यांना, बॅरॉन ग्रुनरचे खरे चारित्र्य कळेपर्यंत, फार उशीर झाला होता. त्या खलनायकाने तोपर्यंत, बाईसाहेबांशी जवळीक साधली होती. आणि इतक्या पराकोटीची, की त्याने निःसंशय पूर्णपणे त्यांचे हृदय जिंकले होते. ती तिचे प्रेम, क्वचितच उघड करत असली, तरी त्याच्या अतोनात प्रेमात पडली होती. त्याने तिच्यावर, जणू गारुड घातले होते .त्याच्याशिवाय सर्व जग, तिच्यासाठी सुने होते. ती त्याच्याविरुद्ध एकही शब्द, ऐकून घ्यायला तयार नव्हती. तिला त्याच्याशिवाय, जग सुने वाटत होते. थोडक्यात, तिने पुढील महिन्यात त्याच्याशी लग्न करायचे ठरवले आहे. तिला त्यापासून, परावृत्त

करण्याचे सगळे प्रयत्न फसले. ती सज्ञान आहे व निश्चयाची पक्की आहे. त्यामुळे तिला कसे मागे खेचावे, हे ठरवणे अवघड आहे."

"तिला ते ऑस्ट्रीअन प्रकरण, माहिती आहे का?"

"पटणार नाही असे, त्याच्या पूर्वायुष्यातील प्रत्येक सार्वजनिक प्रकरण, त्या लबाड दैत्याने तिला सांगितले आहे. पण अशा तऱ्हेने, की तो अगदी निरागस व भोळा वाटावा व तिने ते पूर्णपणे मान्य केले आहे. याबाबतीत ती कोणाचे काही, ऐकून घ्यायला तयार नाही."

"प्रिय माणसा, तू नक्कीच नकळत का होईना, पण तिचे नाव फोडले आहेस. संशयातीतपणे, जनरल डी मरव्हील हेच तुमच्या अशीलाचे नाव आहे."

आमच्या पाहुण्याने निराशेने खुर्चीत बसकण मारली.

"मिस्टर होम्स, असे म्हणून मी तुम्हाला फसवू शकतो, पण ते खरे नसेल. डी मरव्हील हा निराश झालेला मनुष्य आहे. तो दणकट शिपाई, या घटनेने पार हादरून गेला आहे. रणभूमीवर दाखवलेले अवसान गळून पडले आहे व तो अशक्त झाला आहे. थरथरणारा म्हातारा माणूस, झाला आहे. हुशार, बलवान व दुष्ट अशा त्या ऑस्ट्रीअनचा पाडाव करायला, तो हतबल आहे. माझा जुना मित्र जनरलचा फार वर्षांपासूनचा जवळचा मित्र आहे. आणि याप्रकरणात त्याने मुलीचा पालक असल्यासारखी, रुची घेतली आहे. अगदी लहान असल्यापासून त्याने, तिला पाहिलेले आहे. ही दुःखदायक गोष्ट त्याला पाहवत नाही आणि तिला त्या नराधमापासून वाचवल्याशिवाय, त्याला राहवत नाही. स्कॉटलंड यार्डने यात करण्यासारखे, काही नाही. त्यानेच सुचवल्यावरून, मी तुम्हाला बोलावले आहे. पण तो यात व्यक्तिशः

गुंतला जाईल, असे काही त्याला, मी म्हटल्याप्रमणे नको आहे. मिस्टर होम्स, तुमच्या सामर्थ्याने तुम्ही माझा अशील, सहज ओळखू शकाल. पण माझा मान ठेऊन, तुम्ही कृपया असे करू नका. त्याची ओळख गुप्त ठेवा."

होम्स खेळीमेळीचे हसू हसला.

तो म्हणाला, "मी तुम्हाला खात्रीने हे सांगू शकतो की तुमच्या समस्येत, मला रुची वाटू लागली आहे. मी नक्की त्यात लक्ष घालेन. मी तुमच्याशी, कसा संपर्क ठेऊ शकतो?"

"मी कार्लटन क्लबमध्ये असतो. पण तातडीच्या वेळी, XX.31 हा माझा खासगी फोन तुम्ही वापरू शकता. होम्सने, नंबर उतरवून घेतला. व टिपणांचे पुस्तक त्याच्या गुडघ्यांवर उघडे ठेऊन बसला. अजूनही तो हसत होता.

"बॅरॉनचा सध्याचा पत्ता काय आहे?"

"किंगस्टन जवळील व्हरनॉन लॉज. ते मोठे घर आहे. तो काही नको ते तर्क करण्याच्या बाबतीत, नशीबवान आहे व श्रीमंत माणूस आहे. त्यामुळे तो सहजपणे, विरुद्ध भूमिका घेण्याची भयानकता, दाखवू शकतो."

"आत्ता तो घरी आहे का?"

"हो."

"तुम्ही मला जे सांगितले त्याव्यतिरिक्त, या माणसाबद्दल अजून काही माहिती, तुम्ही देऊ शकता का?

“त्याला अनेक गोष्टीत रुची आहे. तो घोड्यांचा शौकीन आहे. हर्लिंगहॅम येथे काही काळ, तो पोलो खेळत होता. पण नंतर हे प्रागचे प्रकरण उद्भवले आणि त्याला तो खेळ, सोडून द्यावा लागला. तो पुस्तके व चित्रे जमवतो. निसर्गाबद्दल त्याला बऱ्यापैकी कलात्मक दृष्टीकोन आहे. चिनी मातीच्या भांड्यांमध्ये, मला वाटते, तो चांगलाच अधिकारी व्यक्ती आहे. त्यावर त्याने पुस्तक लिहिले आहे.”

होम्स म्हणाला, “त्याचे मन बरेच गुंतागुंतीचे दिसते आहे. सर्व अट्टल गुन्हेगारांचे असेच असते. चार्ली पीस नावाचा माझा मित्र, व्हॉयोलिन वाजवण्यात निष्णात होता. वॅगनबिल्डरदेखील थोर कलाकारच म्हणायला पाहिजे. मी अजून अनेक उदाहरणे देऊ शकतो. बर. सर जेम्स, तुम्ही तुमच्या अशीलाला कळवाल का, की मी बॅरॉन ग्रुनरवर माझे लक्ष ठेवणार आहे. अजून जास्त मी काही सांगू शकत नाही. माझी स्वतःची अशी माहिती मिळवण्याची, काही ठिकाणे आहेत आणि त्यातून या प्रकरणावर, काही उजेड पडू शकेल.”

आमचा पाहुणा निघून गेल्यावर, होम्स बराच वेळ, खोल विचार करत बसला. माझे तेथील आस्तित्व, तो जवळजवळ विसरून गेला. शेवटी एकदाचा तो भानावर आला.

त्याने विचारले, “वॉटसन, तुला काय वाटते आहे?”

“मी असा विचार करेन, की तू स्वतः त्या तरूण स्त्रीला भेटावेस.”

“माझ्या प्रिय वॉटसन, जर तिचे गरीब बिचारे वयस्क वडील, तिचे मतपरिवर्तन करू शकत नाहीत, तर माझी काय कथा? माझ्यासारख्या परक्याला, ते कसे काय जमेल? सर्व उपाय थकले, तर मग तेदेखील करून बघायला हरकत नाही.

पण आपण वेगळ्या बाजूने सुरवात करावी, असे मला वाटते. मला वाटते शिनवेल जॉन्सनची मदत घ्यावी."

शिनवेल जॉन्सन मला आठवेल, असा काही प्रसंग, माझ्या बाबतीत घडलेला नव्हता. कारण माझ्या मित्राच्या कारकीर्दीच्या उत्तरार्धातील केसेस, मी पाहिल्या होत्या. शतकाच्या प्रारंभी, शिनवेल एक चांगला मदतनीस होता. मला सांगायला खेद होतो, पण शिनवेल जॉन्सन याने पहिल्यांदा धोकेदायक खलनायक, म्हणून नाव मिळवले होते. आणि त्याने वर्षभर, पार्कहर्स्ट येथे नोकरी केली होती. नंतर त्याला पश्चात्ताप झाला व तो होम्सकडे आला. लंडनच्या मोठ्या गुप्त गुन्हेगारी जगातील दलाल, म्हणून काम सुरु केले व त्यात तो अतिशय महत्वाचा ठरला. मादकद्रव्यबंदीच्या बाजूने पोलिसांचा खबऱ्या, म्हणून तो असला तरी, सरळ कोर्टात जाणाऱ्या केसमध्ये तो नसे. त्यामुळे, त्याच्या मित्रांना त्याच्या कृत्यांबद्दल कधीच काही माहिती नव्हती. त्याला दोषी न ठरवण्यामध्ये प्रामुख्याने दोन बाबी होत्या. एक म्हणजे तो शहरातील डॉसघर व गॅम्बलिंगडेन अशा प्रत्येक रात्रक्लबमध्ये, सहज शिरकाव करू शके व दुसरे म्हणजे त्याचा चाणाक्ष मेंदू, झटपट निरीक्षण करू शके. माहिती मिळवण्यासाठी, तो उत्कृष्ट दलाल होता. अशा माणसाची मदत घेण्याचे, शेरलॉक होम्स ठरवत होता.

माझा मित्र, जी झटपट कारवाई करू पहात होता, ती मला समजणे, शक्य नव्हते कारण माझ्या डॉक्टरकीच्या व्यवसायाचे बंधन, माझ्यावर होते. पण मी सिम्पसनमध्ये त्याला ठरवून भेटलो. तिथे खिडकीसमोरील छोट्या टेबलावर बसून, स्ट्रँडमधील खालील गर्दीचे आयुष्य बघताना, त्याने कायकाय केले, ते सांगितले.

तो म्हणाला, "जॉन्सन अस्वस्थपणे, शोध घ्यायच्या मागे आहे. या माणसाच्या गुपितांचा शोध घेण्यासाठी, त्या जगाच्या अंधारमय कचऱ्याखालील घाण, चिवडून काढतो आहे. गुन्हेगारीची काळी पाळेमुळे, खणून काढतो आहे."

"पण जे आधीच माहिती आहे, ते ती बाई समजून घेत नसेल, तर अजून काही सापडले, तरी त्याचा काय उपयोग आहे?

"कोणाला माहीत, वॉटसन, बायकांचे मन व हृदय जाणून घेणे, हे पुरुषांसाठी न सुटणारे कोडे आहे. खुनाचे कारण शोधून काढणे किंवा त्याचे स्पष्टीकरण देणे, एकवेळ सोपे आहे, पण थोडीदेखील बेकायदेशीर गोष्ट, आपल्यावर उलटू शकते. बॅरॉन ग्रुनरने, मला असा शेरा मारला आहे -- "

"तो तुझ्याजवळ बोलला?"

"ओहो, खरे तर मी तुला, माझे बेत सांगितले नाहीत. असे बघ वॉटसन, मला माझ्या भक्ष्याची जवळून गचांडी धरायला आवडते. मला त्याला समोरासमोर भेटायचे आहे. आणि तो काय चीज आहे, ते जाणून घ्यायचे आहे. जेव्हा मी जॉन्सनला सूचना दिल्या, तेव्हा किंगस्टनसाठी एक टॅक्सी घेऊन, मी बाहेर पडलो व बॅरॉन अगदी सहजपणे बोलायला उत्सुक असल्याचे पाहिले."

"त्याने तुला ओळखले का?"

"त्यात काही कठीण नव्हते. मी सरळ माझे कार्ड आत पाठवले. तो उत्तमपैकी विरोध करणारा व बर्फाप्रमाणे थंड आहे. त्याचा आवाज रेशमी आहे व तो तुझ्या एका फॅशनेबल सल्लागाराप्रमाणे मृदुभाषी व कोब्रा नागाप्रमाणे, विषारी आहे. तो उपजत, खराखुरा गुन्हेगारांचा उमराव आहे. तो सहजपणे दुपारच्या चहाला

बोलावेल आणि त्यामागे थंड डोक्याने केलेली गुन्हेगारी चाल, असू शकेल. मला बॅरॉन अडेलबर्ट ग्रुनरची केस दिल्याचा, आनंद आहे."

"तो सहजपणे, मित्रत्वाने बोलणारा असल्याचे, तुझे म्हणणे आहे?"

"तो म्हणजे, पोट भरलेले असल्याचा आव आणणारे, पण पुढ्यातील उंदरावर लक्ष ठेऊन असणारे, लबाड मांजर आहे. रक्तपात करणाऱ्या ओबडधोबड माणसापेक्षा, काही लोकांचा सहज, साधा स्वभाव कधीकधी भारी पडू शकतो. त्याचे स्वागत अगदी ठराविक पद्धतीचे होते, "मिस्टर होम्स, मी खरे तर असाच विचार करत होतो, की आजउद्या तुम्हाला भेटावे. तुम्ही संशयातितपणे जनरल डी मरव्हीलतर्फे, त्याची मुलगी, व्हॉयोलेट हिच्याशी होणारे माझे लग्न थांबवण्यासाठी, नेमले गेला आहात, असे ते आहे. बरोबर ना?"

मी शांतपणे ते मान्य केले.

तो म्हणाला, "माझ्या प्रिय माणसा, तू फक्त तुझी स्वतःची खरीखुरी असलेली कीर्ती, गमावून बसणार आहेस. तू यात यशस्वी होशील, असे मला वाटत नाही. तू केलेले श्रम व सर्व काम, फुकट जाईल. तू स्वतःचा जीव धोक्यात घालून बसशील. तू ताबडतोब, यातून काढता पाय घ्यावास, असे मी तुला बजावून सांगतो आहे."

मी बोललो, "हे उत्कंठावर्धक आहे, हेच मला तुला सांगायचे होते. बॅरॉन, मला तुझ्या बुद्धीबद्दल आदर आहे, आणि तुझे थोडेसे जे व्यक्तिमत्व, मी पाहिले आहे, त्यामुळे ते मत मुळीच बदललेले नाही. मला तुला तुझ्या तोंडावर हे सांगूदे की, कोणालाच तुझा भूतकाळ, उकरून काढून, तुला निष्कारण अस्वस्थ करायचे नाही.

झाले ते होऊन गेले. आता तू स्वच्छ पाण्यात आहेस. पण जर तू या लग्नासाठी हट्ट धरून बसलास, तर तू शक्तिमान शत्रूंचा घोळका, तुझ्याभोवती जमा करून ठेवशील. ते तुला इंग्लंडमध्ये रहाणे नकोसे करून टाकतील. एवढा त्रास सहन करून, तुला तुझेच म्हणणे लावून धरायचे आहे का? तू त्या बाईला सोडून दिलेस तर, ते शहाणपणाचे ठरेल. तुझा भूतकाळ तिच्या नजरेसमोर आणला, तर ते तुझ्यासाठी फार चांगले ठरणार नाही."

एखाद्या किटकाच्या मिशांसारखे, बॅरॉनच्या नाकाखाली असलेले छोटे कडक केस, तो ऐकत असताना, मजेत हलत होते. शेवटी तो गालातल्या गालात हसू लागला.

तो बोलला, "मिस्टर होम्स, माझे मनोरंजन करणे थांबवा. हातात तशी चांगली काहीही पाने नसताना खेळत राहणे, हे खरोखर विनोदी आहे. यापेक्षा जास्त चांगले, कोणीच काही करू शकणार नाही. पण हे दयनीय आहे. तुमच्याकडे तसे काहीच बळ नाही. तुम्ही अति क्षुद्र आहात."

"तुला असे वाटते तर!"

"हो. मला हे अजून स्पष्ट करुदे. मी इतका बलशाली आहे व मी ते दाखवूही शकतो. या बाईचे प्रेम जिंकण्याइतका मी सुदैवी आहे. माझ्या पूर्वायुष्यातील दुःखद घटना स्पष्टपणे सांगितल्यावरदेखील, ते प्रेम अबाधित आहे. मी तिला हेही सांगितले की, काही दुष्ट व स्वार्थी लोक -- मला वाटते, तू स्वतःला ओळखले असशील -- तुझ्याकडे येऊन, तुला ह्या गोष्टी सांगतील. अशा लोकांबरोबर कसे वागायचे, याबद्दल मी तिला चांगलेच सुनावले आहे. मिस्टर होम्स, संमोहिततेनंतरच्या सूचनेबद्दल तू

ऐकले असशील. तू आता बघशीलच, की काही शिष्टसंमत नसलेल्या व मूर्खपणाच्या गोष्टींशिवाय, एखादा रुबाबदार मनुष्य, कशी भूल घालू शकतो. तुझे ऐकून घ्यायला ती तयार होईल, यात काही संशय नाही, ती तुझ्याबरोबर भेटीची वेळही ठरवेल. कारण ती तिच्या वडीलांच्या इच्छेशी, बांधली गेलेली आहे -- फक्त एकच गोष्ट ती करणार नाही,"

"तर वॉटसन, अशा तऱ्हेने आता काही सांगायचे राहिले नाही. मग जेवढा आब राखून निघता येईल, तेवढा राखून मी निघालो. पण मी दरवाजाशी जाताच, त्याने मला थांबवले."

"मिस्टर होम्स, सहज विचारतो, तुला ली ब्रून हा फ्रेंच दलाल माहिती आहे का?"

मी म्हणालो, "हो."

"त्याला काय झाले, माहिती आहे का?"

"मी असे ऐकले, की मॉन्टमारट्रे भागातील अपाचींनी, त्याला इतके पिटून काढले, की तो आयुष्यभरासाठी पांगळा झाला."

"हे सर्वस्वी खरे आहे, मिस्टर होम्स. आश्चर्यकारक योगायोगानी, तो आठवड्यापूर्वी माझी चौकशी करत होता. मिस्टर होम्स, तू असे करू नकोस. हे केलेस, तर नशीब चांगले राहणार नाही. खूपजणांनी याचा प्रत्यय घेतला आहे. माझे तुला शेवटचे सांगणे आहे, की मला माझ्या मार्गाने जाउदे व तू तुझ्या मार्गाने जा. अच्छा."

"तर, असे सर्व झाले. तुला आता सर्व माहिती झाले."

“तो प्राणी, धोकादायक दिसतो आहे.”

“फारच धोकादायक! मी फुशारक्या मारणाऱ्यांची काही पर्वा करत नाही. पण हा, त्याला जे खरे बोलायचे आहे, त्यापेक्षा कमीच बोलतो.”

“तू यात पडलेच पाहिजेस का? त्याने त्या मुलीशी लग्न केले, तर खरेच एवढे काही बिघडते का?”

“त्याने त्याच्या आधीच्या बायकोचा नक्कीच खून केला, हे लक्षात घेता, मला असे म्हणावेसे वाटते की फारच बिघडते. शिवाय आपला अशील! ठीक आहे. ठीक आहे. आपण त्याची चर्चा करायची गरज नाही. तुझी कॉफी घेऊन झाली की तू माझ्याबरोबर घरी यावेस हे उत्तम, कारण शिनवेल जॉन्सन त्याचा अहवाल घेऊन तिथे येईल.”

दणकट, ओबडधोबड, लाल चेहऱ्याचा व सुजलेल्या, रक्त येणाऱ्या हिरड्यांचा, अशा शिनवेलला, आम्ही पाहिले. त्याचे ठळक काळे डोळे, त्याच्या आतल्या लबाड मनाचे, एकमेव द्योतक होते. त्याने त्याच्या विशेष अशा राज्यात, उडी घेतल्याचे दिसत होते. त्याच्या शेजारी एक ध्यान बसले होते. ती बारीक, ज्योतीसारखी दिसणारी, फिकट, ताणलेल्या चेहऱ्याची, तरुण बाई होती. पण पाप आणि दुःखामुळे, ती महारोग्यासारख्या दुर्धर आजारातून उठलेली, दिसत होती.

शिनवेल जॉन्सन त्याचा जाड हात हलवून, ओळख करून देत म्हणाला, ‘ही मिस कीटी विंटर आहे. तिला काय माहिती नाही -- खरे तर तीच तिच्यासाठी बोलेल. मिस्टर होम्स, तुमचा निरोप आल्यापासून तासाभरात, मी तिला बोलावून घेतले.

ती तरुण स्त्री म्हणाली, “मला शोधणे सोपे आहे. मी लंडनमध्येच असते. जाड्या शिनवेलचा पत्ता, तोच आहे. तो जाड्या, तू व मी जुने मित्र आहोत. पण देवा रे! जगात काही न्याय असेल, तर अजून एकजण आपल्या खूप खाली नरकात, असायला हवा आहे. मिस्टर होम्स, तो तुम्हाला हवा असलेला, माणूस आहे.”

होम्स हसला. “तुम्ही दोघे माझ्यासाठी काम करायला तयार आहात, असे मी समजतो.”

“ज्या ठिकाणाची त्याची लायकी आहे, तिथे त्याला पोचवण्यात, मी तुमच्याबरोबर आहे.” ती पाहुणी भयंकर जोराने बोलली. तिच्या पांढऱ्या चेहऱ्यावर व डोळ्यात, पुरुष माणसांच्या चेहऱ्यावर कधीच न दिसणारा व बायकांच्या बाबतीत अगदी क्वचित दिसणारा असा, पराकोटीचा द्वेष दिसत होता.

“मिस्टर होम्स, तुम्ही माझ्या भूतकाळात जाऊ नका. तो इथे, काही कामाचा नाही. पण मी जी काही आहे, ती अडेलबर्ट ग्रुनरने केल्यामुळे आहे. जर मी त्याला खाली ओढू शकले तर! ओहो, त्याने बऱ्याच जणाना ज्या खड्ड्यात लोटले, त्यात त्याला मी ढकलून देऊ शकले तर!” तिने भीतीने तिचे हात हवेत उडवले.

“काय प्रकरण आहे, ते तुला माहिती आहे का?”

“जाड्या शिनवेल, मला सांगत असतो. ग्रुनर सध्या अजून एका गरीब बिचाऱ्या मूर्ख बाईच्या, मागे आहे व यावेळेस, त्याला तिच्याशी लग्न करायचे आहे. तुम्हाला, ते थांबवायचे आहे. शुद्धीवर असलेल्या शहाण्या मुलीला, चर्चमध्ये त्याच्याशी लग्न करायचे आहे व तिला त्यापासून परावृत्त करण्यासाठी, तुम्हाला त्या राक्षसाबद्दल, नक्कीच पुरेसे ठाऊक आहे.”

“ती शुद्धीवर नाही. तिचे त्याच्यावर, वेड्यासारखे प्रेम आहे. तिला त्याच्याबद्दल, सगळे सांगण्यात आले आहे, पण ती कसलीच पर्वा करत नाही.”

“खुनाबद्दल सांगितले का?”

“हो.”

“अरे देवा, ती फारच ठाम दिसते.”

“ती, सर्व खोटे असल्याचे समजते.”

“तुम्ही तिच्या मूर्ख डोळ्यांसमोर, पुरावे सादर करू शकत नाही का?”

“असे बघा, यात तुम्ही आम्हाला, मदत करू शकता का?”

“मी स्वतःच एक पुरावा नाही का? जर मी तिला, मला त्याने कसे वापरून घेतले हे सांगितले तर -- ”

“तू ते करशील का?”

“करशील का? का नाही करणार?”

“छान. असे करून बघणे, कदाचित योग्य असेल. पण त्याने तिला, त्याच्या बहुतेक गैरकृत्यांबद्दल, सांगितले आहे व तिने त्याला, क्षमाही केलेली आहे. मला वाटते पुन्हा ती याबद्दल, काही ऐकून घेणार नाही.”

मिस विंटर म्हणाली, “मी पैजेवर सांगते, की त्याने तिला सगळे सांगितले नसणार. कारण नसताना, खूप उद्दीपित करणारा एक खून सोडून, मी त्याने केलेले एकदोन खून, थोडेफार पाहिलेले आहेत. त्याबद्दल, त्याच्या मखमली आवाजात तो

बोलत असे व नंतर माझ्या डोळ्याला डोळा भिडवून म्हणात असे, 'तो महिन्याभरात वारला' ती गोष्ट खरी नव्हती. मी फार लक्ष दिले नाही -- असे बघा, मी तेव्हा स्वतःहून, त्याच्या प्रेमात पडले होते. तो जे म्हणेल, ते मला खरे वाटे, या मूर्ख मुलीसारखेच! फक्त एकाच गोष्टीने मला हलवले. हो, येशूने. माझ्या सुदैवाने! त्याच्या विषारी, खोटे बोलणाऱ्या जिभेने, एकाच वेळी स्पष्ट करणाऱ्या व शांत करणाऱ्या जिभेने. मी त्याच रात्री त्याला सोडले. त्याच्याकडे एक कुलुपबंद चॉकलेटी पुस्तक आहे. त्यावर त्याच्या सोन्याने मढवलेल्या हातांचे चित्र आहे. मला वाटते, त्या रात्री ,तो थोडा प्यायलेला होता, नाहीतर त्याने मला ते दाखवले नसते."

"ते काय होते?"

"मी सांगते. मिस्टर होम्स, जसे काही माणसे, फुलपाखरे व कीटक गोळा करतात, तसे हा मनुष्य बायकाना गोळा करतो व त्याबद्दल अभिमान बाळगतो. त्यात त्या बायकांचे फोटो, नाव, पत्ता व प्रत्येक बारीकसारीक गोष्ट, लिहिलेली असते. ते पशुतुल्य पुस्तक होते. गटारातून आलेला मनुष्यही गोळा करणार नाही, अशी माहिती त्यात होती. पण ते अडेलबर्ट ग्रुनरचे पुस्तक होते. जर त्याला काही कानफटात द्यायची असेल, तर त्यावर असे नाव पाहिजे की 'त्या, ज्याना मी लुबाडले.' पण ते पुस्तक तुम्हाला इथेतिथे कुठेच, सापडणार नाही व त्याने तुमचा उद्देश सफल होणार नाहीच व झाला तरी ते तुम्हाला मिळणारच नाही."

"ते कुठे आहे?"

"ते आत्ता कुठे आहे, हे मी तुम्हाला कसे काय सांगू शकेन? मी एक वर्षाहून जास्त काळापूर्वीच, त्याला सोडले. तेव्हा तो ते कुठे ठेवायचा, हे मी सांगू शकेन. तो

अनेक बाबतीत, नीटनेटका, व्यवस्थित असा माणूस आहे. तेव्हा कदाचित, अजूनही आतल्या अभ्यासिकेच्या जुन्या कपाटाच्या कप्प्यात ते ठेवलेले असेल. तुम्हाला त्याचे घर, माहिती आहे का?"

होम्स बोलला, "मी त्याच्या अभ्यासिकेत गेलेलो आहे."

"गेलेले आहात? मग जर तुम्ही, कामगिरीला आजच सुरवात केली असेल, तर तुम्ही, फारच जलद आहात. किंवा यावेळेस प्रिय अडेलबर्टला, तोडीस तोड कुणीतरी, मिळालेला दिसतो आहे. बाहेरची अभ्यासिका चिनी काचसामानाचे कपाट असलेली आहे. दोन खिडक्यांमधील जागेत, ते काचेचे कपाट आहे. अडेलबर्टच्या टेबलाच्या मागून वाट आतल्या अभ्यासिकेकडे जाते. तो कागद व इतर वस्तू ठेवतो, अशी ती लहान खोली आहे."

"त्याला चोरांचे भय वाटत नाही का?"

"अडेलबर्ट काही भित्रा नाही. त्याचा पक्का शत्रूदेखील त्याला भित्रा म्हणणार नाही. तो स्वतःची काळजी घेऊ शकतो. रात्री चोर आल्यास त्यासाठी एक चोर गजर आहे. शिवाय चोरांसाठी तिथे आहेच काय – काचेचे छान सामान थोडेच ते घेऊन जातील?"

शिनवेल जॉन्सन एखाद्या तज्ञाच्या आवाजात ठरवून म्हणाला, "असे चांगले नाही. अशा प्रकारच्या वस्तूना, ज्या विकता येत नाहीत किंवा वितळवताही येत नाहीत, त्याना कुंपण घालायची जरुरी नसते."

होम्स म्हणाला, "खरे आहे. बरे. आता मिस विन्टर, जर तू उद्या पाच वाजता इथे आलीस तर, मी मधल्या काळात विचार करीन, की तुझ्या सुचवण्याप्रमाणे, या

बाईला व्यक्तिशः भेटायचे जमवता येईल का. मी तुझ्या सहकार्याबद्दल, फार ऋणी आहे. मी असे म्हणायची जरुरी नाही, की माझ्या मदतनीसांना मी उदारपणे -- "

ती तरुण बाई ओरडली, "मिस्टर होम्स, तसे काही नाही. मी पैशासाठी हे करत नाही. मला या माणसाला, डुबलेले पहायचे आहे. त्याच्या चिखलातील शापित चेहऱ्यावर, मी लाथ मारताना, मला बघायचे आहे. त्यासाठी, माझा हा अट्टाहास आहे. ती माझी किंमत आहे. जोपर्यंत तुम्ही त्याच्या मागावर आहात, तोपर्यंत, मी उद्या किंवा कधीही तुमच्या बरोबर असेन. मला कुठून शोधून काढायचे ते, हा जाड्या तुम्हाला नेहमी सांगेल."

नंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत, मी होम्सला भेटलो नाही. तेव्हा आम्ही आमच्या नेहमीच्या स्ट्रँड हॉटेलमध्ये जेवण घेतले. त्याच्या भेटीमधून काय नशीब आजमावता आले, असे मी त्याला विचारल्यावर त्याने खांदे उडवले. मग त्याने सगळी गोष्ट सांगितली. ती मी त्याच्याच शब्दात सांगतो. त्याची कठोर व कोरडी विधाने मात्र, मी थोडी सौम्य करून, नेहमीच्या खऱ्या आयुष्यातील अशी सांगेन.

होम्स म्हणाला, "तिच्या भेटीबद्दल ठरवण्यात काही अडचण आली नाही. जनरलने फोन करून सांगितले की त्याने त्या मूर्ख मुलीला, भेटीसाठी तयार केले आहे. अनैतिक किंवा वागणुकीचे नियम तोडून केलेल्या, साखरपुड्याबद्दल, ती मुलगी अपेक्षित अशी चांगली प्रतिक्रिया दर्शवत होती. सूडाने पेटलेली मिस विंटर, ठरल्याप्रमाणे आली. त्यामुळे साडेपाचला एका टॅक्सीने आम्हाला, तो म्हातारा जनरल रहात होता तिथे, म्हणजे, १०४, बर्कले चौक, या लंडनमधील एका सर्वसाधारण दिसणाऱ्या घराशी, सोडले. तेथील शिपायाने आम्हाला पिवळे पडदे

असलेल्या हॉलचा रस्ता दाखवला. तिथे ती तरुण बाई थांबली होती. नम्र, अबोल, लाजरी, तिच्या निश्चयावर कायम असलेली अशी व पर्वतावरील बर्फाच्या प्रतिमेसारखी एकाकी.

"वॉटसन, मला कळत नाही, की ती कशी दिसत होती, ते तुला कसे सांगावे. कदाचित आपले सर्व काही पार पडायच्या आत, ती तुला भेटेल व मग तू तुझ्या शब्दात, तिचे चित्र उभे करू शकशील. ती सुंदर आहे पण या जगातील न भासणारी, काहीतरी गारुड घालणारी, अशी ती वाटते. मध्ययुगीन काळातील निष्णात चित्रकारांच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रातील चेहरे मी पाहिले आहेत. मी कल्पनाही करू शकत नाही अशा सौदर्यवतीवर, असा पशुतुल्य नराधम, कसे काय त्याचे पंजे टाकू शकतो? ते दोघे किती विरोधाभासात्मक आहेत, असाच विचार तुझ्यादेखील डोक्यात आला असता. दैवी प्रकारची वधू व पशुतुल्य वर, आदिमानव व परी! यापेक्षा विपरीत जोडी तू कधीच पाहिली नसशील."

"आम्ही तिथे का आलो आहोत, ते तिला माहिती होते. अर्थात त्या खलनायकानी, आधीच आमच्याविरुद्ध तिचे मन विषारी करायला, सुरवात केली होती. माझा अंदाज आहे की, मिस विंटरच्या तिथे येण्यामुळे तिला नवल वाटले. तिने आम्हाला सुरवातीला, ती चर्चमधील पाद्री व आम्ही जणू महारोगी व भिकारी असल्यासारखी, दूरस्थ वागणूक दिली व खुर्च्यांवर स्थानापन्न होण्यास सांगितले. वॉटसन, तुला जर तुझे डोके फिरवून घ्यायचे असेल तर, व्हॉयोलेट डी मरव्हील हिचे उपचार, तू सुरु कर."

हिमनगातील वाऱ्यासारख्या आवाजात, तिने बोलायला सुरवात केली, "नमस्ते सर, तुमचे नाव मी ऐकलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे, तुम्हाला माझा प्रियकर, बॅरॉन ग्रुनर याच्याबद्दल मला नको ते सांगून, त्याच्यापासून मला तोडण्यासाठी, बोलावले आहे. केवळ माझ्या वडीलांनी विनंती केली, म्हणून मी तुम्हाला भेटते आहे. आणि मी तुम्हाला आधीच सांगते की तुम्ही जे सांगाल, त्याचा माझ्यावर काडीइतकाही परिणाम होणार नाही."

"वॉटसन, मला तिच्यासाठी वाईट वाटले. ती माझी स्वतःची मुलगी असावी, असे मला क्षणभर वाटले. मी नेहमी इतका भावनाशील व आग्रही नसतो. मी माझी डोके वापरतो, हृदय नव्हे. माझ्या स्वभावातील जी काही मृदुता आहे, ती सर्व वापरून, मी तिला भावनामय आव्हान केले. एखाद्या माणसाशी लग्न करून त्याची बायको झाल्यावर, तिला त्या माणसाच्या चारीत्र्याबद्दल जाग येते, तेव्हा तिची कशी वाईट अवस्था होते त्याचे चित्र मी तिच्यासमोर उभे केले. रक्तरंजित हातांनी व अनावर लालसेने केलेला स्पर्श तिला सहन करावा लागेल. लाज, भीती, टोकाचे शारीरिक व मानसिक कष्ट आणि विफलतेशिवाय काहीही तिच्या पदरात पडणार नाही, हे मी तिच्या कानीकपाळी ओरडून सांगितले. त्या सुंदर गालांवर माझ्या तप्त शब्दांचा परिणाम होऊन, एकही रंगाची रेषा उमटली नाही की भकास डोळ्यात, एकही भावनेची छटा दिसली नाही. तो हलकट, संमोहित अवस्थेनंतरच्या परिणामाबद्दल काय म्हणाला होता, ते मला आठवले. ती वास्तवापासून दूर, हस्तिदंती मनोऱ्यात, अति उच्च अशा सुखस्वप्नात दंग होऊन रहात होती. तरीही तिच्या उत्तरात, काहीच नेमकेपणा नव्हता."

“मिस्टर होम्स, मी अत्यंत सहनशीलतेने तुमचे सर्व ऐकून घेतले आहे. माझ्या मनावर त्याचा परिणाम तुम्ही अपेक्षा केल्याप्रमाणे, तंतोतंत झाला आहे. मी जाणते की, अडेलबर्ट, म्हणजे माझा प्रियकर, याचे आयुष्य वादळी होते. त्यात त्याने कडू, द्वेषपूर्ण व अतिशय अन्यायी अशी, दुष्कीर्ती सहन केली आहे. माझ्यासमोर त्याची खोटी निंदानालस्ती करणाऱ्यांच्या या ओळीत, तुम्ही एकदम शेवटचे आहात. तुमचे म्हणणे कदाचित खरे असेल, पण शेवटी तुम्ही पैशासाठी काम करणारे दलाल आहात. तुम्ही बॅरॉनच्या बाजूने किंवा विरुध्ध, कशाही प्रकारे काम करू शकता. पण कुठल्याही परिस्थितीत मी तुम्हाला एकदाच आणि शेवटचे सांगते, की माझे त्याच्यावर व त्याचे माझ्यावर प्रेम आहे. सगळ्या जगाचे मत माझ्यासाठी, खिडकीबाहेर आवाज करणाऱ्या पाखरांपेक्षा अधिक किंमतीचे, मी समजत नाही. जर त्याचा उमदा स्वभाव क्षणभरासाठी पडला असेल, तरी मी तो उचलून वर घेईन. तेच तर माझे काम आहे.”

“मला हे समजले नाही –" इथे तिने माझ्याबरोबर आलेल्या बाईवर नजर फिरवली. “-- ही तरुण बाई कोण असू शकेल?”

मी हे सांगणारच होतो, तेवढयात ती मुलगी वादळासारखी बडबडली. “वॉटसन, जर तू कधी ज्योत व बर्फ एकत्र पाहिले असशील, तर ते त्या दोन बायकांसारखे होते.”

तिच्या खुर्चीतून उडी मारून मिस विंटर ओरडली, ”मी तुला सांगते, मी कोण आहे ते. भावनातिरेकाने तिचे तोंड वाकडे झाले. -- मी त्याची आधीची बायको आहे. त्याने शेकडो स्त्रियांना भुलवले, वापरले आणि चोळामोळा करून फेकून दिले. तसेच तो तुला पण करेल. पण तुला तो बहुधा स्मशानातच पोचवेल. -- आणि तेच

बरे आहे. अग मूर्ख स्त्रिये, मी तुला सांगते, जर तू या माणसाबरोबर लग्न केलेस तर, तो तुला ठार मारेल. तुझे हृदय बंद पाडेल, नाहीतर मान मोडेल. पण तो तुला या ना त्या मार्गाने, मिळवेलच. मी तुला सांगते, पण त्याचे हे कृत्य, तुझ्यावरील प्रेमाने केलेले आहे, असे समजू नकोस. मी जगले काय आणि मेले काय, पण मी त्या कावळ्याच्या शापाला, काही घाबरत नाही. त्याला जखमी करून त्याचा सूड घेणे, हे माझ्या त्याच्याबद्दलच्या द्वेषातून आलेले आहे. ते तसेच आहे. माझ्या सुंदर स्त्रिये, -- तू माझ्याकडे अशी बघू नकोस. कारण तुला कळण्यापूर्वीच, तो कदाचित तुला अजूनही खालच्या थराला नेईल."

मिस व्हॉयोलेट डी मरव्हील थंडपणे म्हणाली, "अशा गोष्टींवर, मला चर्चा करायची नाही. मी हे एकदाच सांगते आहे, की माझ्या प्रियकराच्या आयुष्यातील तीन प्रवाह, मला माहिती आहेत. ज्यात तो लबाड, नखरेल बायकांच्या संपर्कात आला आणि त्याच्या हातून जर काही काही पाप घडले असेलच, तर त्याला त्याचा मनापासून पश्चात्ताप झाल्याचे, मला पटलेले आहे."

माझ्याबरोबर आलेली बाई किंचाळली, "तीन प्रवाह? मूर्ख स्त्रिये, अत्यंत मूर्ख स्त्रिये,"

"मिस्टर होम्स, तुम्ही कृपया ही भेट संपवा. मी तुम्हाला भेटून, माझ्या वडिलांची आज्ञा पाळली आहे. पण या व्यक्तीचे रानटी बोलणे ऐकून घेण्याची काही, माझ्यावर सक्ती नाही."

"शपथ घेऊन मिस विन्टर पुढे धावली. मी तिचे मनगट पकडले नसते तर तिने त्या वेड्या बाईचे केस धरून ओढले असते. मी तिला दाराकडे खेचले. सुदैवाने

काहीही तमाशा न होता, तिला परत मोटारीत कोंबण्यात मी यशस्वी ठरलो. तिचा रागाचा पारा फारच चढला होता. वॉटसन, शांतपणे विचार केल्यावर माझा मलाच राग आला. ज्या बाईला वाचवायचा प्रयत्न आम्ही करत होतो, ती वर्णन करण्यापलीकडे शांतपणे व निर्विकारपणे स्वतःमध्येच दंग होती. आता तुला आम्ही कुठपर्यंत येऊन पोचलो आहोत, ते कळले असेल. ही खेळी हरल्यामुळे, मला अजून काही वेगळा बेत आखावा लागणार, असे दिसत आहे. मी तुझ्या संपर्कात राहीन, वॉटसन, कारण असे दिसते आहे की तुलाही यात लक्ष घालावे लागणार आहे. तरीही अशी शक्यता आहे, की पुढची चाल त्यांच्याकडूनच होईल."

आणि तसेच झाले. चांगलाच दणका बसला. ती बाई कशालाच बधत नव्हती, यावर माझा विश्वास बसत नव्हता. मी फुटपाथवरील एका दगडावर उभा होतो, तेव्हा माझे लक्ष भिंतीवरील एका पाटीकडे गेले. मला वाटते तो दगड मी तुला दाखवायला पाहिजे होता. माझ्या हृदयात एक कळ उठली. चेरिंग क्रॉस स्थानक व ग्रँड हॉटेल यांच्या मध्ये, एक पाय असलेला वृत्तपत्र विक्रेता, त्याचे संध्याकाळचे वर्तमानपत्र फडकवत होता. शेवटच्या संभाषणानंतरच्या दोन दिवसाची तारीख, त्यावर होती. तिथे काळ्या रंगाने पिवळ्या रंगावर, भयानक बातमी छापलेली दिसत होती.

शेरलॉक होम्सवर खुनी हल्ला

काही क्षण मी दिग्मूढ होऊन, उभा राहिलो. मग मी गोंधळलेल्या अवस्थेत, ते वर्तमानपत्र हिसकावून घेतले. पैसे न दिल्याने तो विक्रेता, माझ्यावर धाऊन आला.

मला आठवते आहे त्याप्रमाणे, एका औषधविक्रेत्याच्या दुकानाच्या दारात उभे राहून, मी तो दूरगामी व भयानक परिणाम करणारा परिच्छेद वाचला. तो असा होताः

'आम्हाला खेदपूर्वक असे सांगावे लागते आहे, की आज सकाळी, सुप्रसिद्ध गुप्तहेर, मिस्टर शेरलॉक होम्स यांच्यावर खुनी हल्ला करून, त्याना असुरक्षित रित्या, आडवे पाडले गेले. नक्की काय झाले ते कळले नाही, पण रिजेन्ट रस्त्याच्या बाजूला, दुपारी बारा वाजता हा प्रकार घडला असावा. काठ्या घेतलेल्या दोन माणसांनी हल्ला करून, मिस्टर होम्सना डोक्यावर व अंगावर बडवून काढले. त्याना झालेल्या जखमा खूप गंभीर असल्याचे डॉक्टर म्हणाले. त्याना चेरिंग क्रॉस दवाखान्यात व नंतर त्यांच्या बेकर रस्त्यावरील निवासस्थानी नेण्यात आले. अशा बेकायदेशीर कृत्याद्वारे, त्यांच्यावर हल्ला करणारी माणसे, व्यवस्थित पोशाख केलेली होती. ती गर्दीतून निसटून, कॅफे रॉयलच्या आत शिरली व त्यामागे असलेल्या ग्लासहाऊस रस्त्याने बाहेर पडली. नक्कीच ते गुन्हेगारी टोळीतले असावेत. जखमी माणसाच्या हुशारीने, त्यांच्यावर खेद करायची पाळी आली.

मी ते वाचून संपवतो न संपवतो तोच, मी एका टांग्यात उडी मारली व बेकर रस्त्याला लागलो. प्रसिध्द सर्जन लेस्ली ओकशॉट फुटपाथच्या कडेला टांग्यात थांबलेले होते.

त्यांचा अहवाल होता, 'लगेच काही धोका नाही. दोन खोल जखमा व बऱ्यापैकी मुका मार. खूप टाके घालावे लागतील. गुंगीचे इंजेक्शन देणे, जरुरीचे होते. विश्रांती घ्यायला हवी, पण काही मिनिटांची मुलाखत द्यायला काही हरकत नाही.'

या परवानगीमुळे मी अंधाऱ्या खोलीत शिरलो. रुग्ण टक्क जागा होता. आणि मी हलक्या कुजबुजत्या आवाजात माझे नाव ऐकले. खिडकीचा पडदा बराच उघडलेला होता व सूर्याचे तिरपे किरण आत येऊन, बँडेज बांधलेल्या जखमी माणसाच्या डोक्यावर पडत होते. घट्ट पांढऱ्या कापडामधून, लालसर जांभळ्या रंगाचा तुकडा दिसत होता. मी त्याच्या जवळ बसून त्याच्यावर ओणावलो.

तो क्षीण आवाजात म्हणाला, "वॉटसन, इतका घाबरू नकोस. जेवढे दिसते आहे तेवढे वाईट काही मला लागलेले नाही."

"त्याबद्दल मी देवाचे आभार मानतो."

"तुला माहिती आहे, की मी थोडा लाठीहल्ला निष्णात आहे. मी बराचसा मार चुकवला, पण तो दुसरा मनुष्य, मला फार भारी पडत होता."

"होम्स, मी काय करू शकतो? अर्थात त्या नालायक मनुष्यानेच, मारेकरी घातले असणार. तू म्हणत असशील तर मी जाऊन, काठीने त्याना चोपून काढतो."

"अरे बाबा वॉटसन, नको. पोलिसांनी त्याना पकडल्याशिवाय, आपण त्याना काही करू शकत नाही. पण त्यांचे सूंबाल्या करून पसार होणे, नक्कीच, पक्के ठरवून केलेले दिसते. जरा थांब. मी काही बेत करतो आहे. पहिली गोष्ट म्हणजे मला फार लागले आहे असा बाऊ करायचा. ते तुझ्याकडे बातमीसाठी येतील. वॉटसन, तेव्हा ते जरा फुगवून सांग. डोक्याला मार लागून, मी बेशुध्द झालो आहे व तापात अस्वस्थ होऊन, मला भास होत आहेत, असे सांगून बघ. मला आठवडाभर काही न करता, विश्रांती मिळाली, तर मी नशीबवान ठरेन. पण अति करू नकोस."

"पण सर, लेस्ली ओकशॉट?"

“ओहो, तो ठीक आहे. त्याला माझ्या आजारपणाची, सर्वात वाईट बाजू दिसेल. मी ते बघून घेईन.”

“अजून काही?”

“हो. शिनवेल जॉन्सनला सांग, की त्या मुलीला कुठेतरी लपव. ते मारेकरी आता तिच्या मागे लागतील, कारण या केसमध्ये ती माझ्याबरोबर होती, हे त्याना माहिती आहे. माझ्यावर त्यांनी हल्ला केला, तर ते तिच्यावरही करू शकतात. हे तातडीचे काम आहे. ते आज रात्रीच कर.”

“आता मी जातो. अजून काही?”

“माझा पाईप व तंबाखू टेबलावर ठेव. हं अस्से! रोज सकाळी ये. मग आपण आपले बेत आखू.”

त्या संध्याकाळी मी जॉन्सनबरोबर ठरवले, की त्याने मिस विन्टरला गावाबाहेर, एखाद्या शांत ठिकाणी न्यावे आणि धोका संपेपर्यंत, ती स्वस्थ राहील, याकडे लक्ष द्यावे.

सहा दिवस लोकाना असे वाटत होते, की होम्स मरणोन्मुख आहे. वर्तमानपत्रे तसे सांगत होती व काही वाईट घडण्याचा अंदाज देत होती. माझ्या वारंवार होणाऱ्या खेपांमुळे, मला कळत होते, की होम्सची अवस्था, एवढी काही वाईट नव्हती. त्याची बारीक अंगकाठी व जबरदस्त इच्छाशक्ती, आश्चर्यकारक रित्या काम करत होती. तो झटपट सुधारत होता. कधीकधी मला संशय येत होता की, त्याने जास्त आजारी असल्याचे जे ढोंग घेतले होते, त्यामानाने तो फारच भराभर सुधारत होता. त्या माणसामध्ये जगावेगळे असे, काहीतरी होते, ज्यामुळे खूप नाटकी बदल

होत होते. त्यामुळे त्याच्या जवळच्या मित्रांनाही, त्याचे नक्की काय बेत आहेत, याबद्दल तर्क करत बसावे लागत होते. तो एकटाच करू शकेल, असा टोकाचा सुरक्षित व कोणालाही मान्य होईल असा बेत, त्याने ठरवला. इतर कोणाहीपेक्षा मी त्याच्या जास्त जवळ होतो, तरीही आमच्यातील अंतराबद्दल मी जागरूक होतो.

सातव्या दिवशी टाके काढले गेले. तरीही बॅक्टेरियामुळे संसर्ग होण्याची शक्यता, नाकारता येत नसल्याचे, संध्याकाळच्या अहवालात लिहिले होते. त्यातच पुढे असे जाहीर केले होते, की जे मला माझा मित्र आजारी असो की बरा असो, पण त्याला नेऊन द्यायचेच होते. ते असे होतेः शुक्रवारी लिव्हरपूलपासून सुटणाऱ्या रुरीटानिया, या बोटीवर बॅरॉन अडेलबर्ट चढणार होता. व्हॉयोलेट डी मरव्हील बरोबर होणाऱ्या त्याच्या लग्नापूर्वी, परदेशातील काही महत्वाचे आर्थिक काम निपटण्यासाठी, तो जाणार होता. होम्सने ती बातमी थंडपणे व बारीक लक्ष देऊन, फिकट चेहऱ्याने ऐकली. त्यावरून मला कळले, की ती त्याच्या जिव्हारी लागली आहे.

“शुक्रवारी?” तो ओरडला. “फक्त तीनच दिवस, आपल्याला मिळत आहेत. तो हलकट स्वतःला धोक्यापासून दूर ठेवत आहे. वॉटसन, पण तो ते करू शकणार नाही. देवाच्या आशिर्वादाने, आता तो ते करू शकणार नाही. तुला माझ्यासाठी काहीतरी करावे लागेल.”

“होम्स, तू मला फक्त सांग.”

“मग पुढचे चोवीस तास अथकपणे, चिनीमातीची भांडी बनवण्याच्या कामात लक्ष घाल.”

त्याने काही स्पष्टीकरण दिले नाही, आणि मीही मागितले नाही. खूप अनुभवावरून, मी आज्ञाधारकपणातील शहाणपण, शिकलो होतो. पण जेव्हा मी त्याच्या खोलीतून बाहेर पडून बेकर रस्त्याला लागलो, तेव्हा माझ्या डोक्यात असे चक्र सुरु झाले, की मला असे विचित्र काम करण्यास, का बरे सांगितले असेल? शेवटी मी लंडनमधील सेंट जेम्स चौकातील वाचनालयात, पोचलो. लोमॅक्स नावाच्या वाचनालय अधिकारी असलेल्या माझ्या मित्राला, सर्व काही सांगितले. तेव्हा त्याने मला, एक जाडजूड पुस्तक दिले. ते काखोटीला मारून, मी माझ्या खोलीवर पोचलो.

असे म्हणतात, की एखादा वकील रविवारच्या सुट्टीत, केसचा इतका सांगोपांग अभ्यास करतो, की तो निष्णात साक्षीदाराची, सोमवारी चांगली उलटतपासणी करतो. पण परत येणाऱ्या शनिवारी, त्याचे बळेबळे मिळवलेले ज्ञान विसरून जातो. चिनीमातीची भांडी बनवण्याच्या बाबतीत, स्वतःला अधिकारी व्यक्ती बनवण्याच्या, मी मागे लागलो. फक्त थोडी विश्रांती घेऊन, पूर्ण संध्याकाळ व रात्रभर मी त्या बाबतीतले, ज्ञानामृत पित होतो. नावे लक्षात ठेवत होतो. त्यातील थोर कलाकार, नकासगीर यांची नावे, वर्तुळाकार तारखांचे गूढ, हंग-वू ची प्रतिके, युंग-लू ची सौदर्यस्थळे, टॅंग-र्यिंग चे लिखाण, संग व युआन याच्या प्राचीन काळातील अजब कामे, हे सर्व शिकत होतो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी, मी होम्सला फोन केला, तेव्हा मी ही सर्व माहिती, कोळून प्यायलो होतो. जरी तुम्ही सार्वजनिक अहवालातून तसा अंदाज केला नसेल, तरी तो आता अंथरुणातून उठत होता. त्याचे बँडेजमध्ये गुंडाळलेले डोके हातावर टेकवून, त्याच्या आवडत्या आरामखुर्चीत बसला होता.

मी म्हणालो, “का रे होम्स, जर वर्तमानपत्रावर कोणी विश्वास ठेवला, तर तू मरायला टेकलेला आहेस, असेच वाटेल.”

तो बोलला, “तेच माझ्या बाबतीत प्रसृत व्हायला, मला हवे आहे. आणि आता वॉटसन, तू तुला सांगितलेली कामगिरी, केलीस का?”

“मी निदान, तसा प्रयत्न केला.”

“छान. या विषयावर तू हुशारीने बोलू शकशील?”

“मला वाटते, हो.”

“तर मग मला, शेकोटीच्या बाजूचे भांडे दे.”

मी तसे केल्यावर, त्याने झाकण उघडले व आणि एक लहानशी, मोठ्या निगुतीने, उंची रेशमी कपड्यात गुंडाळलेली वस्तू बाहेर काढली. ती उलगडून, त्यातून एक छोटीशी, सुंदर, गडद निळ्या रंगाची बशी बाहेर काढली.

“वॉटसन, ही काळजीपूर्वक हाताळावी लागते. ही मिंगच्या काळातील अंड्याच्या कवचापासून बनवलेली वस्तू आहे. याहून सुबक नग कुठेही मिळणार नाही. असा पूर्ण संच राजाच्या राजवाड्यात शोभून दिसेल. -- खरे तर, पेकींगच्या राजेशाही राजवाड्यातदेखील, असा पूर्ण संच आहे का, हे माहिती नाही. ख़ऱ्या जाणकाराला तो संच, आश्चर्यचकित करून सोडेल.”

“माझा, त्याच्याशी काय संबंध आहे?”

होम्सने मला एक कार्ड दिले. त्यावर छापले होतेः

डॉ हिल बार्टन, ३६९ अर्धचंद्र रस्ता.”

"वॉटसन, हे तुझे आज संध्याकाळचे नाव आहे. तू बॅरॉन ग्रुनरला फोन करणार आहेस. मला त्याच्या काही सवयी माहिती आहेत. साडेआठ वाजता तो बहुधा रिकामा असेल. तू त्याला फोन करणार आहेस, अशी चिठ्ठी त्याला आधीच मिळालेली असेल. उत्कृष्ट असा मिंगचा चिनी मातीच्या बशांचा संच तू आणणार आहेस, असे तू त्याला सांग. तू दुहेरी भूमिकेत डॉक्टर पण असणार आहेस व चिनी मातीच्या वस्तुंचा जाणकार विक्रेताही. तू असल्या वस्तूंचा संग्राहक आहेस व हा संच तुला असाच एके ठिकाणी आढळून आला, असे तू सांग. या विषयात ग्रुनरला रस असल्याचे माहिती असल्याने, चांगली किंमत आल्यास, तुला तो विकायचा आहे.."

"काय किंमतीला?"

"वॉटसन, चांगला प्रश्न विचारलास. तुझ्या वस्तूंची किंमत तुला माहिती नसेल तर, खात्रीने तू मार खाशील. त्याच्या अशीलाच्या संग्रहातून, सर जेम्सने मला ही बशी दिली. ह्यासारखी वस्तू अख्या दुनियेत कुठेच मिळणार नाही."

"त्या संचाची किंमत, एखाद्या जाणकाराकडून ठरवून घ्यावी, असे मी सुचविन."

"उत्तम वॉटसन, तू आज अगदी चमकतो आहेस. ख्रिस्टी किंवा सोथबाय चालेल. तू स्वतःच किंमत न ठरवण्यात, तुझे चातुर्य दिसून येत आहे."

"पण तो मला भेटलाच नाही, तर?"

"खरंच की. पण तो तुला भेटेल. विशेषतः ज्यात तो उत्तम जाणकार आहे, अशा या विषयातील वस्तूंच्या संग्रहाचे त्याला प्रचंड वेड आहे. वॉटसन, खाली बस.

मी तुला एक पत्र लिहायला सांगतो. त्याच्या उत्तराची जरुरी नाही. तू फक्त येतो आहेस व कशासाठी येतो आहेस, एवढेच सांग."

ते वाखाणणी करण्यासारखे, लहानसे, नम्र व जाणकाराची उत्कंठा वाढवेल असे पत्र होते. एका व्यवस्थापकाला ते घेऊन पाठवण्यात आले. त्याच संध्याकाळी खिशात डॉ हिल बार्टनचे कार्ड व हातात ती मौल्यवान बशी घेऊन, मी माझ्या साहसासाठी निघालो.

सुंदर घर व परिसर बघून, डॉ हिल बार्टनने म्हटल्याप्रमाणे, बॅरॉन ग्रुनर चांगलाच श्रीमंत मनुष्य असल्याचे दिसत होते. गाडी आत आणायच्या वळणावळणाच्या, लांब मार्गाने, कडेने लावलेल्या शोभिवंत फुलांच्या ताटव्यातून, छान दगडांच्या आकर्षक पुतळे बसवलेल्या चौकोनातून आम्ही आत आलो. दक्षिण आफ्रिकेतील एका सोन्याच्या खाणी असलेल्या राजाने, त्याच्या चलतीच्या काळात, हे बांधले होते. मोठे बुटकेसे, चारी कडेला लहानसे मनोरे असलेले, वास्तुशास्त्रातील स्वप्न वाटेल असे, ते घर त्याच्या आकाराचा व भक्कमपणाचा ठसा मनावर उमटवत होते. एका बाकाची शोभा वाढवणाऱ्या व बिशपसारखा भासणाऱ्या स्वयंपाक्याने, मला घरात नेले. एक व्यवस्थित पोशाख घातलेला दरवान, मला बॅरॉनकडे घेऊन गेला.

तो एका उघड्या, मोठ्या दोन खिडक्यांमधील शोकेससमोर, लहान, चॉकलेटी फुलदाणी हातात घेऊन उभा होता. त्या शोकेसमध्ये चिनी वस्तूचा संग्रह होता. मी आत शिरल्यावर तो वळला.

"या. बसा डॉक्टर. मी माझ्या खजिन्याकडे बघत होतो व मी खरंच त्यात भर घालू शकेन का, म्हणजे मला ते परवडेल का, असा विचार करत होतो. सातव्या शतकातील हा छोटा टँगच्या काळातील नमुन्यामध्ये बहुधा तुम्हाला, रस असेल. मला खात्री आहे की याहून उत्तम कारागिरी व चमक तुम्ही कधीच पाहिली नसेल. तुम्ही म्हटल्याप्रमाणे, तुमच्याकडे मिंगच्या काळातील बशी आहे का?"

मी काळजीपूर्वक ती वेष्टणातून बाहेर काढली. व त्याच्याकडे दिली. तो खाली बसला, दिवा लावला कारण आता अंधार पडू लागला होता. त्याने त्याचे परीक्षण करायला सुरवात केली. असे करताना, पिवळा प्रकाश त्याच्यावर पडला. व मला सहजतेने त्याचे जवळून निरीक्षण करता आले.

तो नक्कीच ठळकपणे, देखणा मनुष्य होता. युरोपिअन सुंदरतेची त्याची किर्ती, यथार्थ होती. त्याची चण मध्यम होती पण तो डौलदार व चपळ दिसत होता. त्याचा चेहरा काळसर व बाजूच्या थाटाला न शोभेल असा होता. मोठ्या गडद डोळ्यात, स्त्रियांना वश करू शकेल व विरोध करता येणार नाही असे काहीतरी, आकर्षण होते. त्याचे डोळे व मिशा काळ्या कुळकुळीत होत्या. मिशा लहान ,टोकदार व काळजीपूर्वक छाटलेल्या होत्या. त्याचे सरळ, पातळ ओठांचे तोंड सोडून बाकी सर्व नीटनीटके व आल्हाददायक होते. खुन्याचे तोंड कसे असते हे पहायचे असेल, तर ते त्याचे होते. दुष्ट, ओरखडे असलेले, दबलेले व यात जराही बदल न होणारे, असे भयानक होते. बाहेरच्या बाजूला वळलेल्या मिशा ठेवायचा सल्ला, त्याला कुणी दिला होता, कुणास ठाऊक! त्या जणु धोक्याचा इशारा देत होत्या. त्याचा आवाज मोहक होता. व हावभाव उत्तम होते. माझ्या मते त्याचे वय तीसपेक्षा थोडे जास्त असावे. पण त्याच्याबद्दलच्या माहितीत, ते बेचाळीस असल्याचे दिसून आले.

शेवटी तो म्हणाला, “फार सुंदर – खरंच फार छान! आणि तुम्ही म्हणता आहात, की तुमच्याकडे अशा सहाचा संच आहे. अशा भव्य दिव्य नमुन्यांबद्दल, मी ऐकायलाच नको होते. याच्याशी तुलना करता येईल असा एकच संच, मी इंग्लंडमध्ये पाहीला होता. बाजारात तर, असे काही मिळणारच नाही. डॉ हिल बार्टन, हे तुम्हाला कुठे मिळाले, असे मी तुम्हाला विचारले तर, ते फार आगाऊपणाचे वाटणार नाही ना?”

मला जेवढी बेफिकिरी दाखवता येईल तेवढी दाखवत, मी म्हणालो, “त्याचे काय मोठेसे? “तुम्ही बघता आहात, की ही वस्तू अगदी एकमेवाद्वितीय आहे. आणि किंमत म्हणाल तर, मी त्या बाबतीत तज्ञाचे मत घेऊ इच्छितो.”

त्याच्या गडद काळया डोळयांमध्ये, झटपट संशयाची छटा आणत तो म्हणाला, “अशा गोष्टींचा व्यवहार करताना, अर्थातच त्यातील सर्व खाचाखोचा माहिती असायला हव्यात. वस्तू अगदी एकमेवाद्वितीय आहे, हे नक्की. त्याबद्दल मला काही संशय नाही. पण समजा -- जर मी सगळया शक्यता लक्षात घेतल्या -- आणि नंतर असे लक्षात आले तर -- की तुम्हाला ती विकायचा अधिकार नाही, तर मग?”

“असा कुणाचा काही दावा नसल्याची, मी तुम्हाला खात्री देऊ शकतो.”

“त्याने असा प्रश्न निर्माण होईल, की तुमच्या खात्री देण्याची किंमत काय?”

“माझे बँकर, याचे उत्तर देतील.”

“तसेच होवो. आणि तरीही हा सर्व व्यवहार मला, थोडा वेगळाच वाटतो.”

मी बेफिकीरीने म्हणालो, “तुम्ही व्यवहार करा किंवा करू नका. तुम्ही त्याबाबतीत पक्के पारखी असल्याने, मी तुमच्याकडे ती वस्तू प्रथम पेश केली. मी तुम्हाला ती वस्तु, हत्यांवर पण देऊ शकतो.“

“मी अशा वस्तूंच्या बाबतीत जाणकार असल्याचे, तुम्हाला कोणी सांगितले?”

“मला माहिती आहे, की तुम्ही या विषयावर पुस्तक लिहिले आहे.”

“तुम्ही ते वाचले आहे का?”

“नाही.”

“असे बघा, हे मला समजायला, जास्त जास्त कठीण होत चालले आहे. तुम्ही जाणकार आहात. फार किमती वस्तू तुमच्याकडे जमा आहेत. आणि तरीही तुम्ही त्याची खरा अर्थ व किंमत जाणून घेण्यासाठी, पुस्तक वाचायची तसदी घेतली नाहीत. ह्याचे काय स्पष्टीकरण तुम्ही द्याल?”

“मी पेशाने डॉक्टर असून, फार व्यग्र असतो.”

“हे काही उत्तर नव्हे. जर माणसाला छंद असेल, तर तो त्याची इतर काही कामे असली तरी, त्याचा पाठपुरावा करतोच. तुम्ही तुमच्या चिठ्ठीत असे म्हटले होते, की तुम्ही त्या बाबतीत निष्णात आहात.”

“मी आहेच.”

“मी तुम्हाला आजमावण्यासाठी काही प्रश्न विचारू शकतो का? डॉक्टर, तुम्ही खरोखर डॉक्टर असाल तर, हे जास्तच संशयास्पद होते आहे. तुम्हाला सम्राट

शोमुबद्दल काय माहिती आहे आणि तुम्ही नारामधील शोसोशी त्याचा संबंध कसा जोडाल? प्रिय डॉक्टर, हे तुम्हाला गोंधळात टाकते आहे का? नॉनहर्न वेई घराण्याबद्दल आणि चिनी मातीच्या भांड्यांच्या इतिहासातील, त्यांच्या स्थानाबद्दल तुम्ही काय सांगू शकता?"

मी माझ्या खुर्चीवरून रागारागाने उडी मारून उठलो.

मी म्हणालो, 'हे असहनीय आहे, सर. मी इथे तुम्हाला एवढी चांगली वस्तू, प्रथम दाखवायला म्हणून आलो, आणि तुम्ही, मी शाळकरी मुलगा असल्यासारखी, माझी परीक्षा घ्यायला बघता आहात. माझे ज्ञान कदाचित तुमच्यापेक्षा कमी असेल, पण इतक्या उद्धटपणे विचारल्या गेलेल्या प्रश्नांची उत्तरे, मी नक्कीच देणार नाही."

त्याने माझ्याकडे रोखून बघितले. त्याच्या डोळ्यातील आल्हाददायक भाव जाऊन, ते अचानक चमकू लागले. त्या दुष्ट ओठांमधून दातही चमकू लागले.

"हे काय नाटक आहे? तू इथे हेर म्हणून, आला आहेस. तू होम्सकडून, विशेष कामगिरीवर आला आहेस. माझ्याबरोबर, खेळी खेळतो आहेस. तो तिकडे मरायला टेकल्याचे, मी ऐकतो आहे आणि म्हणून माझ्यावर नजर ठेवण्यासाठी, त्याने तुला पाठवले आहे. तू इथे आतमध्ये, सहज प्रवेश मिळवला आहेस, पण आता तुला बाहेर पडणे, मुश्कील होणार आहे."

त्याने पाउल पुढे टाकले आणि मी मागे झालो. माझ्यावर होणाऱ्या हल्ल्यासाठी तयार झालो, कारण शेजारी तो मनुष्य रागाने धुमसत होता. त्याला पहिल्यापासूनच, माझा संशय आला असावा. या उलटतपासणीमुळे त्याला खरे काय ते, कळून चुकले. पण एक गोष्ट स्पष्ट होती, की मी त्याला फसवायची, आशा करत

नव्हतो. त्याने एका खणात हात घालून, रागारागाने काहीतरी शोधले. त्याच्या कानावर काही पडल्याने, तो लक्ष देऊन ऐकत असताना, तो ओरडला, "ओय ओय" व त्याच्या मागील खोलीत घुसला.

मी दाराच्या दिशेने दोन पाऊले गेलो. आतील दृष्य माझ्या मनावर कायमचे कोरलेले राहील. बागेत उघडणारी खिडकी सताड उघडी होती. त्याच्या बाजूला रक्ताळलेले डोके कापडाने बांधलेला, भयंकर अशा भुतासारखा दिसणारा, चेहरा उतरलेला शेरलॉक होम्स, उभा होता. नंतर पुढच्याच क्षणी फटीतून मी काळपट हिरव्या पानांच्या झुडुपांमध्ये, त्याच्या शरीराचा आपटल्याचा आवाज ऐकला. रागाने ओरडत घराचा मालक त्या उघड्या खिडकीतून त्याच्या मागे धावला.

आणि मग! एका क्षणार्धात, आणि तरीही मी ते स्पष्टपणे पाहिले. एक हात -- बाईचा हात -- पानांमधून बाहेर आला. त्याच वेळी बॅरॉनच्या तोंडून एक भयानक किंकाळी बाहेर पडली. -- अशी जोरात मारलेली किंकाळी, की जी माझ्या सदैव आठवणीत राहील. त्याने त्याचे दोन्ही हात तोंडावर मारून घेतले व उलटा फिरून, त्याच्या खोलीत गेला. भिंतीवर जोरजोरात डोके आपटू लागला. मग तो गालिच्यावर पडून गडाबडा लोळू लागला. त्याच्या किंकाळ्यांनी सारे घर दुमदुमून गेले.

तो ओरडला, "पाणी! अरे देवा, पाणी!"

मी शेजारील टेबलावरून, एक ग्लास घेऊन त्याच्या मदतीला धावलो. त्याच वेळी, स्वयंपाकी व इतर अनेक नोकर माणसे, तिथे धावली. मी त्या जखमी माणसाच्या जवळ गुडघ्यावर बसून, त्याचा चेहरा प्रकाशाकडे वळवला, तेव्हा तो बघून एकजण चक्कर येऊन कोसळला. दुष्ट ॲसिड, त्याचा चेहरा सगळीकडून खात

होते. ह्नुवटी वरुन व कानामधून ते गळू लागले. एक डोळा आधीच पांढरा होऊन चमकत होता. व दुसरा लाल होऊन त्याची जळजळ होत होती. ज्या चेह़ऱ्याची मी काही मिनिटांपूर्वी स्तुती करत होतो, त्या सुंदर चेहे़ऱ्यावर आता जणु, एखाद्या कलाकाराने ओला, घाणेरडा बोळा फिरवला व तो रंगहीन, अमानुष व भयानक करून टाकला. थोडक्या शब्दात मी त्या ॲसिड हल्ल्याचे वर्णन केले. काहीजण खिडकीतून वर चढले, बाकीचे बाहेर हिरवळीवर पळत गेले. पण अंधार होता व पाउस पडू लागला होता. त्याच्या किंकाळयांमधून बॅरॉन ग्रुनर, हल्ला करणाऱ़ीला रागाने शिव्या देत होता. "ती -- ती हलकट मांजर होती. कीटी विंटर! ती राक्षसीण! तिला, हे भरून द्यावे लागेल. ती भरून देईल. अरे देवा. ह्या कळा, मी सहन करू शकत नाही." तो ओरडला.

मी त्याच्या चेह़ऱ्याला तेल लाऊन, खडबडीत भागावर, कापूस व मऊ कापड ठेवले. भाजलेल्या, दाह होणाऱ़्या कातडीसाठी उपचार म्हणून त्याला वेदनाशामक इंजेक्शन दिले. या धक्क्यामुळे, माझ्याबद्दलचा त्याचा सर्व संशय दूर झाला. भकास डोळे, जणू मी परत होते तसे सगळे करेन, अशा विश्वासाने माझ्याकडे बघत होते. त्याने माझे हात धरून ठेवले. इतका घाणेरडा व कुरूप बदल बघून मी, दुःख करू शकलो असतो. पण त्याचे अतिशय वाईट आयुष्य ठळकपणे आठवून, मी तसे करू शकलो नाही. त्याचे जळके हात व चेहरा, माझ्यात किळस व द्वेष पैदा करत होता. त्याच्या कुटुंबाचा सर्जन व पाठोपाठ एक विशेष डॉक्टर आल्यावर मी सुटकेचा निःश्वास टाकला. एक पोलीस इन्स्पेक्टर पण आला. त्याला मी माझे खरे कार्ड दिले. असे न करणे, हे निरुपयोगी व मूर्खपणाचे होते, कारण स्कॉटलंड यार्ड मला होम्सइतकेच ओळखत होते. नंतर मी ते भीतीदायक व अंधारी घर सोडले.

होम्स त्याच्या नेहमीच्या खुर्चीत बसला होता. तो अशक्त व दमलेला वाटत होता. त्याच्या जखमांव्यतिरिक्त, त्याच्या पोलादी धैर्यालादेखील, त्या संध्याकाळच्या घटनेने धक्का बसला होता. त्याने भीतीदायकपणे मी सांगत असलेले, बॅरॉनमधील बदलाचे नाट्य ऐकून घेतले.

टेबलावरून चॉकलेटी पुस्तक उचलत तो म्हणाला, "पापाची किंमत बरं वॉटसन, ही पापाची किंमत आहे. लवकर किंवा उशिरा, पाप फेडावेच लागते. पापाचा घडा पूर्ण भरला की देवाला कळते. ती बाई म्हणत होती, ते हे पुस्तक आहे. जर ह्याने लग्न मोडले नाही, तर इतर कशानेच मोडणार नाही. वॉटसन, पण ते मोडेलच. शंभर टक्के. कोणत्याही स्वाभिमानी बाईला, ते सहन होणार नाही."

"ही त्याची प्रेमाची डायरी आहे का?"

"किंवा त्याच्या वासनेची डायरी. काहीही म्हणा. ज्या क्षणी त्या बाईने याबद्दल सांगितले, तेव्हाच मला कळून चुकले, की हे आपल्या हातात आल्यास, भक्कम शस्त्र होऊ शकेल. माझे विचार तिला कळतील व ती बाई कदाचित, सगळयाना सांगत सुटेल म्हणून, मी तेव्हा काही बोललो नाही. पण, त्याच्या मागे लागलो. मग माझ्यावरील हल्ल्यानंतर, बॅरॉनला मी असे वाटू दिले, की आता, माझ्यापासून काही काळजी घ्यायची जरुरी नाही. हे सर्व चांगल्यासाठीच झाले. मी अजून थोडे, थांबायला हवे होते. पण त्याच्या अमेरिका भेटीच्या वृत्ताने, मला ते लगेच करावे लागले. इतके महत्वाचे पुस्तक, त्याने असे सोडून दिले नसते. म्हणून मला, लगेच कृती करावी लागली. रात्री चोरी करणे अशक्य होते. तो काळजी घेतो. पण त्याचे लक्ष दुसरीकडे वळवून, संध्याकाळी संधी होती. इथे तुझे व निळया बशीचे काम होते. पण

पुस्तक कुठे असणार आहे, याबद्दल मला खात्री करावी लागली. कारण तुझ्या चिनी मातीच्या भांड्यांबद्दलच्या तात्पुरत्या ज्ञानामुळे, माझ्याकडे वेळ थोडा होता. मी शेवटच्या क्षणी, कीटी विंटरला बरोबर घेतले. तिने तिच्या वस्त्राखाली काळजीपूर्वक, कसले छोटे पाकीट लपवून आणले होते, याचा तर्क मी कसा करणार? मला वाटले मी सांगितले म्हणून फक्त, ती आली आहे. पण तिचा स्वतःचादेखील, काही बेत होता."

"त्याने मी तुझ्याकडून आलो असल्याचा, अंदाज बांधला."

"मला, अशी भीती वाटत होतीच. पण मला पुस्तक सापडण्याच्या क्षणापर्यंत, तू त्याला गुंगवून ठेवलेस. तरीही कोणी न बघता सटकण्याइतका, जास्त वेळही नाही. ओहो, जेम्स, तुम्ही आल्यामुळे मला आनंद झाला आहे."

आमचा सुसंस्कृत मित्र, कोर्टातील चौकशीच्या आधी हजर झाला. कायकाय झाले, हे त्याने होम्सकडून अगदी पूर्ण लक्ष देऊन ऐकले. ऐकल्यावर तो आनंदाने ओरडला, "तू आश्चर्यकारक कामगिरी, केली आहेस. अगदी नवलपूर्ण! पण डॉ वॉटसन म्हणतो आहे, त्याप्रमाणे तुझ्या जखमा भयंकर असतील, तर मग आपला, लग्न होऊन न देण्याचा हेतू, या भयंकर पुस्तकाशिवाय सफल झाला आहे,"

होम्सने मान हलवली.

व्हॉयोलेट डी मरव्हीलसारखी बाई, कदाचित आपल्या अपेक्षेसारखे वागणार नाही. तो कुरूप केला गेलेला शहीद असल्याचे समजून, ती त्याच्यावर जास्त प्रेम करेल. नाही. नाही. ही त्याची नैतिक बाजू आहे, शारीरिक नव्हे. शारीरिक बाजू आपल्याकडून कुरूप केली गेली. ते पुस्तक आता तिला परत जमिनीवर आणेल. --

आणि मला माहिती आहे, की त्याव्यतिरिक्त काहीच नाही. ते त्याने स्वतः लिहिले आहे. ती ते डावलू शकणार नाही."

सर जेम्स, ती मूल्यवान बशी व ते पुस्तक दोन्ही घेऊन गेले. मी त्याना नेणे अपेक्षित असल्याप्रमाणे, मी त्याना रस्त्यापर्यंत घेऊन गेलो. एक टांगा, त्यांची वाट बघत थांबला होता. ते उडी मारून आत बसले व घाईघाईने टांगेवाल्याला सूचना दिली. टांगा हळूहळू लांब गेला. त्यानी सैन्यामधल्या शिष्टसंमत पद्धतीप्रमाणे, त्यांचा मोठा कोट खिडकीतून अर्धा बाहेर काढून फडफडवला. मी लहानशा शटरच्या उजेडातून, ते पाहिले. मी आश्चर्याने आ वासून, बघतच राहिलो. नंतर मी जिना चढून, होम्सच्या खोलीकडे गेलो.

माझ्याकडे असलेली मोठी बातमी फोडून मी ओरडलो, "आपला अशील कोण आहे ते मी शोधून काढले आहे, बर का होम्स तो -- "

होम्स कसाबसा हात वर करत म्हणाला, "तो विश्वासू मित्र व धीट सभ्य गृहस्थ आहे. आयुष्यभर आता ते तसेच राहूदे. गुन्हा दाखवणारे पुस्तक कसे वापरले गेले, मला माहिती नाही. सर जेम्सने, ते कदाचित घडवून आणले असेल. किंवा ते नाजूक काम, त्या तरुण स्त्रीच्या वडीलांनी केले असेल. शेवटी परिणाम, आपल्याला हवा तो झाला.

तीन दिवसांनी, वर्तमानपत्रात एक परिच्छेद छापून आला, की बॅरॉन अडेलबर्ट ग्रुनर व मिस व्हॉयोलेट डी मरव्हील यांचे लग्न होणार नाही. त्याच्याच खाली, मिस विन्टरने ग्रुनरवर कडक जहरी टीका करून, त्याच्या तोंडावर सल्फ्युरीक उडवल्याबद्दल झालेली, पोलीस कोर्टातील पहिली सुनावणी दिली होती. फारशी

गंभीर नसलेली व क्षम्य अशी ती केस असल्याचे आढळून आल्यामुळे, अशा गुन्ह्यासाठी असलेली कमीत कमी शिक्षा तिला देण्यात येईल असे ठरले. शेरलॉक होम्सला, बेकायदेशीरपणे इमारतीत प्रवेश केल्याबद्दल, धमकी देण्यात आली. पण जेव्हा उद्देश चांगला असतो व अशील पुरेसा प्रसिध्द असतो, तेव्हा कडक ब्रिटीश कायदा सुद्धा लवचिक व मानवतावादी बनतो. माझा मित्र अजून कोर्टातील पिंजऱ्यात उभा राहिलेला नाही.

बुरखाधारी भाडेकरू

शेरलॉक होम्स सतत तेवीस वर्षे, काम करत होता आणि त्यातील सतरा वर्षे, मी त्याच्या कामाची नोंद ठेवत होतो व त्याला मदतही, करत होतो. हे लक्षात घेतल्यावर, हे स्पष्ट होईल की माझ्याकडे, बरेच काही गोळा झाले होते. काम मिळवायचा प्रश्न नसे, तर ते निवडायचा, प्रश्न असे. कपाटांचे खण, वार्षिक पुस्तकांच्या गठ्ठ्यांनी व पाठवलेल्या पत्रांच्या कागदांनी, भरलेले होते. फक्त गुन्हेगार शास्त्रातील विद्यार्थ्यांसाठीच नव्हे तर, व्हिक्टोरियन युगातील, सामाजिक प्रकारच्या

प्रकरणांची व कोर्टात दाखल प्रकरणांची चौकशी करता येईल, असे ते ठिकाण होते. मी असे म्हणू शकतो, की यातील दुःख व वेदना मांडणाऱ्या पत्रांचे लेखक, जे आपल्या कुटुंबाचे किंवा त्यांच्या घराण्यातील प्रसिध्द व्यक्तींचे, नाव जाहीर करू नका, अशी विनंती करत, ती पाळली जाई. त्यांचा खासगीपणा जपणे, हा व्यवसायाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. त्याबद्दल माझा मित्र प्रसिध्द होता. अशीलांनी दिलेल्या माहितीचा दुरुपयोग केला जाणार नाही, याची खात्री त्याना असे. तरीही ही जमवलेली माहिती मिळवण्याचे व नष्ट करण्याचे जे प्रयत्न अलीकडे झाले, त्याचा मी जोरदार निषेध करतो. या रागाच्या प्रतिक्रियांचे मूळ, मला माहिती आहे. आणि जर ते परत झाले, तर मला मिस्टर होम्सकडून, असे सांगण्याचा अधिकार मिळालेला आहे, की या सगळ्यामागे असलेले, राजकीय नेते, त्यांची मंडळे व त्यांनी हाताशी धरलेले लोक, यांची नावे जाहीर केली जातील.

या प्रत्येक केसमध्ये होम्सला, त्याच्या चौकस जाणीवेची देणगी व निरीक्षणक्षमता दाखवण्याची संधी मिळाली असे समजणे, बरोबर नाही, हे या आठवणींतून, मी सांगायचा प्रयत्न केला आहे. काही वेळा त्याला, फार परिश्रम करून फळ पदरात पडते, तर कधी ते त्याला, आपोआप मिळते. पण भयंकर मानवी दुःखांतिका असलेल्या केसेसमध्ये, त्याला अगदी कमी वाव मिळाला, असेही घडले आहे. त्यातील एक केस, मला जतन करायची आहे. ती सांगताना, मी नावात व स्थळात थोडे बदल केले आहेत. पण बाकी सर्व, खरे घडलेले आहे.

१८९६ मधील एका सकाळी मला, होम्सने घाईघाईत खरडलेली, मला हजर रहाण्यास सांगणारी, एक चिठ्ठी मिळाली. मी तिथे पोचलो, तेव्हा त्याला धुरकट

जागी, एका वयस्क, जाड्या व आईसारख्या दिसणाऱ्या, घराच्या मालकिणीबरोबर, तिच्या समोरील खुर्चीवर बसलेले पाहिले.

माझा मित्र हाताने निर्देश करत मला म्हणाला, "या दक्षिण ब्रिक्स्टनच्या मिसेस मेरीलो आहेत. जर तुला तुझी वाईट सवय चालू ठेवायची असेल, तर यांचा धूम्रपानाला विरोध नाही. यांच्याकडे सांगण्यासाठी एक रुचीपूर्ण गोष्ट आहे. कदाचित, ही केस पुढे आपण हातात घेऊ व त्यामुळे, आत्ता तुझे इथे असणे, उपयोगी ठरेल."

"मी काहीही करायला, तयार आहे -- "

"तुम्हाला हे समजेल मिसेस मेरीलो, की जर मी मिसेस रॉन्डरकडे आलो तर, मी एक साक्षीदार माझ्याबरोबर असणे, पसंत करीन. आम्ही येण्यापूर्वी, तुम्ही त्याना तसे सांगून ठेवा."

आमची पाहुणी म्हणाली, "मिस्टर होम्स, देव तुमचे भले करो. ती तुम्हाला भेटायला उत्सुक आहे. तिला वाटते आहे की, तुम्ही तिला सर्वतोपरी, मदत करू शकाल."

"मग आम्ही दुपारी लवकर येऊ. आपली माहिती बरोबर असल्याची, आपण निघण्यापूर्वी खात्री करून घेऊ. जर आपण ती पुन्हा एकदा बघितली तर, डॉ वॉटसनला पण त्याचा, परिस्थिती समजून घ्यायला, उपयोग होईल. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे मिसेस रॉन्डर, तुमची गेली सात वर्षे भाडेकरू आहे. आणि तुम्ही फक्त एकदाच, तिचा चेहरा पाहिला आहे."

मिसेस मेरीलो म्हणाली, “देवाजवळ मी प्रार्थना करते, की मी तो परत बघायला नको.”

“मला माहिती आहे की तो भयानक रित्या, ठळकपणे, जखमी व खुनशी आहे.”

“मिस्टर होम्स, तुम्ही क्वचितच त्याला चेहरा म्हणाल, असा तो दिसतो. आमच्या दूधवाल्याने एकदा खिडकीवरुन डोकावून, त्याची झलक पाहिली आणि पुढील बागेत त्याच्या चरवीतले सर्व दूध सांडले. असा तो चेहरा आहे. जेव्हा मी एकदा तिच्या नकळत, तिला पाहिले, तेव्हा तिने लगबगीने तो झाकून घेतला व म्हणाली, “मिसेस मेरीलो, तुम्हाला आता शेवटी कळले असेल, की मी कधीच माझे अवगुंठन, का काढत नाही.”

“तुम्हाला तिचा काही इतिहास, माहिती आहे का?”

“काहीच नाही.”

‘ती इथे रहायला आली, तेव्हा तिने काही संदर्भ, दिले नाहीत का?”

“नाही सर, पण तिने खूप रोख पैसे दिले. तीन महिन्यांचे भाडे, तिने टेबलावर आधीच ठेवले. माझ्या अटींवर पण काहीही हरकत, घेतली नाही. या दिवसात माझ्यासारख्या गरीब बाईला असी संधी सोडणे, परवडणारे नव्हते.”

“तिने हे तुमचे घर निवडण्याचे, काही कारण सांगितले का?”

‘हे घर रस्त्यापासून बरेच आत आहे व इथे खासगीपणा जपता येतो. शिवाय मी फक्त एकच भाडेकरू ठेवते. आणि मला माझे कुटुंब नाही. मी असे समजते की तिने

इतर घरेही पाहिली, पण हे तिला सर्वात सोयीस्कर वाटले. खासगीपणा तिला हवा आहे व त्यासाठी ती पैसे मोजायला तयार आहे."

'तुम्ही म्हणता, की एकदा अचानकपणे घडलेला प्रसंग सोडला तर, तिने पहिल्यापासून शेवटपर्यंत, कधीच तिचा चेहरा दाखवला नाही म्हणजे ही, फारच वेगळी गोष्ट आहे. आणि म्हणूनच तुम्हाला, तिची परीक्षा करायची आहे."

"मिस्टर होम्स, मला जोपर्यंत भाडे मिळते, तोपर्यंत मी अत्यंत समाधानी आहे. तुम्हाला अशी शांत व कमी त्रास देणारी भाडेकरू मिळणे, कठीण आहे.'

"पण मग प्रकरण, या थराला का गेले?"

"तिची तब्येत. मिस्टर होम्स, ती खालावत चालली आहे. आणि तिच्या मनात काहीतरी भयंकर आहे. ती 'खून' 'खून' असे ओरडत असते. एकदा तिला मी 'अरे दुष्ट पशु' 'राक्षस' असे ओरडताना ऐकले. हे रात्री घडले व अगदी घरभर तो आवाज घुमला. त्यामुळे मी घाबरून, थरथरायला लागले. मग सकाळी मी तिच्याकडे गेले व बोलले, "मिसेस रॉन्डर, जर तुम्हाला काही त्रास होत असेल, तर चर्चमधील लोकाना तुम्ही बोलावू शकता. किंवा पोलीसही येऊ शकतात. त्यांच्याकडून तुम्हाला मदत मिळेल." ती म्हणाली, 'कृपा करून पोलीस नकोत. आणि जे पूर्वी घडले ते चर्चमधले लोक बदलू शकणार नाहीत. आणि तरीही, मी मरण्यापूर्वी, जर कोणी सत्य जाणून घेतले, तर माझे मन शांत होईल.' म्हणून मिस्टर होम्स, तिला तसे काहीच नको असल्याने, मी तुमच्यासारख्या गुप्तहेराला बोलावणे पाठवले. तिलाही हे पसंत पडले आहे. ती म्हणाली, 'मी ज्याच्याबद्दल कधीच विचार केला नव्हता, असा हाच तो मनुष्य. मिसेस मेरीलो, तुम्ही त्याना इथे आणा. आणि ते येत नसतील तर त्याना

सांगा, की मी जंगली जनावरांचा खेळ करणाऱ्या, रॉन्डरची बायको आहे व माझे नाव अब्बास परवा असल्याचे, सांगा. हे बघा, तिने इथे ते लिहिले आहे. ती पुढे म्हणाली, "मला वाटतो आहे, तोच तो माणूस असेल, तर तो इथे नक्की येईल."

होम्सने शेरा मारला, "आणि त्याप्रमाणे मी आलो आहे. फार छान, मिसेस मेरीलो. मला डॉ वॉटसनबरोबर थोडे बोलावे लागेल. तोपर्यंत जेवणाची वेळ होईल. साधारण तीन वाजता, ब्रिक्स्टनमधील तुमच्या घरी, तुम्ही आमची वाट बघा."

आमची पाहुणी अडखळत, सावकाश खोलीबाहेर गेल्यावर, लगेच मग शेरलॉक होम्स भयंकर ताकदीने, कोपऱ्यातील सार्वजनिक पुस्तकांच्या ढिगावर तुटून पडला. काही मिनिटे सतत पानांची खुसखुस झाली. नंतर समाधानाचा एक सुस्कारा टाकून, त्याने जे काही शोधले, ते घेऊन तो बाहेर आला. तो इतका उत्तेजित झाला होता, की विचित्रपणे, पाय एकमेकांवर काटकोनात ठेऊन, बसून राहिला. त्याच्या अवती भवती पुस्तके पडली होती व एक त्याच्या गुडघ्यांवर उघडे होते.

वॉटसन, मला या केसबद्दल पूर्वीही, काळजी वाटत होती. इथे माझ्या संक्षिप्त टिपण्या पडल्या आहेत. पण मी कबूल करतो, की मला यातून, काहीही अर्थबोध होत नाही. आणि तरी माझी खात्री आहे, की अचानक आलेले रक्तरंजित, संशयी मरण शोधून काढणारा, चुकला होता. तुला अब्बास परवाची दुःखांत गोष्ट आठवत नाही का?"

"नाही, होम्स."

“आणि तरी, तू तेव्हा माझ्याबरोबर होतास. पण नक्कीच माझे स्वतःचे मत, फार वरवरचे होते. कारण कुठल्याच पक्षाने, माझी मदत मागितली नव्हती. कदाचित तू कागद वाचायचे कष्ट घेशील?”

“तू मला, मुद्दे देऊ शकणार नाहीस का?”

“ते अगदी सहज करता येईल. मी बोलू लागलो, की तुला ते आठवेल. अर्थात, रॉन्डर हे घरगुती नाव आहे. तो वॉम्बवेलचा व सँगेरचा प्रतिस्पर्धी होता. आणि त्याच्या काळातील, सर्कसचे खेळ करणारा, महान व्यवस्थापक / मालक होता. तरीही असा पुरावा आहे, की तो दारू पिऊ लागला. आणि मग तो आणि त्याचा खेळ, दोन्हीचा दर्जा घसरू लागला. ती मोठी शोकांतिका झाली. त्याची गाडी बर्कशायरमधील एका छोट्या खेडेगावात, अब्बास परवा, येथे रात्री थांबली होती. ते विम्बल्ड्नच्या वाटेवर होते. ते रस्त्याने चालले होते. वाटेत फक्त मुक्काम करायचे, पण खेळ दाखवायचे नाहीत. कारण ती लहान गावे असल्याने, त्याना पुरेशी प्राप्ती झाली नसती.

त्यांच्या खेळात एक खूप छान, उत्तर आफ्रिकेतील सिंह होता. त्याचे नाव, सहारा राजा होते. रॉन्डर व त्याची बायको. दोघांची अशी सवय होती, की ते त्याच्या पिंज़्याच्या आतून खेळ करत असत. हा फोटो बघ. त्यावरून तुला कळेल, की रॉन्डर एखाद्या मोठ्या डुकरासारखा होता व बायकोही महाकाय होती. एका कोर्टमार्शलच्या वेळी असा आदेश निघाला, की तो सिंह धोकादायक असल्याने, पिंज़्याच्या आतून खेळ करू नये,. पण नेहमीप्रमाणे, ओळख असलेला सिंह काय करणार आहे, असे समजून तो, धाब्यावर बसवला गेला.

“रॉन्डर किंवा त्याची बायको नेहमीप्रमाणे, त्याला रात्री खायला द्यायला गेले. कधी ते दोघे जात. तर कधी एकेकटा जाई. पण ते काम, ते दुसऱ्या कुणाला सांगत नसत. त्यांचा असा विश्वास होता की जोपर्यंत ते खाणे घेऊन जात आहेत तोपर्यंत, सिंह त्याना, त्याचे भले करणारा समजेल आणि त्यांच्यावर कधीही हल्ला करणार नाही. सात वर्षांपूर्वी, त्या विशिष्ट रात्री, ते दोघे गेले आणि एक भयानक प्रकार घडला. तो नक्की काय होता, हे कधीच स्पष्ट झाले नाही.

मध्यरात्री सर्व परिसर त्या जनावराच्या गर्जनेने आणि बाईच्या किंकाळ्यांनी जागा झाला. वेगवेगळे रिंगमास्टर्स व नोकर त्यांच्या तंबूतून, कंदील घेऊन घाईघाईने बाहेर पडले. त्या उजेडात, त्याना भयानक दृष्य दिसले. उघड्या असलेल्या पिंजऱ्यापासून दहा यार्डावर पडलेल्या, रॉन्डरच्या डोक्याच्या मागील भागाचा, चेंदामेंदा झाला होता. त्याच्या डोक्याच्या कातडीवर, पंज्याच्या मोठ्या खुणा होत्या. पिंजऱ्याच्या दाराजवळ, मिसेस रॉन्डर पाठीवर उताणी पडली होती. तिच्यावर सिंह जबडा उघडून ओणावला होता. तिचा चेहरा असा काही फाडला गेला होता, की ती जिवंत राहील, असे वाटत नव्हते. सर्कस मधल्या बऱ्याच लोकांनी, दणकट लिओनार्डोच्या व विदुषक ग्रिग्जच्या नेतृत्वाखाली, काठ्या घेऊन त्या प्राण्याला पिंजऱ्यात परत बंदिस्त केले. तो सिंह मोकळा कसा सुटला, हे एक गूढच होते. असे अनुमान काढले गेले, की जेव्हा त्या जोडीने, सिंहाला खायला देण्यासाठी पिंजऱ्याचे दार उघडले, तेव्हा त्या प्राण्याने त्यांच्या अंगावर झेप घेतली. त्या प्रसंगात, बाकी काहीच पुरावा नव्हता. फक्त ती अत्यंत घाबरलेली बाई, किंचाळत राहिली. ‘भित्रा! भित्रा!’ असे बडबडत, ती ते ज्यात रहायचे त्या गाडीच्या दिशेने, मागेमागे

येऊ लागली. त्या घटनेची चौकशी सुरू झाली आणि त्या दुर्दैवी प्रसंगातील अटळ साक्षीदार, म्हणून तिला हिडीस, जखमी चेहरा घेऊन, कोर्टात जावे लागले.

“दुसरा काय पर्याय, उपलब्ध होता?” मी म्हणालो.

“तू असे म्हणू शकतोस. पण बर्कशायरच्या पोलीस अधिकाऱ्यांपैकी गुप्तहेर एडमंडला, एकदोन मुद्दे गोंधळात टाकत होते. तो चतुर मनुष्य होता. नंतर त्याला दुसऱ्या गावाला पाठवण्यात आले. आणि अशा तऱ्हेने, मी या प्रकरणाशी, जोडला गेलो. त्याने, त्या प्रकरणातील लक्ष काढून घेतले.”

“बारीक, पिवळसर केस असलेला मनुष्य?”

“बरोबर. मला खात्री होती, की तुला ते आठवेल.”

“पण त्याला, काय सलत होते?”

“आम्हाला दोघानाही, सलत होते. ते प्रकरण हाताळणे, फारच अवघड होते. त्याकडे सिंहाच्या नजरेतून बघा. तो मोकळा आहे. त्याने काय केले? पुढे पाच सहा फेऱ्या मारल्या. त्यामुळे तो रॉन्डरजवळ आला. रॉन्डरने पळायचा प्रयत्न केला -- पंज्याच्या खुणा डोक्याच्या मागील बाजूस होत्या -- पण सिंहाने त्याला खाली पाडले. मग त्याच्यावर ओणवून निघून जाण्याऐवजी, तो पिंजऱ्याजवळ असलेल्या बाईकडे वळला. त्याने तिला पंजे मारले. चेहऱ्यावर चावला. तिच्या किंकाळ्या, असे दर्शवत होत्या की तिचा नवरा, तिची सुटका करायला असमर्थ होता. तो जखमी बिचारा, तिला काय मदत करणार? तुम्ही समजू शकता, की नाही?”

“नक्कीच.”

आणि मग अजून एक गोष्ट झाली. मी विचार करतो, तशी ती माझ्यावरच उलटते. जेव्हा सिंहाने गर्जना केली व बाई किंचाळली, तेव्हा एक मनुष्य भीतीने ओरडू लागला."

"तो नक्कीच रॉन्डर होता."

"पण त्याची कवटी चिरडली गेली होती, तर तो परत ओरडणे, तुम्ही अपेक्षित धरु शकत नाही. बाईच्या ओरडण्याबरोबर, पुरुषाच्या ओरडण्याचा आवाजही आला होता, असे सांगणारे निदान, दोन तरी साक्षीदार आहेत."

"मला वाटते सगळा परिसरच, तेव्हा ओरडत होता. इतर मुद्द्यांच्याबाबतीत, मी उत्तर शोधू शकतो."

"ते मला कळले, तर मला आनंद होईल."

"दोघे बरोबर होते. जेव्हा सिंह मोकळा सुटला, तेव्हा ते पिंज़्यापासून दहा यार्डावर होते. मनुष्य वळला व त्याला पाडले गेले. बाईच्या डोक्यात असे आले, की पिंज़्यात जाऊन स्वतःला बंदिस्त करावे. या प्रकारेच फक्त तिला स्वतःची सुटका करून घेता आली असती. ती असे करायला लागल्यावर, सिंहाने तिच्यावर उडी घेऊन, तिला खाली पाडले. ती तिच्या नवऱ्यावर चिडली. कारण त्याने सिंहापासून वळून सिंहाला राग आणला. जर त्यांनी त्या सिंहाला तोंड दाखवले असते, तर ते कदाचित सिंहाला शांत करू शकले असते. म्हणून ती 'भित्रा' असे ओरडली.

"झकास, वॉटसन! फक्त यात, एकच चूक दिसते."

"होम्स, काय चूक आहे?"

“जर ते पिंजऱ्यापासून, दहा यार्डावर होते, तर सिंह मोकळा कसा काय होता?”

“असे शक्य आहे, की त्याना कुणी शत्रू असेल व त्याने पिंजऱ्याचे दार, उघडे ठेवले असेल.”

“तो सिंह त्यांच्या नेहमीच्या खायला घालण्याला, सरावलेला होता, तर मग त्याने त्यांच्याबरोबर खेळण्याऐवजी, रानटीपणे त्यांच्यावर हल्ला का केला?”

“बहुधा त्या शत्रूने, त्या सिंहाला फार क्रुद्ध बनवले असावे.”

होम्स विचारात पडलेला वाटला. काही काळ गप्प राहिला.

“बर वॉटसन, तुझ्या बोलण्यावर मी असे म्हणेन, की रॉन्डरला खूप शत्रू होते. एडमंडने मला सांगितले, की तो प्यायल्यावर भयानक असे. त्याच्या वाटेत येणाऱ्याला, वाटेल तशा शिव्या घालून त्रास देत असे. त्या जणू एखाद्या राक्षसाच्या डरकाळ्या असत, असे आपली अशील म्हणाली होती. त्या बाईच्या रात्रीच्या किंकाळ्या आठव. पण जोपर्यंत आपल्याला सर्व काही समजत नाही, तोपर्यंत आपले तर्क, काही ठाम निर्णयापर्यंत पोचत नाहीत. आपण त्या बाईला भेटण्यापूर्वी, आपला उत्साह टिकवून ठेवूया.

जेव्हा घोडागाडीने आम्हाला मिसेस मेरीलोच्या घराशी सोडले, तेव्हा त्या जाड्या बाईला आम्ही तिच्या घराच्या उघड्या दारात, उभे असलेले पाहिले. तिची मुख्य काळजी ही होती, की ती भाडेकरू, जागा सोडून जाईल की काय. त्यामुळे ती बहुधा, आम्हाला असे सांगायला उभी होती, की तुम्ही काही न करता, आलात तसे

परत जा. तिची समजूत घातल्यावर, आम्ही तिच्याबरोबर वाईट गालिचा अंथरलेला जिना, चढू लागलो व त्या गूढ भाडेकरुच्या खोलीत पोचलो.

ती कोंडलेली, शिळा वास येणारी, लहानशी जागा होती. आमच्या अंदाजाप्रमाणे, ती भाडेकरू क्वचितच तेथून बाहेर जात असे. एका हिंस्त्र जनावराला पाळीव प्राण्यासारखे पिंज़्यात कोंडता कोंडता, नशिबाच्या फे़ऱ्याने, ती स्वतःच पिंज़्यात कैद झाली होती. खोलीच्या अंधाऱ्या कोप़ऱ्यात, एका मोडक्या हातवाल्या खुर्चीत, ती बसली. अनेक वर्षे, योग्य तितकी हालचाल न केल्याने, तिची आकृती बेढब झाली होती. पण कधीकाळी ती सुंदर असणार आणि अजूनही ती सुखलोलुप, वाटत होती. एका जाड व गडद बुरख्याने, तिने चेहरा झाकला होता. पण तिचा वरचा ओठ, नीट आकाराचे तोंड व गोल हनुवटी दिसत होती. नक्की ती एक वेगळीच बाई असल्याचे, मी जाणले. तिचा आवाज चांगला कमावलेला व सुखकारक वाटत होता.

ती म्हणाली, "मिस्टर होम्स, माझे नाव काही तुम्हाला अपरिचित नाही. त्यामुळेच मला वाटते, तुम्ही आलात."

"तसे आहे बाईसाहेब, पण तुम्हाला कसे कळले, की मला तुमच्या केसमध्ये रुची आहे."

"माझी तब्येत सुधारली, तेव्हा मला कळले, की मला गावातील गुप्तहेर असलेल्या, मिस्टर एडमंड यांनी तपासले. मी त्यांच्याशी खोटे बोलले, म्हणून मला भीती वाटत होती. मी खरे बोलले असते, तर तो कदाचित शहाणपणा ठरला असता."

"खरे बोलणे, नेहमीच शहाणपणाचे ठरते. पण तुम्ही त्यांच्याशी, खोटे का बोललात?"

“कारण दुसऱ्या कोणाचे तरी भविष्य, त्यावर अवलंबून होते. मला माहिती होते, की तो फारच फालतू माणूस होता. तरी माझ्या सद्सदविवेकबुद्धीला स्मरून, मी त्याला बरबाद केले नाही. आम्ही इतके -- इतके जवळ होतो!”

“पण हा अडथळा, आता दूर झाला का?”

“हो सर, ज्या व्यक्तीबद्दल मी बोलते आहे, ती मेली.’

“मग तुम्हाला जे माहिती आहे, ते पोलिसाना का सांगत नाही?”

“कारण, अजून एका माणसाचा पण, विचार करायला हवा. तो माणूस म्हणजे, मी. मला पोलीस तपासणीमुळे होणारा गवगवा, नको आहे. मी काही आता, जास्त जगणार नाही. पण मला शांततेने, मरायचे आहे. मला एका तरी सुयोग्य माणसाला, माझी भयंकर गोष्ट सांगायची आहे. म्हणजे मी मेल्यावर, कुणाला तरी सर्व समजलेले असेल.”

“बाईसाहेब, तुम्ही माझी भलावण करत आहात. मी जबाबदार मनुष्य आहे. मी तुम्हाला असे वचन देऊ शकत नाही, की तुम्ही मला जे सांगाल, ते मी पोलिसाना सांगणार नाही. कारण, ते माझे कर्तव्य असेल.”

“मिस्टर होम्स, मी तसा विचार करत नाही. मला तुमचे चारित्र्य व कामाची पद्धत माहिती आहे. कारण मी काही वर्षे, तुमचे काम पहाते आहे. फक्त वाचणे, एवढाच आनंद माझ्या आयुष्यात, नशिबाने ठेवला आहे. जगात इतर सर्वत्र चाललेल्या गोष्टींना, मी मुकले आहे. पण माझ्या बाबतीत, मी माझ्या दुःखद गोष्टीचा, तुम्हाला उपयोग होण्याची संधी सोडणार नाही. मी ते सांगून, माझे मन मोकळे करीन.”

“मी व माझा मित्र, तुमचे म्हणणे आनंदाने ऐकू.”

ती बाई उठली व खणातून एका माणसाचे, फोटो काढले. तो मजबूत शरीराचा होता. त्याचे मोठे हात, त्याच्या फुगलेल्या छातीवर घडी करून ठेवलेले होते. त्याच्या मोठ्या मिशांमधून स्वतःच्या समाधानाचे हसू हसणारा व अनेकाना ताब्यात ठेवणारा, असा तो होता.

“तो लिओनार्डो आहे.” ती म्हणाली.

“लिओनार्डो, तो पुरावा देणारा मजबूत माणूस?”

“तोच तो. आणि हा -- दुसरा फोटो. हा माझा नवरा आहे.”

“त्याचा चेहरा भयानक होता. डुकरासारखा असलेला माणूस. महाकाय, शक्तिमान व भीती उत्पन्न करणारा, रानटी, क्रूर व वाईट वर्तनाचा असा तो जंगली रानडुक्कर माणूस होता. फारच भेसूर तोंडाचा, रागाने तोंडाला फेस आलेला, छोट्या धोकादायक डोळ्यांचा; अशी त्याची तुम्ही कल्पना करू शकता. शारीरिक शक्तीच्या जोरावर, अशक्तांना त्रास देणारा, खूनखराबा करणारा व पशुसारखाच असणारा, असा तो होता. हे सर्व त्याच्या ओघळलेल्या गालांवर, लिहिले होते.

“सभ्य गृहस्थहो, हे दोन फोटो, त्यांची गोष्ट समजून घायला, तुम्हाला मदत करतील. मी एक कोंड्यावर वाढलेली, सर्कसमधील गरीब मुलगी होते. गोल रिंगमधून मागेपुढे उड्या मारायचे काम, मी दहा वर्षाची होण्याच्या आधीपासून, करत होते. मी जाणती झाल्यावर, हा माणूस माझ्यावर प्रेम करू लागला. त्याच्या वासनेला, प्रेम म्हणता येत असले तर! त्याच्या पापी कृत्यांमध्ये, मी त्याची बायको होऊन सहभागी झाले, त्या दिवसापासून माझा नरकवास सुरु झाला. त्या राक्षसाने, माझा शारीरिक

आणि मानसिक छळ केला. त्याच्या कारवाया जाणत नव्हते, असे सर्कसच्या खेळामध्ये कोणीच नव्हते. त्याने मला, इतर सर्वांपासून तोडले. मी तक्रार केल्यावर, त्याने मला बांधून, चाबकाने बेदम चोपून काढले. सर्वाना माझी दया येई व त्याचा तिटकारा वाटे. पण ते, काय करू शकत होते? ते सगळे त्याला घाबरत. कारण तो सर्व वेळी, भयानक असे आणि दारू प्यायलेला असे, तेव्हा तर खुनशी असे. त्याच्या वारंवार लोकांवर हल्ला करण्यामुळे व पशुंवर अत्याचार करण्यामुळे, तो पोलिसांकडून पकडला जाई. पण त्याच्याकडे भरपूर पैसे असल्याने, त्याला दंड भरायला, काहीच वाटत नसे. सर्व चांगली माणसे, आम्हाला सोडून गेली. खेळ हळूहळू, गाळात जाऊ लागला. फक्त लिओनार्डो व मी दोघानीच छोटा जिमी ग्रीग्ज या विदूषकाच्या मदतीने ती कशीबशी चालू ठेवली. बिचारा ग्रीग्ज! त्याच्याकडे लोकाना ह्सवण्यासारखे, मजेशीर काही नव्हते. पण खेळ चालू ठेवण्यासाठी, तो काहीतरी करत राहिला.

मग माझ्या आयुष्यात, लिओनार्डो अधिकाधिक येऊ लागला. तुम्हाला तो कसा आहे ते माहितीच आहे. त्या दणकट शरीरात, जो काही सुप्त असा दुष्ट आत्मा दडलेला होता, तो आत्ता मला कळला. पण तेव्हा तो मला, माझ्या नवऱ्यापेक्षा चांगला, अगदी देवदूतासारखा वाटू लागला. त्याला माझी दया आली व त्याने मला मदत केली. आमचे एकमेकांवर गाढ, अगदी भावनातिरेकाने केलेले, प्रेम बसले. अशा प्रेमाची मी फक्त स्वप्नात, कल्पना केली होती पण प्रत्यक्षात, कधीच अनुभवले नव्हते. माझ्या नवऱ्याला याचा संशय आला, पण मला वाटते, तो भित्रा व दंडुकेशाही गाजवणारा, असा दोन्ही प्रकारचा होता. तो कसा कुणास ठाऊक, पण लिओनार्डोला घाबरणारा होता. त्याने त्याच्या पद्धतीने, माझा पूर्वीपेक्षा अधिक छळ करून, सूड

घेतला. एका रात्री माझ्या किंकाळ्या ऐकून, लिओनार्डो आमच्या गाडीच्या दाराशी आला. आम्ही त्या रात्री एका दुःखी घटनेच्या जवळ येऊन ठेपलो. मी आणि माझा प्रियकर, समजून चुकलो, की आता यातून माघार घेणे, शक्य नाही. माझा नवरा, जगायला लायक नव्हता. आम्ही बेत आखला, की हा मेला पाहिजे.

लिओनार्डो हुशार व बेत आखण्यात निष्णात, अशा बुद्धीचा होता. त्याने तो सर्व बेत आखला. मी त्याला दोष देत नाही, कारण, मी कुठल्याही परिस्थितीत, त्याची साथ सोडणार नव्हते. पण माझ्याकडे, अशी युक्ती शोधून काढण्याइतकी बुद्धी व चातुर्य नव्हते. आम्ही -- म्हणजे लिओनार्डोने एक हत्यार बनवले. थंड डोक्याने त्याने बाहेरील बाजूस टोक वळलेली, सिहासारखी पाच लांब स्टीलची नखे असलेली काठी बनवली. जवळजवळ सिंहाचा पंजाच बनवला. माझ्या नवऱ्याला मरणधक्का देण्यासाठी, तो सिंहाचा पंजा केला होता. सिंहानेच त्याच्यावर हल्ला केला आहे, असा आभास होऊन, आमच्यावर काही आरोप येऊ नये, अशी ती योजना होती. त्यासाठी आम्ही पिंजऱ्याचे दार, थोडे उघडे ठेवले होते.

“ती गडद काळोखाची रात्र होती. तेव्हा मी व माझा नवरा आमच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे, सिंहाला खायला घालण्यासाठी आलो. आमच्याबरोबर आम्ही, जस्ताच्या थाळीतून कच्चे मास आणले होते. पिंजऱ्याजवळ पोचण्यापूर्वी, आम्हाला गाडी ओलांडावी लागणार होती व तिथे कोपऱ्यात लिओनार्डो थांबला होता. त्याच्या लक्षात येण्यापूर्वीच, आम्ही त्याच्या अंगावरुन पुढे गेलो. पण तो आवाज न करता चुपचाप आमच्या पाठोपाठ आला. माझ्या नवऱ्याच्या डोक्यात तो सिंहाचा खोटा हात घुसल्याचा आवाज मी ऐकला. तो ऐकून माझे हृदय, आनंदाने धडधडू लागले. मी पुढे झाले व सिंहाच्या पिंजऱ्याच्या दाराची फट बंद करायला गेले.

आणि मग एक भयंकर गोष्ट झाली. तुम्ही ऐकले असेल, की माणसाच्या रक्ताचा वास, या प्राण्याना किती झटकन येतो व त्यामुळे ते कसे उत्तेजित होतात. काहीतरी अंतःप्रेरणेने, त्या प्राण्याला क्षणार्धात कळले, की कुण्या माणसाला भोसकले गेले आहे. मी दार लावता लावता त्याने बाहेर उडी मारून, माझ्या अंगावर झेप घेतली. लिओनार्डो जर त्याच्या शस्त्रासहीत, पुढे आला असता व शस्त्राने सिंहावर वार केला असता तर, तर कदाचित सिंहापासून, मला वाचवू शकला असता. पण त्याची घाबरगुंडी उडाली. मी त्याला भीतीने ओरडताना व वळून, पळून जाताना पाहिले. त्याच वेळी सिंहाचे सुळे, माझ्या चेहऱ्यात घुसले. त्या गरम, घाणेरड्या श्वासाने व पंज्याने केलेला विषारी जखमांनी मी बेशुध्द झाले. त्यापूर्वी, माझ्या तळव्यांनी मी सिंहाचा, फुत्कार टाकणारा व रक्ताने माखलेला जबडा माझ्यापासून दूर सारायचा प्रयत्न करत होते. मदतीसाठी ओरडत होते. सर्व परिसर ढवळला गेल्याचे, मला जाणवले. मग माणसे आल्याचे, मला अंधुक जाणवले. लिओनार्डो, ग्रीग्ज व इतर लोक मला सिंहाच्या पंज्याखालून, ओढत होते. मी बेशुध्द होते. मिस्टर होम्स, अनेक महिने मी, झोपेशिवाय तळमळत राहिले. जेव्हा मी भानावर आले व स्वतःला आरशात पाहिले, तेव्हा सिंहाला खूप शिव्या दिल्या. माझे सौदर्य ओरबाडले म्हणून नव्हे, तर मला ठार केले नाही म्हणून. माझी एकच इच्छा उरली होती. मिस्टर होम्स, माझ्याकडे ती पुरी करायला पैसेही होते. मी माझा कुरूप चेहरा झाकून घेईन व मला कोणी ओळखत नाही व कुणी भेटणार नाही अशा ठिकाणी जाऊन राहीन. मला तेवढेच करणे, शिल्लक राहिले होते -- आणि तेच मी केले. तो बिचारा जखमी माणूस, माझा नवरा, मरणाच्या दाढेत ओढला गेला -- तर अशा तऱ्हेने, युगेनिया रॉन्डरचा शेवट झाला.

त्या दुःखी बाईने तिची गोष्ट सांगितल्यावर, आम्ही काही वेळ शांत बसून राहिलो. मग होम्सने सहानुभूती दाखवत, त्याचे लांब हात ताणले आणि तिच्या हातावर समजूत घातल्यासारखे ठेवले. असे त्याचे भावप्रदर्शन, मी क्वचितच पाहिले होते.

तो बोलला, "बिचारी बाई! बिचारी बाई! नशिबाचे खेळ खरंच, अगम्य असतात. जर अशा दुर्दैवी घटनेनंतर, काही सहानुभूती मिळणार नसेल, तर जग म्हणजे एक दुष्ट विनोदच होईल. पण लिओनार्डोचे काय?"

"मी त्यानंतर, त्याला कधी पाहिले नाही व त्याच्याबद्दल काही ऐकलेही नाही. कदाचित त्याच्याबद्दल कडवटपणे असा समज करून घेणे, माझ्यासाठी चुकीचे होते. अगदी वेगळी व अकल्पनीय अशी सिंहाची कहाणी, आम्ही गावभर पसरवली. पण बाईचे प्रेम ही बाब, अशी सहजासहजी नजरेआड करता येत नाही. त्याने मला त्या पशूच्या पंजाखाली मरत ठेऊन दिले. माझ्या गरजेच्या वेळी, मला सोडून गेला. तरीही मी त्याला, फाशीच्या तख्तापर्यंत पोचवू शकले नाही. माझे काय झाले, ती गोष्ट अलाहिदा. माझ्या आत्ता जगते आहे त्या प्रत्यक्ष आयुष्यापेक्षा, भयंकर अजून काय असू शकेल? पण मी लिओनार्डो व त्याचे नशीब, यामध्ये उभी आहे."

"आणि तो मेला का?"

"गेल्या महिन्यात मार्गेटजवळ अंघोळ करताना, तो बुडाला. मी वर्तमानपत्रात त्याच्या मृत्यूबद्दल वाचले."

"आणि त्याच्याकडील त्या तुमच्या गोष्टीतील अद्वितीय व विचित्र अशा पंचनखी शस्त्राचे त्याने काय केले?"

“मिस्टर होम्स, मी सांगू शकत नाही. गावाबाहेर एक हिरवे पाणी असलेली चुनखडीची खाण आहे. कदाचित त्याच्या तळाशी -- ”

“त्याचे आता फारसे महत्व नाही. ही केस आता बंद झालेली आहे.”

ती बाई म्हणाली, “हो. ही केस आता बंद झाली आहे.”

आम्ही जाण्यासाठी उठलो. पण त्या बाईच्या आवाजात, असे काही होते की ज्यामुळे, होम्सचे लक्ष खिळले गेले. तो सावकाश तिच्याकडे वळला.

तो म्हणाला, “तुमचे आयुष्य, तुमचे नसते. त्यात ढवळाढवळ करायचा प्रयत्न करू नका.”

“कोणाला त्याचा उपयोग आहे?”

“ते तुम्ही कसे सांगणार? जगाचा हाच एक मूल्यवान धडा आहे, की मूकपणे वेदना सहन करायला लावणे.”

त्या बाईचे उत्तर भयानक होते. तिने तिचे चेहऱ्यावरील अवगुंठन बाजूला केले व पुढे उजेडात आली.

“ती म्हणाली, “तुम्हाला हे सहन होईल का, ते मला माहिती नाही.”

ते भयानक होते. शब्दात मांडणे शक्य नसलेली, चेहरा असे काही शिल्लक नसलेली चौकट! उबग येईल अशा भीतीदायक, नष्ट झालेल्या भागावर उगवून आलेले ते दृष्य! अजूनच भेसूर करणारे, दोन जिवंत, सुंदर, तपकिरी करुण डोळे! होम्सने त्याचे हात, दया दाखवण्यासाठी व विरोधासाठी उंचावले आणि आम्ही दोघे बाहेर पडलो.

दोन दिवसांनतर, मी माझ्या मित्राला भेटलो तेव्हा त्याने, मोठ्या अभिमानाने, त्याच्या शेकोटीवरील भिंतीच्या बाजूस असलेली, एक छोटीशी निळी बाटली दाखवली. मी ती उचलली. त्यावर लाल विष, असे लिहिलेली चिठ्ठी होती. मी ती बाटली उघडली तेव्हा, ताजा बदामी वास उसळला.

मी म्हणालो, "हे हायड्रोसायनिक ॲसिड आहे."

"बरोबर. हे पोस्टाने आले. 'मला जे घ्यायचा मोह होतो आहे, ते तुम्हाला पाठवले आहे. मी तुमचे म्हणणे ऐकेन.' असा निरोप होता. वॉटसन, मला वाटते, ही पाठवणाऱ्या शूर महिलेच्या नावाचा, आपण अंदाज करू शकतो."

रत्नजडित मुकुट

खालील रस्त्याकडे बघत मी खिडकीत उभा होतो. तेव्हा मी म्हणालो, “होम्स, एक वेडा माणूस येतो आहे. त्याच्या नातेवाईकानी, त्याला एकट्याला सोडावे हे, जरा दुःखद वाटते.”

माझा मित्र अंगात आळस भरलेल्या स्थितीत आरामखुर्चीतून उठून, त्याच्या गाऊनच्या खिशात हात घालून, माझ्या खांद्यावरून डोकावून पाहू लागला. ती उजेडाची व कोरडी अशी, फेब्रुवारीमधील सकाळ होती. आदल्या दिवशीचा बर्फाचा थर अजून रस्त्यावर पडला होता व सूर्यप्रकाशात चमकून उठत होता. बेकर रस्त्याच्या

मध्यभागी, येणाऱ्या जाणाऱ्या मोटारींमुळे तो बर्फ चुरडला जाऊन, चॉकलेटी पट्टे उठले होते. पदपथ मात्र अजून, पांढराशुभ्र दिसत होता. पण उंचसखल झाल्यामुळे, धोकादायक रित्या घसरडा झाला होता. त्यामुळे त्यावरून चालणारे लोक, नेहमीपेक्षा कमी होते. फक्त हा चक्रम माणूस सोडून, रेल्वे स्टेशनच्या बाजूने कोणीच येत नव्हते. त्याच्या विचित्र वागणुकीने माझे लक्ष वेधून घेतले.

तो साधारण पन्नाशीचा, उंच, दणकट व छाप पाडणारा इसम, वाटत होता. त्याचा चेहरा भरीव व उठून दिसणारा होता. शरीरयष्टी हुकमी वाटत होती. त्याने फिकट रंगाचे, पण खानदानी छापाचे, कपडे घातले होते. काळा कोट, मोतिया करड्या रंगाची पँट व चकाकणारी टोपी घातली होती. पण त्याच्या डौलदार कपड्याना व एकंदर शरीरयष्टीला, त्याचे हावभाव शोभत नव्हते. कारण तो मधूनच उड्या मारत, भरभर चालत होता. पायांना तो देत असलेल्या अती गतीमुळे, तो दमलेला वाटत होता. धावताना तो त्याचे हात, जोरजोराने वरखाली हलवत होता. मान इकडेतिकडे, फिरवत होता. चेहराही, विचित्रपणे हलवत होता.

मी म्हणालो, "याला काय झाले असेल? तो घरांवर टाकलेले आकडे, बघत चालला आहे."

होम्स त्याचे हात चोळत म्हणाला, "मला वाटते, तो इथेच, येतो आहे."

"हो. मला वाटते, तो माझा व्यावसायिक सल्ला घ्यायला, येतो आहे. मला त्याचे हावभाव, ओळखीचे वाटत आहेत. हो. मी तुला, बोललो नाही का?" तो असे बोलत असताना तो मनुष्य धापा टाकत, आमच्या दाराशी आला व सबंध घरभर आवाज घुमेपर्यंत, घंटी वाजवत राहिला.

काही वेळाने तो आमच्या खोलीत होता. अजून धापा टाकत होता व काही न बोलता, नाटकी हावभाव करत होता. त्याच्या डोळ्यातील तीव्र दुःखाची छटा बघून, एका झटक्यात आमचे हसू, भीती व दयेमध्ये बदलले. क्षणभर त्याला, बोलताच येईना. पण तो त्याचे शरीर, मागे व दोन्ही बाजूला हलवत राहिला. विचारांच्या अंतापर्यंत जाऊन पोचल्यासारखे, केस उपटत राहीला. मग एकदम पायावर उभा राहून, त्याचे डोके इतक्या जोराने भिंतीवर आपटून घेऊ लागला, की आम्ही दोघेही धावलो व त्याला खोलीच्या मध्यभागी आणले. शेरलॉक होम्सने त्याला आरामखुर्चीत ढकलले व त्याच्या शेजारी बसून, त्याच्या हातावर थोपटले. त्याच्याशी हलक्या, सांत्वनपर आवाजात बोलू लागला. ते कसे करायचे, हे त्याला चांगलेच ठाऊक होते.

तो बोलला, "तू माझ्याकडे, तुझी हकीगत सांगायला आला आहेस, नाही का? तू घाईने आल्यामुळे, दमला आहेस. तू आधी स्वतःला सावर आणि नंतर तुझी काय समस्या आहे, ते मला सांग."

छाती धपापत व स्वतःच्या भावनांशी भांडत, तो मिनिटभर बसला. मग कपाळावरून रुमाल फिरवला. ओठ घट्ट केले आणि त्याचा चेहरा, आमच्याकडे वळवला.

तो म्हणाला, "नक्कीच तुम्ही मला, वेडा समजला असाल."

होम्स उत्तरला, "मला वाटते, तू काहीतरी भलत्याच, त्रासात आहेस."

"देवाला माहीत मला -- एकदम अचानक झालेला भयंकर त्रास -- माझी बुद्धी भ्रष्ट करणरा --

माझे चारित्र्य, धुतल्या तांदुळासारखे असताना, मी लोकांची अवहेलना, एक वेळ सहन केली असती. खासगी संकटेही प्रत्येकाचा नशीबात असतातच. पण दोन्ही एकदम येणे, म्हणजे भयंकर आहे. त्यामुळे मी ढवळून निघालो आहे. आणि फक्त मी एकटाच नाही, तर या भागातील उच्च खानदानी घराण्यातील कोणीतरी पण! या भयानक प्रकरणातून बाहेर पडायचा मार्ग, शोधायला हवा. नाहीतर, खूपजण या त्रासाला बळी पडतील.

होम्स म्हणाला, "तुमच्या मनात काय आहे, ते बोलून टाका. म्हणजे मलादेखील स्पष्टपणे कळेल, की तुम्ही कोण आहात व तुमची काय व्यथा आहे."

आमचा पाहुणा म्हणाला, "माझे नाव बहुधा, तुमच्या ओळखीचे असेल. थ्रेडनीडल रस्त्यावरील, होल्डर व स्टीव्हन्सन बँकींग फर्मचा, मी अलेक्झांडर होल्डर आहे." लंडनमधील सर्वात मोठ्या बँकींग फर्मपैकी दोन नंबरच्या बँकींग फर्मचा, तो जेष्ठ भागीदार असल्याने, ते नाव आमच्या खरेच, ओळखीचे होते. मग काय झाले असेल, की लंडनचा सन्मान्य नागरिक, अशा दयनीय अवस्थेत असावा? त्याला स्वतःची गोष्ट सांगायचे बळ येईपर्यंत, आमची उत्सुकता दाबून, आम्ही थांबलो.

तो बोलला, "मला वाटते की वेळेला महत्व आहे. म्हणून मी इथे यायची घाई केली. पोलीस इन्स्पेक्टरने मला, तुमचे सहकार्य मिळवण्याची, सूचना केली आहे. मी जमिनीखालील मार्गाने बेकर रस्त्याला आलो आणि भरभर पोचण्यासाठी चालत आलो. कारण बर्फातून गाड्या, फार हळू चालत आहेत. मी व्यायाम करणारा माणूस नाही, त्यामुळे मी फार दमलो. पण आता मला बरे वाटते आहे. मी तुमच्यासमोर थोडक्यात, पण स्पष्टपणे, सर्व गोष्टी मांडतो.

तुम्हाला अर्थात हे माहिती आहे की, यशस्वी बँकींग व्यापारासाठी, ग्राहक वाढवणे व आर्थिक दृष्ट्या मजबूत अशा ठेवी वाढवणे, क्रमप्राप्त असते. नफा वाढवण्यासाठी, सर्वात योग्य मार्ग म्हणजे कर्जे देणे. पण त्यात सुरक्षितता, संशयास्पद असता कामा नये. आम्ही गेले काही वर्षे, असे खूप प्रयत्न केले. अनेक उच्च वर्गातील कुटुंबांकडून, त्यांची भव्य चित्रे, वाचनालये व चायना कपबशांचे संच गहाण ठेऊन, आम्ही मोठ्या रकमा कर्जाऊ दिल्या आहेत.

काल मी माझ्या कार्यालयात बसलो असताना, कारकुनाने एक कार्ड आणून दिले. ते पाहून मी चमकलो, कारण ते दुसऱ्या कुणाचे नसून, इंग्लंडमधील आदराने घेतले जाणारे, अगदी उच्च स्तरातील व जगातील घरगुती सामानाच्या बाबतीतले, अग्रगण्य असे, नाव होते. तुम्ही देखील ते ऐकलेले असेल. मला मिळणाऱ्या मानामुळे मी हर्षभरित झालो. तो आत आल्याबरोबर, त्याने कामासंबंधी, बातचीत सुरु केली. मान्य करण्यास कठीण असे ते काम, त्याला पटपट उरकायचे होते.

तो बोलला, "मिस्टर होल्डर, मला असे समजले आहे, की तुम्ही पैसे कर्जाऊ देता."

"जेव्हा सुरक्षितता चांगली असते, तेव्हाच आम्ही ते करतो."

तो म्हणाला, "मला ५०,००० पौंडांची ताबडतोब, खूप गरज आहे. अर्थात मी माझ्या मित्रांकडून, या किरकोळ रकमेच्या दहापट रक्कम, मिळवू शकतो. पण मला ते व्यवहार म्हणून, घ्यायचे आहेत. माझ्या एकंदर समाजातील स्थानावरून तुम्ही समजाल, की मला कुठल्याही अटी घालणे, शहाणपणाचे होणार नाही."

मी विचारले, “किती काळाकरता तुम्हाला ही रक्कम हवी आहे, असे मी विचारू शकतो का?”

‘पुढच्या सोमवारी मला एक मोठी रक्कम मिळणे, अपेक्षित आहे. आणि तेव्हा मी बहुधा नक्कीच तुमची रक्कम, तुम्हाला जो व्याजदर योग्य वाटेल, त्यासह परत करीन. पण मला लगेच पैसे मिळणे आवश्यक आहे.”

मी म्हणालो, “मी माझ्या स्वतःच्या खिशातून काहीही अटींशिवाय, तुम्हाला ताबडतोप रक्कम देऊ शकतो. मला थोडा जास्त ताण, सहन करावा लागेल. पण जर फर्ममधून पैसे द्यायचे असतील, तर मला माझ्या भागीदाराशी, बोलावे लागेल. तुमच्या बाबतीत सुद्धा, व्यवहाराची प्रत्येक बाजू मला बघावी लागेल.”

दर्जेदार चामड्याची एक काळी चौकोनी केस खुर्चीत त्याच्या बाजूला ठेवत तो म्हणाला, ‘मी ते तसेच घेणे पसंत करेन. तुम्ही रत्नजडीत मुकुटाबद्दल ऐकले असेल ना?”

मी विचारले, “राजाच्या खजिन्यातील, मोठी किमती वस्तु?”

त्याने केस उघडून, मासाच्या रंगाच्या मऊ मखमलीमध्ये ठेवलेला, तो मोठा रत्नजडीत मुकुट दाखवला. तो म्हणाला, “अर्थात. त्यात एकोणचाळीस रत्ने आहेत. आणि सोन्याची किंमत तर मोजता येण्यासारखी नाही. याची कमीत कमी किंमत, मी तुमच्याकडून जी रक्कम घेणार आहे, त्याच्या दुप्पट असेल. मी ती तुमच्याजवळ ठेवायला तयार आहे.”

मी ती मूल्यवान केस, हातात घेतली आणि थोड्या संशयाने, तिच्याकडून माझ्या ग्राहकाकडे बघितले.

त्याने विचारले, “तुम्हाला याच्या किंमतीबद्दल, खात्री वाटत नाही का?”

“तसे नाही. मला फक्त असा संशय येतो आहे की -- “

“ती वस्तू इथे ठेवण्याच्या, माझ्या नेकीबद्दल? तुम्ही त्याबाबत, निश्चिंत राहू शकता. मी चार दिवसात, तुमचे पैसे तुम्हाला परत करून माझी वस्तू घेऊन जाईन, अशी मला खात्री असल्याशिवाय, मी हे धाडस करणार नाही. ही वस्तू अगदी खरी आहे. एवढी सुरक्षितता पुरेशी आहे का?”

“खूप झाली.”

“मिस्टर होल्डर, माझ्या तुमच्यावर असलेल्या विश्वासाचे, हे प्रतिक आहे. कारण मी तुमच्याबद्दल तसेच ऐकलेले आहे. तुम्ही त्याची काळजी घ्याल व गावगप्पाना थारा देणार नाही. कारण याला काही अपाय पोचला, तर ते मोठे प्रकरण होईल. त्याला काही धक्का लागला तर, त्याचा पूर्ण नाश झाल्यासारखेच होईल कारण, जगात अशी दुसरी रत्ने नाहीत, की जी त्या जागी बसू शकतील. तुमच्यावर पूर्ण विश्वास टाकून, मी ती इथे ठेवतो व सोमवारी सकाळी तुम्हाला स्वतः भेटतो.”

माझे ग्राहक जायला निघालेले पाहून, मी अजून काही न बोलता, माझ्या रोखपालाला बोलावून, त्याला १००० पौंडाच्या पन्नास नोटा काढायला सांगितले. पण माझ्यासमोरील टेबलावर, ती मूल्यवान केस असताना व मी तिथे एकटा असताना, मी त्या वस्तूबद्दल घेतलेली जबाबदारी माझ्याकडून निभावली जाण्याची, मला शंका वाटू लागली. ती राष्ट्रीय संपत्ती असल्याबद्दल, काही वाद नव्हता. पण त्याबाबत दुर्दैवाने काही नको ते झाल्यास, मोठ्या प्रकरणाला तोंड द्यावे लागेल, हे लक्षात येऊन, मी त्याची जबाबदारी घेतल्याबद्दल, स्वतःला कोसू लागलो. पण आता

जे झाले, त्यात काही बदल करणे शक्य नव्हते. मी ती वस्तू माझ्या खासगी लॉकरमध्ये, कुलुपबंद केली आणि परत माझ्या कामाला लागलो.

संध्याकाळ झाली. मला वाटले माझ्यामागे ऑफीसमध्ये मी पहिल्यांदाच, एवढी मौल्यवान वस्तू ठेवतो आहे, हे काही बरोबर नाही. बँकेचे लॉकर्स पूर्वी फोडले गेले होते. माझा पण कशावरून, फोडला जाणार नाही? असे झाले, तर माझी काय गत होईल? मी ठरवले, यापुढे मी जिथे जिथे जाईन तिथे तिथे, ती माझ्याबरोबरच नेईन. त्यामुळे ती सदैव, माझ्या ताब्यात असेल. असा विचार करून मी टॅक्सी बोलावली आणि माझ्या घरी, स्ट्रीथॅमला, त्या वस्तुसकट गेलो. मी ती जोपर्यंत वर घेऊन गेलो नाही व ती माझ्या कपडे बदलायच्या खोलीतील कपाटात बंदीस्त केली नाही, तोपर्यंत मी सुखाने श्वास घेऊ शकलो नाही.

मिस्टर होम्स, आता तुम्हाला सर्व काही समजण्यासाठी, माझ्या घराबद्दल थोडेसे बोलतो. माझा कुत्रा घराबाहेर झोपतो. त्यामुळे त्याचा काही प्रश्न नाही. माझ्याकडे अनेक वर्षांपासून तीन नोकराणी आहेत. त्यांची विश्वासार्हता वादातीत आहे. अजून एकजण ल्युसी नावाची नोकराणी फक्त गेले काही महिने, माझ्याकडे काम करते. तिचे चारित्र्य उत्तम आहे व कामही समाधानकारक आहे. परंतु, ती दिसायला सुंदर असल्याने, तिचे चाहते इथे अवतीभवती घोटाळत असतात. तेवढी एक बाब सोडली तर, प्रत्येक बाबतीत ती पूर्णपणे चांगली मुलगी आहे.

तर हे नोकरांबद्दल झाले. माझे कुटुंब इतके लहान आहे की त्याबद्दल सांगायला फार वेळ लागणार नाही. मी विधुर असून, मला एकच मुलगा आहे, आर्थर. तो म्हणजे माझी निराशाच आहे. मिस्टर होम्स, घोर निराशा आहे. त्यात मी मलाच,

दोषी समजतो. लोक म्हणतात, की मी त्याला बिघडवले आहे. बहुधा, तसेच असेल. जेव्हा माझी प्रिय पत्नी वारली, तेव्हा मला प्रेम करण्यासाठी, फक्त तोच उरला. त्याच्या चेहऱ्यावरून क्षणभरासाठी सुद्धा हसू मावळलेले, मला सहन होत नसे. त्याच्या सर्व इच्छा, मी पूर्ण करत असे. कदाचित मी कडक शिस्तीचा असतो तर, आमच्या दोघांसाठीही, ते बरे ठरले असते. मला खरे तर, उत्तम असे म्हणायचे होते.

मला नैसर्गिकपणे असे वाटत होते की, त्याने माझ्या व्यवसायात यशस्वी व्हावे. पण, तो व्यवसायाभिमुख, नव्हता. तो रानटी, लहरी व खरे सांगायचे तर, मोठ्या रकमेबाबत मी त्याच्यावर विश्वास टाकू शकेन असा नव्हता. तो तरुणपणी उमराव गटाचा सभासद झाला आणि थोडेच दिवसात तो, तेथील मोहक पद्धती व तेथील लांब पर्स घेऊन हिंडणाऱ्या व खर्चिक सवयी असणाऱ्या लोकांच्या संपर्कात आला. तो अति प्रमाणात पत्ते खेळू लागला व पैसे उधळू लागला. माझ्याकडे परतपरत येऊन, त्याची कर्जे चुकवण्यासाठी, उधारीवर पैसे मागू लागला. एकदोन वेळा त्याने धोकादायक दोस्तांपासून, वेगळे होण्याचाही प्रयत्न केला. पण दरवेळी, त्याचा मित्र, जॉर्ज बर्नवेलने, त्याला परत त्यांच्यात, ओढून घेतले.

बर्नवेलसारख्या माणसाने त्याच्यावर प्रभाव टाकावा, याचे मला आश्चर्य वाटले नाही. तो वारंवार त्याला घरी आणत असे. आणि मलादेखील त्याच्या व्यक्तिमत्वाची भूल पडल्यासारखे होई. तो आर्थरपेक्षा मोठा आहे. जग त्याच्या नादावर झुलत असलेला, सगळीकडे असणारा, सगळीकडे नजरेस पडणारा, संभाषणचतुर आणि अत्यंत देखणा असा तो आहे.. हेतुपूर्वक त्याच्या अस्तित्वाचा प्रभाव बाजूला ठेवून मी पाहीले तर, तो अत्यंत अविश्वासू डोळ्यांचा असल्याचे कळत असे. त्याच्यावर कधीच विश्वास टाकू नये, असा. असा मीच विचार केला असे नाही,

तर मेरीनेही असाच विचार केला, कारण महिलाना झटपट अंतरज्ञानाने त्या गोष्टी कळतात.

आणि आता ती कोण हे सांगायचे आहे. ती माझी पुतणी आहे. जेव्हा माझा भाऊ, पाच वर्षांपूर्वी वारला, तेव्हा जगात तिला एकटीलाच ठेऊन गेला. तेव्हा मी तिला घरी आणून, मुलीप्रमाणे तिचा सांभाळ केला. ती माझ्या घरात आलेला सूर्याचा किरण आहे. -- गोड, प्रेमळ, सुंदर, आश्चर्यकारक व्यवस्थापक व घर सांभाळणारी आणि तरीही नाजुक, शांत व हळूवार अशी ती माझा उजवा हात आहे. एकाच गोष्टीत ती माझ्या मनाविरुध्ह वागली आहे, दोनदा माझ्या मुलाने तिला लग्नासंबंधी विचारले, कारण तो तिच्यावर खूप प्रेम करतो. पण प्रत्येक वेळी तिने, नकार दिला. जर त्याला योग्य मार्गावर आणण्याचे काम कोणी करू शकत असेल, तर तीच करू शकते. त्यांच्या लग्नाने, त्याचे पूर्ण आयुष्य बदलले असते. पण आता त्यासाठी, फार उशीर झाला -- कायमचा फार उशीर!

मिस्टर होम्स, आता तुम्हाला माहिती आहे की, माझ्या घरात कोणकोण रहाते. आता मी माझी विचित्र गोष्ट सुरु करतो. त्या रात्री आम्ही जेवणानंतर कॉफी घेत होतो. तेव्हा आर्थर व मेरीला मी माझा अनुभव सांगितला. आणि मूल्यवान खजिन्याबद्दल, जो मी घरी आणून ठेवला होता, त्याबद्दलही सांगितले. फक्त माझ्या ग्राहकाचे नाव मात्र, मी सांगितले आही. ल्युसी कॉफी घेऊन आली होती. त्यानंतर तिने दार लावून घेतले होते. पण ते नक्की बंद होते, हे मी शपथेवर सांगू शकत नाही. मेरी व आर्थर याना त्या मुकुटाबद्दल फार रुची वाटू लागल्याने, त्याना तो पहायचा होता. पण मला, ते ठीक वाटले नाही.

आर्थरने विचारले, “तुम्ही तो कुठे ठेवला आहे?”

“माझ्या कपाटात.”

तो म्हणाला, “ठीक आहे. मी अशी आशा करतो, की रात्री घरावर दरोडा पडणार नाही.”

मी उत्तरलो, “तो कुलुपबंद आहे.”

“ओहो, माझी जुनी किल्ली त्याला बरोबर लागते. मी लहान असताना त्या किल्लीने ते उघडले होते.”

“त्याला नेहमी, रानटी पद्धतीने बोलायची सवय होती. तो काय बोलला, यावर मी विचार केला. त्या रात्री, एकदम पडलेला चेहरा घेऊन, तो माझ्यापाठोपाठ, माझ्या खोलीत आला.

मान खाली घालून बोलला, “हे बघा डॅड, तुम्ही मला २०० पौंड देऊ शकाल का?”

मी तीक्ष्णपणे म्हणालो, “नाही. मी नाही देऊ शकत. मी पैशाच्या बाबतीत, तुझ्याशी फार उदारपणे वागलो आहे.”

तो म्हणाला, “तुम्ही खूप दयाळूपणा दाखवला आहे. पण मला पैसे पाहीजे आहेतच. नाहीतर क्लबमध्ये मला तोंड दाखवायला, जागा रहाणार नाही.”

मी ओरडलो, “फार छान!”

तो म्हणाला, "तुम्हाला माझी मानहानी झालेली, आवडणार नाही. असे झालेले, मलाही सहन होणार नाही. तुम्ही मला दिले नाहीत, तर मला अन्य मार्ग शोधावे लागतील."

मी फारच रागावलो, कारण या महिन्यात, हे तिसऱ्यांदा होत होते. मी ओरडलो, "मी तुला एकही पैसा देणार नाही." यावर तो अधिक काही न बोलता, मान खाली घालून, निघून गेला.

तो गेल्यावर, मी माझे कपाट उघडून, खजिना सुरक्षित असल्याची खात्री केली व परत कुलूप लाऊन टाकले. मग मी घराभोवती चक्कर मारून, सर्व काही ठीक असल्याची खात्री केली, सहसा मी हे मेरीला सांगत असे. पण मला ते स्वतःच, करावेसे वाटले. मी खाली उतरलो, तेव्हा हॉलच्या एका खिडकीशी, मला मेरी दिसली. तिने खिडकी बंद करून कडी लावली.

ती मला थोडी उद्विग्न वाटली. ती बोलली, डॅड, तुम्ही त्या नोकराणीला, ल्युसीला, आज रात्री बाहेर जायची परवानगी, दिली आहे का?"

"अर्थातच नाही."

"ती आत्ताच, मागच्या दाराने आली. मला वाटते, ती बाजूच्या दाराशी, फक्त कोणाला तरी भेटायला गेली होती. पण मला वाटते, तिला काहीतरी धोका आहे व ती सुरक्षित नाही. हे थांबवले पाहीजे."

"तू सकाळी तिच्याशी बोल. किंवा तुला वाटत असेल तर, मी बोलतो. तुला खात्री आहे ना, की सर्व व्यवस्थित बंद केले आहे?"

“अगदी खात्रीने, डॅड.”

“मग शुभ रात्र.” असे म्हणून मी, माझ्या झोपायच्या खोलीत, वर गेलो व लगेच झोपलो.

“मिस्टर होम्स, जे घडले ते सर्व, मी तुम्हाला सांगायचा प्रयत्न करतो आहे, कारण त्यामुळे तुम्हाला पुढे, कदाचित फायदा होईल. पण तुम्हाला काही विचारायचे असल्यास, विचारू शकता.” “तुमचे सांगणे अगदी खुलासेवार आहे.” इति होम्स.

“आता मी गोष्टीच्या ज्या भागाकडे वळतो आहे, त्यात मी विशेषकरून खुलासेवार असावे, अशी मी इच्छा करतो. मी अगदी ढाराढूर झोपणारा, माणूस नाही. आणि माझ्या मनातल्या काळजीने, मी अजूनच तसा झालो होतो. साधारण, पहाटेच्या दोन वाजता, घरात काही आवाज झाल्याने, मी जागा झालो. त्यापूर्वीही मी टक्क जागा होतो. मला असे वाटले, की एक खिडकी, थोड्या हळूवारपणे लावली गेली. मी चाहूल घेत, पडून राहिलो. अचानक माझ्या पुढच्या खोलीत, हळूच पाय वाजल्याचा आवाज मला ऐकू आला. मी अंथरुणातून बाहेर पडलो. मी भीतीने थरथर कापत होतो. आणि मी माझ्या खोलीच्या दारातून, बाहेर डोकावून पाहिले.

मी किंचाळलो, “आर्थर! अरे खलनायका, अरे चोरा, मुकुटाला हात लावायची तुझी छाती कशी झाली?”

दिव्याचा मंद प्रकाश चालू ठेवूनच, मी आलो होतो आणि माझा आनंदी नसलेला मुलगा, त्याच्या शर्टपँटमध्ये उजेडात, हातात मुकुट घेऊन उभा होता. तो सर्व शक्तीनिशी, मुकुट वाकवायच्या किंवा रानटीपणे तोडफोड करायच्या, पावित्र्यात होता. माझे ओरडणे ऐकून त्याच्या हातून तो पडला व तो मरणांतिक घाबरला. मी

तो मुकुट ओढून घेतला व तपासला. त्याचा तीन रत्ने बसवलेला एक सोन्याचा कोपरा, नाहीसा झाला होता.

मी अत्यंत संतापाने ओरडलो, “अरे अपमानकारक माणसा, तू त्याची मोडतोड केलीस. तू माझी कायमची, नाचक्की केलीस. तू चोरलेली रत्ने, कुठे आहेत?”

तो केकाटला, ‘चोरलेली?”

मी त्याला खांद्याला धरून गदागदा हलवत, गर्जना केली, “हो, चोरा,”

तो बोलला, “मी, काहीच काढली नाहीत. त्यातून, काहीच कमी झालेली नाहीत.”

“त्यातून तीन नाहीशी झाली आहेत. आणि तुला माहिती आहे, की ती कुठे आहेत. मी तुला खोटारडा व चोर देखील म्हणू का? मी तुला त्या मुकुटावर, जोर लावताना पाहिले नाही, असे तू समजतोस का?”

तो म्हणाला, “तुम्ही मला, भरपूर शिव्या दिल्या आहेत. मी आता अजून, हे सहन करणार नाही. तुम्ही माझा अपमान केल्यामुळे, मी आता या विषयावर, अजून एकही शब्द बोलणार नाही. मी तुमचे घर, सकाळी सोडेन आणि जगात कसे जगायचे, ते माझे मी बघेन.”

मी दुःखाने व रागाने वेडापिसा होऊन ओरडलो, ‘तू ते पोलिसांच्या हातात देशील. मी हे प्रकरण धसास लावीन.”

त्याच्या स्वभावात मला माहिती नसलेल्या, तीव्र अशा भावनेने, तो बोलला, "तुम्हाला माझ्याकडून काही कळणार नाही. तुम्ही पोलिसाना बोलावलेत, तर त्याना काय शोधायचे ते शोधू दे."

सारे घर जागे होऊन, घाबरेघुबरे झाले होते. कारण रागाने, माझा आवाज चढला होता. पहील्यांदा मेरी माझ्या खोलीत धावली. मुकुट व आर्थरचा चेहरा बघून, तिला काय झाले ते कळले. ती किंचाळत जमिनीवर बेशुध्द पडली. मी नोकराणीला, पोलिसाना पाचारण करण्यासाठी पाठवले आणि ताबडतोप तपास, त्यांच्या हातात दिला. जेव्हा इन्स्पेक्टर व कॉन्स्टेबल आत शिरले, तेव्हा आर्थर त्याचे हात दुमडून, रागाने उभा होता. चोरीच्या गुन्ह्याखाली, त्याला मी पोलिसांच्या ताब्यात देणार का, असे त्याची नजर विचारत होती. मी असे म्हणालो, की हे खासगी प्रकरण आहे, पण सार्वजनिक झाले आहे. कारण मोडतोड केलेला मुकुट, ही देशाची संपत्ती होती. मी सांगितले, की सर्व काही कायद्याप्रमाणे व्हावे.

तो म्हणाला, "तुम्ही मला ताबडतोप पकडू नका. मी पाच मिनिटाकरता घर सोडले, तर ते तुमच्या व माझ्याही फायद्याचे होईल."

मी म्हणालो, "तेवढ्यात तू पळून गेलास व कदाचित तू जे चोरले आहेस, ते तू लपवलेस तर?" आणि मग जी भयंकर परिस्थिती ओढवेल, ती माझ्या लक्षात आली. मी त्याला म्हणालो की हे लक्षात ठेव, की फक्त माझीच मानहानी नव्हे तर देशाचीदेखील मानहानी होऊन, धमकीचे प्रकरण सुरु होईल. त्याने पाहीजे तर निघून जावे, पण त्या तीन रत्नांचे त्याने काय केले, हे सांगावे.

मी बोललो, तुला या प्रकरणाला, तोंड द्यावेच लागेल. तू यात रंगे हाथ, पकडला गेला आहेस. आणि कबुलीजबाबाने, तुझा गुन्हा आणखीच लज्जास्पद होणार आहे. रत्ने कुठे आहेत, ते सांगून, तुझ्या हातात असेल तेवढी भरपाई, तू करू शकतोस. मग तुझे अपराध, माफ केले जातील व विसरलेही जातील."

"तुमची क्षमाशीलता, जे ती तुमच्याकडे मागतील, त्यांच्यासाठी ठेवा." असे म्हणून निरागस हसू हसत, तो माझ्यापासून दूर गेला. तो इतका ताठर होता, की माझ्या कुठल्याही शब्दांचा त्याच्यावर, काहीही परिणाम होत नव्हता. त्यासाठी फक्त एकच उपाय होता. मी त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. फक्त त्याचीच झडती घेतली गेली नाही, तर त्याच्या खोलीची व त्याने ती रत्ने घरात कुठे ठेवली असण्याची शक्यता होती, त्या सर्व जागांची, कसून झडती घेण्यात आली. पण काही सापडले नाही. आम्ही कितीही मनधरणी केली व धमक्या दिल्या तरी, त्या दुःखी मुलाने काही, तोंड उघडले नाही. आज सकाळी तो तुरुंगात गेला. आणि मी पोलिसांच्या सर्व मागण्या पूर्ण करून, तुमच्याकडे धावत आलो. तुमच्या चातुर्याने, तुम्ही ही केस उलगडू शकाल, असा विश्वास मला वाटतो. पोलिसांनी असे सांगितले आहे, की सध्या तरी ते, काही करू शकत नाहीत. तुम्हाला योग्य वाटेल, त्या आर्थिक हद्दीपर्यंत, तुम्ही जाऊ शकता. मी आधीच १०० पौंडाचे बक्षिस त्यासाठी जाहीर केले आहे. अरे देवा, मी काय करू? मी एका रात्रीत माझा मान, रत्ने व मुलगाही गमावला आहे. अरेरे, मी काय करू?"

त्याने त्याच्या डोक्याच्या दोन्ही बाजूला, हात दाबून ठेवले व शब्दातीत दुःख झालेल्या माणसा प्रमाणे, स्वतःला मागे पुढे झुलवू लागला.

शेरलॉक होम्स त्याच्या भुवया जुळवून व डोळे शेकोटीकडे लावून, काही मिनिटे शांत बसला.

त्याने विचारले, “तुला भेटायला, खूप लोक आले का?”

“नाही. फक्त त्याच्या कुटुंबासकट, माझा भागीदार व आर्थरचा मित्र सर जॉर्ज बर्नवेल, हे मात्र पुष्कळ वेळा, घरी येऊन गेले. मला वाटते, आणखी कुणी नाही.”

त्याने विचारले, “तू समाजात, बाहेर बऱ्याच वेळा, जातोस का?”

आर्थर खूप वेळा जातो. मी व मेरी घरी असतो. आणि त्याची, आम्ही काही पर्वा करत नाही.’

“एका तरुण मुलीसाठी, हे आगळेवेगळे आहे.”

“ती स्वभावाने शांत आहे. शिवाय ती काही, एवढी तरुण नाही. ती चोवीस वर्षांची आहे.”

“हे सर्व जे तुम्ही सांगत आहात ते तिच्यासाठीही, धक्कादायक असेल.”

“खूपच भयानक! तिला तर माझ्याहीपेक्षा, जास्त धका बसला आहे.’

तुम्हाला दोघानाही, तुझ्या मुलानेच हे केले असेल, याविषयी काही शंका नाही?”

“कशी असेल, जेव्हा माझ्या डोळयांनी मी त्याला मुकुट हातात असलेले पाहिले.”

“मी त्याला निष्कर्ष काढण्याइतका, पक्का पुरावा समजणार नाही. उरलेला मुकुट, आधी जसा होता, तसाच होता का?”

“तो वाकडा केलेला होता.”

“मग तुला असे वाटले नाही का, की तो तो सरळ करत असेल?”

“असेच असो. तुम्ही शक्य आहे तेवढे, हे त्याच्यासाठी व माझ्यासाठी करत आहात. मुळात, तो तिथे काय करत होता? जर तो निरागस आहे, तर मग तो तसे सांगत का नाही?”

‘बरोबर. आणि जर तो दोषी असेल तर, तो काही खोटे, शोधून का काढत नाही? त्याचे गप्प रहाणे, मला दोन्ही बंद मार्ग दाखवते. या केसमध्ये, खूपसे अजून मुद्दे आहेत. तुला रात्री झोपेतून उठवणाऱ्या आवाजांबद्दल, पोलिसाना काय वाटते?”

“त्याना असे वाटते, की ते आर्थरने त्याची झोपायची खोली लावताना, झालेले आवाज असतील.”

“वा, काहीही गोष्ट! जणू एखादा माणूस रक्तरंजित गुन्हा करून, मग त्याच्या दाराचा आवाज करून, घरादाराला उठवेल. आणि रत्ने गायब झाली, त्याबद्दल ते काय म्हणतात?”

“ते फर्निचरची तपासणी करून, अजून ते मिळेल, अशा आशेवर आहेत.”

त्यांनी घराबाहेर, ते शोधायचा विचार केला का?”

“हो. त्यात त्यांनी त्यांची, बरीच शक्ती पणाला लावली. सबंध बाग, त्यानी अगदी कसोशीने तपासली.’

होम्स म्हणाला, “माझ्या प्रिय मिस्टर होल्डर, हे प्रकरण खरे तर, तुला किंवा पोलिसांना पहिल्यांदा वाटले, त्यापेक्षा फारच गुंतागुंतीचे आहे, साधे नाही. तुझ्या कल्पनेप्रमाणे काय घडले, ते पाहू. तुला वाटते की तुझा मुलगा, अंथरूण सोडून खाली आला, मोठा धोका पत्करून तुझ्या खोलीत गेला, तुझे कपाट उघडले, मुकुट घेतला, जोर लावून त्याचा एक भाग मोडला, दुसऱ्या कुठल्यातरी जागी गेला, एकोणचाळीसपैकी तीन रत्ने अशा रीतीने लपवून ठेवली की ती कुणालाही सापडू नयेत. आणि नंतर उरलेली छत्तीस घेऊन, स्वतः पकडला जायचा धोका पत्करण्यासाठी, खोलीत शिरला. आता मी तुला विचारतो, असे घडले असण्याची शक्यता, तुला वाटते का?”

तो बँकर हताश होऊन म्हणाला, “पण मग दुसरे काय घडलेले, असू शकते? त्याचे हेतू निरागस असतील, तर तो ते सांगत का नाही?”

होम्स उत्तरला, “ते शोधून काढणे, आमचे काम आहे. तर मग आता मिस्टर होल्डर, आपण एकदमच, स्ट्रीथॅमला जायला निघू. आम्ही एक तासभर जवळून घराचे निरीक्षण करू.”

या शोधमोहिमेत, माझ्या मित्राने मी पण त्याच्याबरोबर यावे, असा हट्ट धरला. मीदेखील त्यासाठी उत्सुक होतो. कारण माझी उत्सुकता व सहानुभूती, आम्ही ऐकलेल्या गोष्टीने, पूर्णपणे ढवळून निघाली होती. आर्थरच्या दुःखी वडिलांप्रमाणेच, मलाही आर्थरच दोषी वाटत होता. पण माझा होम्सच्या अंदाजावर इतका विश्वास होता, की मला असे वाटत होते, की तो या स्पष्टीकरणाने समाधानी नसल्याने, दुसरे काही घडले असण्याची, शक्यताही होती. सबंध वाटेत, त्या उपनगराला पोचेपर्यंत,

तो क्वचित एखादा शब्द बोलला असेल. पण पूर्ण वेळ तो, त्याची हनुवटी छातीत रुतवून व टोपी डोळ्यांवर ओढून बसला होता. विचारात, पार बुडाला होता. आमचा अशील, त्याला दाखवलेल्या आशेच्या किरणांमुळे, ताजातवाना वाटत होता. आधी रेल्वेचा प्रवास व नंतर थोडे अंतर चालून, आम्ही फेअरबँक येथे, त्याच्या निवासस्थानी येऊन पोचलो.

ते घर चौरसाकृती व पांढऱ्या दगडांचे असून, बरेच मोठे होते व रस्त्याच्या मागील बाजूस होते. दोन मोठ्या लोखंडी गेट्सच्या आत, एका बाजूला दोन घोडागाड्या आत जातील, एवढा मार्ग होता. हिरवळीवर, बर्फाचा थर पसरला होता. उजव्या हाताला, एक लाकडी उंचवटा होता व तेथून दोन कुंपणामधून अरुंद रस्ता स्वयंपाकघराच्या दारापर्यंत जात होता. कामानिमित्त येणाऱ्या लोकांसाठी तो आत शिरण्याचा ऑफिसचा रस्ता होता. डावीकडील छोटा रस्ता, तबेल्याकडे जात होता. आणि तो घराचा भाग नव्हता तर सार्वजनिक, पण फार वापरला न जाणारा रस्ता होता. आम्हाला दारात सोडून, होम्स घराच्या सर्व बाजूने फिरला. पुढच्या बाजूला फेऱ्या मारल्या. बाहेरच्या लोकांसाठी असलेली वाट, बघून आला. बागेच्याभोवती व तबेल्यापर्यंत चक्कर मारली. तो इतका वेळ फिरत होता, की मिस्टर होल्डर आणि मी, आत जाऊन शेकोटीजवळ बसलो. आम्ही तिथे शांतपणे बसलो असताना, दार उघडून एक तरुण स्त्री आत आली. ती जराशी उंच, कृश, आणि तिच्या अशक्त शरीरावर उठून दिसणाऱ्या काळ्याभोर केसांची व डोळ्यांची होती. एखाद्या स्त्रीच्या चेहऱ्यावर इतका फिकटपणा, मी पाहिलेला नव्हता. तिचे ओठ, लालचुटुक नव्हते. पण तिचे डोळे, लालसर व पाण्याने भरलेले होते. ती शांतपणे खोलीत जाताना, सकाळी त्या बँकरने मला जेवढे दुःखी बनवले, त्यापेक्षा थोडे जास्तच, उदास करून गेली. ती एक

खंबीर चारित्र्याची व स्वतःच्या भावना काबूत ठेवणारी बाई असूनही, ती एवढी दुःखी होती. माझे तेथील आस्तित्व लक्षात न घेता, ती सरळ तिच्या काकांकडे गेली व त्यांच्या डोक्यावरून स्त्रीचा गोड, प्रेमळ हात फिरवला.

तिने विचारले, "डॅड, तुम्ही आर्थरला तुरुंगातून सोडायचा आदेश दिलात, नाही का?"

"नाही. नाही. बाळे, हे प्रकरण शेवटपर्यंत, तडीस गेले पाहिजे."

"पण तो निरागस असल्याबद्दल, मला पूर्ण खात्री आहे. तुम्हाला माहिती आहे, की हे आम्हा स्त्रियांना सहजप्रवृत्तीने समजते. मला माहिती आहे, की त्याने काहीही केलेले नाही. तुम्ही फार कडकपणे वागल्याबद्दल, तुम्हाला नक्कीच पश्चात्ताप होईल."

"त्याने काही केले नसेल, तर मग तो बोलत का नाही?"

"कोणाला माहीत? तुम्ही त्याच्यावर संशय घेतल्यामुळे, बहुधा तो फार चिडला होता."

"त्याच्या हातात प्रत्यक्ष मुकुट पाहिल्यावर, मी त्याच्यावर संशय घेणार नाही, तर काय करणार?"

"पण त्याने तो फक्त बघण्यासाठी, उचलून घेतला होता. अरेरे, माझे म्हणणे ऐका. कृपया ऐका. तो अगदी, निरागस आहे. काय घडले, ते जाऊदे. ते परतपरत सांगू नका. आपला आवडता आर्थर तुरुंगात आहे, हे भयंकर आहे."

रत्ने परत मिळेपर्यंत, ही केस चालू राहील. मी ती थांबवणार नाही. -- कधीच नाही. मेरी, आर्थरबद्दलचे प्रेम तुला याचा विचार करू देत नाही, की याचे माझ्यावर, किती भयंकर परिणाम होतील. यावर पडदा पाडण्यापेक्षा, याची खोलवर चौकशी करण्यासाठी मी लंडनहून, एका सभ्य गृहस्थाला आणले आहे."

"हेच ते का?" तिने माझ्याकडे चेहरा वळवत म्हटले.

"नाही. त्याचा मित्र. त्याच्या इच्छेप्रमाणे, त्याला आम्ही एकटे सोडले आहे. आता तो तबेल्याजवळ असेल."

"तिथे त्याना काय सापडणार आहे? ओहो, मला वाटते, हे येत आहेत, तेच का ते? मला विश्वास आहे सर, तुम्ही या प्रकरणात यशस्वी व्हाल. पण मला नक्की माहिती आहे, की माझा भाऊ, आर्थर याने गुन्हा केलेला नाही."

"मला तुमचे पूर्णपणे पटते आहे. आपण ते सिध्द करु, असा माझा विश्वास आहे." होम्स आत शिरत म्हणाला व परत गालिच्यावरून मागे जाऊन, त्याच्या बुटावरील बर्फ झटकू लागला.

"मला वाटते, या मिस मेरी आहेत. मी तुम्हाला एकदोन प्रश्न, विचारू शकतो का?"

"नक्कीच सर, त्यामुळे या भयंकर प्रकरणावर, उजेड पडायला मदत होईल."

"काल रात्री, तुम्ही काहीच ऐकले नाही का?"

“माझे डॅड जोरात बोलायला लागेपर्यंत, काहीच नाही. मग मी खाली आले.”

“काल रात्री तुम्ही, खिडक्या दारे बंद केली होती? तुम्ही सर्व खिडक्या घट्ट लावून घेतल्या होत्या का?”

“हो.”

“आज सकाळी, त्या सगळ्या तशाच बंद होत्या का?”

हो.”

“तुमच्या एका नोकराणीचा, कुणी प्रियकर आहे? मला वाटते, तुम्ही तुमच्या डॅडना काल रात्री ती, कोणाला तरी भेटण्यासाठी बाहेर गेलेले असल्याचे, बोललात.”

“हो. आणि ती मुलगी कदाचित हॉलमध्ये थांबून, मुकुटाबद्दलचे बोलणे ऐकत असेल.”

“अस्सं! ती तिच्या प्रियकराला ते सांगण्यासाठी, बाहेर गेली असेल व त्या दोघांनी मिळून चोरीचा बेत आखला असेल, असे तुम्हाला म्हणायचे आहे का?”

तो बँकर अधीरपणे म्हणाला, “पण या सगळ्या खात्रीशीर नसलेल्या तर्कटाचा, काय उपयोग आहे? जर मी तुम्हाला सांगितले आहे, की मी आर्थरला हातात मुकुट असलेले, पाहिले आहे, तर -- “

“मिस्टर होल्डर, एक मिनिट थांबा. आपण त्याकडे येऊच. मिस होल्डर, आता या मुलीबद्दल. मला वाटते, तुम्ही तिला स्वयंपाकघराच्या दाराने आत येताना पाहिले?”

“हो. जेव्हा मी ते दार बंद केले आहे की नाही, हे बघायला गेले, तेव्हा मी तिला, आत येताना पाहिले. अंधारात, एका माणसालाही पाहिले.”

“तुम्ही त्याला ओळखता का?”

“हो. तो आम्हाला भाज्या आणून देणारा, भाजीवाला होता. त्याचे नाव फ्रांसिस प्रॉस्पर आहे.’

होम्स म्हणाला, “तो दाराच्या डावीकडे उभा होता. म्हणजे दाराजवळ नव्हे तर थोडे लांब?

“हो. तसाच.”

“आणि त्याचा पाय लाकडाचा आहे?”

त्या तरुणीच्या बोलक्या काळ्या डोळ्यात, भीतीसारखे काहीतरी उसळले. ती म्हणाली, “तुम्ही तर एखाद्या जादूगारासारखेच आहात. तुम्हाला ते कसे कळले?” ती हसली. पण होम्सच्या बारीक उत्सुक चेहऱ्यावर, उत्तराचे हास्य नव्हते.

तो म्हणाला, “मी आता वर जाऊ इच्छीतो. पण मला वाटते, मी परत एकदा घराभोवती चक्कर मारावी. वर जाण्यापूर्वी मी एकदा, खालच्या खिडकीकडे बघतो.”

हॉलमधून तबेल्याकडे जाताना दिसणाऱ्या वाटेवरच्या खिडकीशी, तो बाहेर फिरताना थांबला. ती उघडून, हातात मोठे शक्तिशाली भिंग घेऊन, त्याने नीट निरीक्षण केले. शेवटी तो म्हणाला, "आता आपण वर जाऊ."

बँकरची झोपायची खोली, थोडेफार फर्निचर असलेली, लहानशी खोली होती. तिथे करडा गालिचा होता व मोठे कपाट होते. होम्स प्रथम कपाटाजवळ गेला व कुलुपाचे निरीक्षण केले.

त्याने विचारले, "हे उघडण्यासाठी कुठली किल्ली वापरली गेली?"

तीच, जिचा माझ्या मुलाने उल्लेख केला होता, -- ती अडगळीच्या खोलीतील कपाटाची किल्ली."

"ती आत्ता इथे आहे का?"

"ती ड्रेसिंग टेबलावर आहे.'

शेरलॉक होम्सने ती उचलली आणि कपाट उघडले.

तो बोलला, "हे आवाजरहित कुलूप आहे. त्यामुळे ते उघडले जाताना तुम्हाला जाग आली नाही. मला वाटते या केसमध्ये मुकुट आहे. आपण केस उघडून, तो पाहिला पाहिजे." त्याने केस उघडून, मुकुट बाहेर काढला व टेबलावर ठेवला. तो बनवणाऱ्याच्या कलेचा, मोठा सुंदर नमुना होता. त्यात छत्तीस रत्ने होती. अशी वस्तू, मी कधी पाहिली नव्हती. मुकुटाच्या एका बाजूला, चीर गेली होती. तेथील तीन रत्ने असलेला कोपरा, गायब केला गेला होता.

होम्स म्हणाला, “मिस्टर होल्डर, आता दुर्दैवाने गहाळ झालेला कोपऱ्याजवळील जो भाग आहे, तो मी तुम्हाला, मोडायला सांगू शकतो का?”

बँकरने उडी मारली व भीतीने थरथरत म्हणाला, “मी असा विचार पण, करू शकत नाही.”

“मग मी करतो.” असे म्हणून होम्सने अचानक, त्याची सर्व शक्ती पणाला लावली. पण काहीच झाले नाही. तो बोलला, “मला वाटते, अजून थोडा जोर लावायला हवा. पण माझ्या बोटात खूप शक्ती असूनही, मला इतका वेळ लागतो आहे. सामान्य मनुष्य, हे करू शकणार नाही. आता मी तो मोडला, तर काय होईल, असे तुम्हाला वाटते, मिस्टर होल्डर? तिथे पिस्तुलाने गोळी मारल्यासारखा आवाज येईल. तू मला असे सांगतोस का, की हे सर्व तुझ्या अंथरुणापासून काही यार्डावर घडले, पण तुला काहीच आवाज आला नाही?”

“मला माहिती नाही, की काय विचार करायचा ते. माझ्यापुढे सगळा अंधारच आहे.”

“तू त्याला पाहीलेस, तेव्हा तुझ्या मुलाने पायात, स्लीपर्स किंवा बूट घातले नव्हते का?”

“नाही. पँट शर्ट सोडून काहीही नव्हते.”

“आभारी आहे. या चौकशीत, आपल्या बाजूने नक्कीच भलतेच जोरात नशीब दिसते आहे. आणि जर आपल्याला यश मिळाले नाही, तर तो निव्वळ आपला दोष असेल. मिस्टर होल्डर, तुझ्या परवानगीने, मी मी आता माझा शोध, बाहेरील बाजूस, चालू ठेवतो.”

एवढे बोलून, तो एकटाच गेला. कारण जरूर नसलेले पायाचे ठसे जर उमटले, तर त्या ठशांमुळे त्याचेच काम, वाढले असते. सुमारे तासभर तो कामात होता. शेवटी त्याचे बर्फाने भरलेले पाय घेऊन तो आला. पण नेहमीप्रमाणे, त्याच्या चेहऱ्यावरून काही अंदाज बांधणे, कठीण होते.

“मला वाटते मिस्टर होल्डर, मी मला पाहिजे ते, सगळे बघितले आहे. मी आता परत जाऊन, मग तुझ्याशी संपर्क साधतो.”

पण मिस्टर होम्स, रत्ने कुठे आहेत?”

“मी सांगू शकत नाही.

बँकरने त्याचे हात एकमेकांवर चोळले व रडक्या सुरात म्हणाला, “मी परत ती रत्ने कधीच पाहू शकणार नाही. आणि माझा मुलगा? तुम्ही मला खोटीच आशा दाखवलीत, बरोबर ना?”

“पण माझे मत, काही झाले तरी बदलणार नाही.”

“मग कृपया मला सांगा, की हा माझ्या घरात घडलेला, अंधारातील खेळ काय होता?’

“जर उद्या सकाळी नऊ ते दहाच्या दरम्यान तू, माझ्या बेकर रस्त्यावरील घरी आलास, तर या घटनेवर उजेड पाडण्यासाठी, मी आनंदाने काही करू शकेन. मला वाटते, की जर मी तुला रत्ने परत मिळवून दिली, तर तुझे काम होईल. त्याबद्दल किती रक्कम द्यायला लागेल, हे ठरवण्याचे स्वातंत्र्य मात्र तू मला दिले आहेस. अच्छा.”

“मला जर ती रत्ने परत मिळाली, तर मी माझे नशीबच समजेन.”

“फार छान. मी या प्रकरणाकडे, नीट लक्ष देतो. अच्छा. कदाचित मला संध्याकाळपूर्वी, इथे परत यावे लागेल.”

माझ्या मित्राने या केसच्या बाबतीत, निर्णय घेतलेला दिसत होता. पण त्याचा निर्णय काय होता, त्याची मी थोडीदेखील, कल्पना करू शकत नव्हतो. बरेच वेळा आमच्या घराच्या दिशेने होणाऱ्या प्रवासात, त्याने मनाशी काय ठरवले आहे, ह्याचा छडा मी लावू शकतो. पण तो नेहमी तो विषय टाळून, दुसऱ्या कुठल्यातरी विषयावर घसरतो. शेवटी निराशेने, मी मला हवा असलेला विषय, सोडून देतो. अजून तीन सुद्धा, वाजले नव्हते. आम्ही पुन्हा एकदा, आमच्या खोलीवर येऊन दाखल झालो. तो त्याच्या ऑफिसमध्ये गेला व एखाद्या रिकामटेकड्या सामान्य माणसाचा वेष करून आला. त्याची कॉलर वर केलेली होती. चकाकणारा गबाळा कोट, लाल टाय व झिजलेले बूट अशा वेषात, तो अगदी त्या खालच्या वर्गातला, शोभत होता.

“हे सोंग चांगले जमले आहे.” शेकोटीवरील आरशात बघत तो म्हणाला, ”फक्त माझी इच्छा आहे की तू माझ्याबरोबर यावेस. वॉटसन, पण मला वाटते, तसे नकोच. मी कदाचित माग काढत चालत असेन. एका व्यक्तीचा पाठलाग करत असेन. आणि लवकरच मला कळेल, की ती कोण आहे. मला अशी आशा आहे, की मी काही तासात परत येईन. त्याने एक मासाचा तुकडा दोन पावाच्या तुकड्यांमध्ये घातला व ते त्याच्या खिशात कोंबत, त्याच्या मोहिमेवर निघाला.

मी माझा चहा संपवतो आहे, तोच तो परत आला. मोठ्या खुशीत दिसत होता. बुटाचे इलॅस्टिक ताणून धरत व सोडून देत, त्याने ते एका कोपऱ्यात फेकून दिले. आणि एक कप चहा घेऊ लागला.

तो बोलला, “मी चालताना त्याला पाहिले. मी पुढेपुढे चाललो होतो.”

“कुठे?”

“ओहो, पश्चिम दिशेच्या टोकाच्या बाजूला. इथे यायच्या आधी, थोडा वेळ असेल. मला उशीर होईल. माझ्यासाठी थांबू नकोस.”

“तुला काही सापडते आहे का?”

ओहो, थोडे फार. पण माझी, काही तक्रार नाही. तुला आधी भेटल्यापासून, मी स्ट्रीथॅमला होतो. पण मी, त्या घरी गेलो नाही. ती एक छोटाशी, गोड समस्या होती. आणि ती मला चुकवायची नव्हती. कारण त्यातून मला बरीच माहिती मिळणार होती. तरीपण मी इथे गप्पा मारत बसत नाही. हे भिकार कपडे मला उतरवले पाहिजेत. आणि माझा नेहमीचा नीटनेटका पोषाख, मला घातला पाहिजे.”

फक्त त्याच्या शब्दांपेक्षा, त्याच्या हावभावातून मला कळत होते, की त्याला परम संतोष झालेला आहे. त्याचे डोळे चमकत होते. त्याचा एरवीच्या फिकट गालांवर, रंग चढला होता. तो लगबगीने, वर गेला. आणि काही मिनिटांनी मी, हॉलचे दार जोरात लावल्याचा आवाज ऐकला. मला कळले की तो परत त्याच्या आवडत्या कामासाठी बाहेर पडला.

मी मध्यरात्रीपर्यंत थांबलो. पण तो काही परत आला नाही. म्हणून मग मी, माझ्या खोलीत जाऊन पडलो. त्याचे हे, काही नवीन नव्हते. जेव्हा तो एखाद्या रहस्याच्या मागावर असे, तेव्हा तो दिवसरात्र त्याच्याच मागे असे. त्यामुळे तो आला नाही तरी, मी काही काळजीत पडलो नाही. मग तो कधी आला, ते मला कळले नाही.

पण मी सकाळी न्याहारीसाठी, जेव्हा खाली आलो तेव्हा तो, एका हातात कॉफी व दुसऱ्या हातात वर्तमानपत्र घेऊन, मोठ्या उत्साहाने बसला होता.

तो म्हणाला, "वॉटसन, मी कॉफी प्यायला सुरवात केली, म्हणून तू मला माफ करशील. पण तुला आठवत असेल, की आपल्या अशीलाला, मी सकाळी लवकरची वेळ दिलेली आहे."

मी उत्तरलो, "नऊनंतरची वेळ दिली आहे. पण तो आला असला तरी, मला नवल वाटणार नाही. मला वाटते मी घंटीचा आवाज ऐकला."

आणि खरंच आमचा अशील, आला होता. मी त्याच्यातील बदल पाहून, अवाक झालो. त्याचा आधीचा रुंद व मासल चेहरा, लहान व पडलेला वाटत होता. केस पण, एका रात्रीत जास्त पांढरे वाटत होते. तो खूप दमलेल्या, पडेल चेहऱ्याने, आत शिरला. ते त्याच्या आदल्या दिवशीच्या सकाळपेक्षा, जास्त दुःखदायक वाटत होते. मी त्याच्याकडे सरकवलेल्या आरामखुर्चीत, तो मटकन बसला.

तो म्हणाला, "मला कळत नाही, की मी एवढा का दमलो आहे. दोन दिवसापूर्वी, मी आनंदी व यशस्वी माणूस होतो. जगाची मला काही पर्वा नव्हती. आता मात्र मी, एकाकी व अपमानकारक अशा अवस्थेत आहे. एकामागून एक काळज्या, मला सतावत आहेत. माझ्या पुतणीने मला एकटे पाडले आहे.'

"एकटे पाडले आहे?"

"हो. आज सकाळी ती झोपते, त्या तिच्या खोलीत नव्हती. तिची खोली, रिकामी होती. आणि हॉलच्या टेबलावर, एक चिठ्ठी पडली होती. मी तिला काल रात्री रागाने नव्हे, पण दुःखाने म्हणालो, की जर तू माझ्या मुलाशी लग्न केले असतेस,

तर त्याचे सगळे भले झाले असते. कदाचित, मी हे अविचाराने बोललो असेन. त्यामुळे बहुधा तिने अशी चिट्ठी लिहिलीः

माझ्या प्रिय काका, मला वाटते, मी तुम्हाला त्रास होऊन राहिले आहे. आणि मी वेगळ्या प्रकारे वागले असते, तर हे एवढे दुर्दैव ओढवले नसते. हा विचार मनात घेऊन, मी आता या घरात कधी आनंदी राहू शकणार नाही. मला वाटते, मी तुम्हाला कायमचे सोडून जायला हवे. माझ्या भविष्याची, काळजी करू नका. कारण तो तुम्ही, मला दिलेला ठेवा आहे. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मला शोधू नका. कारण, ते निरुपयोगी असेल. त्याचा मला त्रास होईल. जिवंतपणी किंवा मेल्यावर, सदैव तुमच्यावर प्रेम करणारी,

'मेरी'

"मिस्टर होम्स, या चिठ्ठीतून तिला काय म्हणायचे आहे? तुम्हाला असे वाटते का, की ती आत्महत्या करेल?"

"नाही. नाही. तसे काही नाही. कदाचित, हाच सर्वात उत्तम मार्ग असावा. मिस्टर होल्डर, मला विश्वास वाटतो, की लवकरच तुझ्या यातनांचा, अंत होईल."

"वा. वा. तुम्ही असे म्हणता! मिस्टर होम्स, तुम्ही काहीतरी, ऐकले असावे. रत्ने कुठे आहेत?"

"तुला असे वाटत नाही ना, की एकेका रत्नासाठी, १००० पौंड एवढी रक्कम फार जास्त आहे?"

मी दहा हजार पौंडदेखील द्यायला तयार आहे."

"त्याची काही जरुरी नाही. तीन हजारनी काम भागेल. आणि मला वाटते, अजून एक चांगली गोष्ट आहे. तुझ्याकडे चेकचे पुस्तक आहे का? इथे हे पेन आहे. ४००० चा चेक लिहिलास तर बरे."

विचार करण्याच्या मनस्थितीत नसलेल्या त्या बँकरने, हवा तसा चेक लिहून दिला. होम्स त्याच्या टेबलाकडे चालत गेला. तीन रत्ने असलेला एक सोन्याचा त्रिकोणी तुकडा काढला व टेबलावर ठेवला.

एक आनंदाची आरोळी मारून, आमच्या अशिलाने तो हस्तगत केला.

तो आश्चर्याने आ वासून बोलला, "तुम्हाला तो मिळाला. मी बचावलो."

त्याचा आनंद, त्याच्या दुःखाइतकाच भावनामय होता. त्याने त्याला परत मिळालेला माल, छातीजवळ कवटाळून धरला.

शेरलॉक होम्स, जरा कडकपणे म्हणाला, "मिस्टर होल्डर, तुझ्यासाठी अजून एक गोष्ट आहे."

तो हातात पेन धरून म्हणाला, "तुम्ही मला आकडा सांगा, मी तुम्हाला ती रक्कम लगेच देतो."

"ते कर्ज माझ्याकडून नाही. तू अगदी नम्रपणे, तुझ्या मुलाची माफी मागितली पाहिजेस. या प्रकरणात तो जसा वागला, त्याबद्दल मला त्याचा, माझा मुलगा असल्यासारखाच, अभिमान वाटतो आहे. मला ती संधी मिळेल का?"

"म्हणजे ती चोरी, आर्थरने केली नव्हती?"

"मी तुला काल म्हणालो होतो व आज परत सांगतो, की नाही."

“तुम्हाला त्याबद्दल, खात्री आहे? तर मग आपण लवकर त्याच्याकडे जाऊन, त्याला सांगू, की आम्हाला सत्य काय, ते कळले आहे.”

“त्याला ते आधीच माहिती आहे. जेव्हा मला सर्व समजले, तेव्हा मी त्याला भेटलो आणि तो मला ही गोष्ट सांगणार नाही, हे माहिती असल्याने, मीच ती त्याला सांगितली. त्यावर त्याला कबूल करावे लागले की, मी बरोबर आहे आणि त्याने मला काही अधिक माहिती सांगितली, की जी मला पूर्णपणे ज्ञात नव्हती. तुमची आज सकाळची बातमी मात्र, त्याला त्याचे मौन सोडायला लावेल.”

“कृपा करून मला सांगा, की हे वेगळ्याच प्रकारचे गूढ, काय आहे?”

‘मी ते करीन व मी तिथपर्यंत कसा पोचलो, हेदेखील तुला सांगीन. पण मला प्रथम तुला हे सांगू दे, की जे माझ्यासाठी सांगायला कठीण आहे. ऐक. तुझी पुतणी व सर जॉर्ज बर्नवेल यांच्यात काही सामंजस्य आहे. ते दोघे एकत्र पळाले आहेत.”

“काय? माझी मेरी? अशक्य!”

“हे दुर्दैवाने खरे आहे. शंभर टक्के, खरे आहे. तुला व तुझा मुलालाही त्याच्याबद्दल, खरी माहिती नाही. जेव्हा तुम्ही त्याला, तुमच्या कुटुंबात सामील करून घेतलेत. तेव्हा कुणालाच, या माणसाचे खरे चारित्र्य, माहिती नव्हते. तो इंग्लंड मधील सर्वात धोकादायक मनुष्य आहे. -- फुकट गेलेला जुगारी, अगदी टोकाचा वाईट खलनायक! या माणसाला हृदय व सद्सदविवेकबुद्धी अजिबात नाही. तुझ्या पुतणीला, अशा प्रकारची माणसे माहिती नाहीत. जेव्हा त्याने तिच्यासमोर, शपथा घेतल्या, तेव्हा त्याने यापूर्वी अशा शेकडो शपथा, दुसऱ्या कुठल्या स्त्रियांसाठी घेतल्या

असणार. तिचा असा समज झाला, की एकट्या तिनेच त्याचे हृदय, जिंकले आहे. त्या राक्षसाला, तो तिला काय म्हणाला, ते चांगले ठाऊक आहे. ती त्याच्या हातातले बाहुले झाली, यात तो खूष होता. आणि ती त्याला रोज संध्याकाळी, भेटू लागली."

उतरलेल्या चेहऱ्याने बँकर म्हणाला, "मी यावर, कधीच विश्वास ठेवणार नाही."

"मग मी तुला तुझ्या घरात, काल रात्री काय झाले, ते सांगतो. तुझ्या पुतणीला जेव्हा खात्रीने असे वाटले की तू तुझ्या खोलीत गेलास, तेव्हा ती हळूच तबेल्याकडे जायच्या बाजूला उघडणाऱ्या खिडकीतून, तिच्या प्रियकराशी बोलली. बर्फात त्याच्या पायाचे ठसे उमटलेले आहेत. तो खूप वेळ, खिडकीशी उभा होता. तिने त्याला, मुकुटासंबंधी सांगितले. सोन्याबद्दलची बातमी ऐकून, त्याची हाव वाढली. त्याने एक बेत आखून त्यात तिला, गोडगोड बोलून, सामील करून घेतले. तुझ्यावर तिचे वडिलांसारखे प्रेम आहे, हे मला माहिती आहे, पण प्रियकराच्या प्रेमापुढे, सगळे काही कवडीमोल ठरले. तिने तो सांगत असलेले सर्व, ऐकले न ऐकले तोच, तिने तुला खाली येताना पाहिले. तेव्हा तिने, घाईघाईने खिडकी बंद केली. तुला घरच्या एका नोकराणीविषयी व तिच्या लाकडी पायवाल्या प्रियकराविषयी सांगितले, जे खरे होते.

तुझा मुलगा, तुझ्याशी बोलल्यानंतर झोपायला गेला, पण त्याच्या क्लबमधील कर्जांमुळे त्याला धड झोप लागेना. मध्यरात्री कोणीतरी त्याच्या दारावरून हळूच चालत गेल्याचा, आवाज त्याला आला. म्हणून तो उठला व मेरीला हळूच तुझ्या झोपायच्या खोलीपर्यंत, चालत जाताना पाहिले. आश्चर्याचा धक्का बसून,

अंगात होते त्याच कपड्यानिशी, सावकाश हळूहळू अंधारातून चालत जाऊन, काय चालले आहे, ते तो बघू लागला. आता ती खोलीतून बाहेर आली होती व पॅसेजमधील दिव्याच्या उजेडात, तुझ्या मुलाने पाहिले की तिच्या हातात मूल्यवान मुकुट आहे. ती जिना उतरून गेली. आणि तो त्या भयानक घटनेने थरारून जाऊन, धावला व तुझ्या दरवाज्याजवळ असलेल्या पडद्यामागे, थबकून उभा राहिला. तेव्हा त्याला खाली हॉलमध्ये काय चालले होते ते दिसले. त्याने मेरीला सावधानतेने खिडकी उघडताना पाहिले. बाहेर अंधारात उभे असलेल्या कुणाला तरी तिने तो मुकुट दिला. मग खिडकी बंद करून, परत घाईने स्वतःच्या खोलीकडे जाताना, त्याने तिला पाहिले. ती त्याच्या अगदी जवळून गेली.

जोपर्यंत तिचे काहीना काही चालू होते, तोपर्यंत तो तिच्याविरुध्द काही करू शकत नव्हता. शिवाय त्याचे, तिच्यावर प्रेम होते. पण ती खोलीत गेल्याबरोबर, त्याच्या लक्षात आले, की हा तुझ्यासाठी किती मोठा धक्का ठरेल व तुझे भविष्य कसे दिशाहीन होईल. आणि मग सर्व काही सुरळीत करायच्या उद्देशाने, तो जसा होता, तसाच अनवाणी पायांनी, खाली धावला. खिडकी उघडली व बाहेर बर्फात उडी मारली. बाहेर धावत सुटला. तिथे त्याला चंद्रप्रकाशात, एक गडद आकृती दिसली. सर जॉर्ज बर्नवेल, पळून जाऊ लागला. पण आर्थरने त्याला पकडले. दोघेजण एकमेकांच्या विरुध्द बाजूने मुकुट ओढू लागले. दोघांमधील मारामारीत, तुझ्या मुलाने जॉर्जच्या डोळ्यावर, पुसटशी जखम केली. नंतर अचानक, काहीतरी ओढले गेले. मग तुझ्या मुलाच्या लक्षात आले, की मुकुट त्याच्या हातात आहे. मग तो धावत घरी आला. खिडकीतून आत उडी टाकली व ती लावून घेऊन तुझ्या खोलीकडे निघाला.

आणि त्याला कळले की मारामारीत मुकुट एका बाजूने वाकडा झाला आहे. त्याने तो सरळ करायचा प्रयत्न केला. तेव्हा तू बाहेर येऊन त्याला पाहिलेस."

बँकर धापा टाकत बोलला, "असे कसे शक्य आहे?"

"जेव्हा तो तुझ्याकडून आभाराची अपेक्षा करत होता, तेव्हा तू त्याला वाटेल ते बोलून, भडकवलेस. तो खरी घटना तुला सांगू शकत नव्हता, कारण त्याला मेरीचे, त्याच्या आवडत्या व्यक्तीचे, नाव बद्दू करायचे नव्हते. मेरीवर, तो थोडी कृपा करू शकत होता. त्याने उदार दृष्टीकोन घेत, तिचे गुपित राखले."

मिस्टर होल्डर किंचाळले, "म्हणूनच तिने मुकुट पाहिल्यावर, ती किंचाळून बेशुध्द पडली. पाच मिनिटाकरता बाहेर जाण्याबद्दल, तो करत असलेली विनवणी मला आठवली. त्या बिचाऱ्याला असे बघायचे होते, की मुकुटाचा तुकडा त्यांची मारामारी झाली तिथे, पडलेला तर नाही ना. किती दुष्टपणे मी त्याला वागवले!"

होम्सने पुढे चालू ठेवले, "मी जेव्हा घरात आलो, तेव्हा मी बर्फात काही माग सापडतो का हे बघण्यासाठीच काळजीपूर्वक सर्व घराभोवती फेरी मारली. आदल्या दिवशी संध्याकाळपासून तिथे काहीही घडलेले नव्हते, हे मला माहिती होते. आणि बाहेर दाट धुके पडलेले असल्याने, बर्फात काही माग असल्यास ते पुसले जाणार नव्हते. मी बाहेरील लोकांसाठी असलेल्या, मार्गाने गेलो. मला तो दबला गेलेला व विस्कटलेला वाटला. त्याच्या थोडे पलीकडे, स्वयंपाकघरापासून लांब अंतरावर, एक बाई उभी राहून, एका माणसाशी बोलत होती. त्या माणसाचा एक पाय लाकडाचा असल्याचे मला कळले. ते थोडे त्रासलेले होते, हेदेखील मला कळले. कारण ती बाई, भरभर धावत दाराशी आली. खोल रुतलेले लाकडी काठीचे ठसे व साधे पायाचे ठसे

हे सर्व काही दर्शवत होते. लाकडी पायवाला माणूस थोडा वेळ थांबून निघून गेला. मला त्यावेळी असे वाटले, की तू ज्या बाईबद्दल माझ्याशी आधी बोलला होतास, तीच ही नोकराणी व तिचा प्रियकर असतील. चौकशीत देखील ते पक्के झाले. बर्फात जिथेतिथे असलेल्या खुणा सोडून, इतर काही मला बागेत दिसले

नाही. मला त्या खुणा, पोलिसांच्या वाटल्या. पण मी जेव्हा तबेल्याच्या येथील वाटेने गेलो, तेव्हा मला मोठी लांबलचक गोष्ट, तिथे बर्फात घडल्याचे, लक्षात आले."

कुणा बूट घातलेल्या माणसाचा दुहेरी ओळीचा माग तिथे दिसत होता. अजून दुसरी एक दुहेरी ओळ दिसत होती ती अनवाणी पाऊलांची होती. तू मला जे सांगितलेस, त्यावरून माझ्या चटकन लक्षात आले, की तो अनवाणी पायांचा माणूस म्हणजे तुझा मुलगा. बूटवाला माणूस आल्याच्या व गेल्याच्याही खुणा होत्या. पण तुझा मुलगा, जोरात बूटवाल्या माणसाच्या मागे धावला असल्याचे, ठशांवरून स्पष्ट होत होते. त्यांचा माग काढल्यावर त्या खुणा हॉलच्या खिडकीपर्यंत, गेल्याचे कळले. खिडकीखालील बर्फ, बराचसा निघून गेलेला दिसला. त्यावरून कोणीतरी इथे बराच वेळ उभे असणार, असा अंदाज करता आला. मग मी जवळजवळ शंभर यार्ड इतके अंतर, दुसऱ्या टोकाला एका गल्लीतून गेलो. मला तिथे बूट एकाच जागी गोलगोल फिरलेले दिसले. तिथे विखुरलेला बर्फ बघून मला कळले की इथे काहीतरी मारामारी झाली असावी. तिथे थोडे रक्ताचे थेंब देखील दिसले. म्हणजे माझा मारामारीचा अंदाज, खरा असल्याचा पुरावाच, मला सापडला. मग बूट गल्लीत लांबवर गेलेले दिसले व तिथेही थोडे रक्त सांडलेले दिसले. म्हणजे बूटवाल्या माणसाचे ते रक्त होते.

रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला मात्र, सर्व पदपथ स्वच्छ दिसत होता, म्हणजे इथे काही घडलेले दिसत नव्हते.

पण घरात शिरल्यावर, तुला आठवत असेल, मी हॉलच्या खिडकीची, माझ्याकडील भिंगाने तपासणी केली. तेव्हा, मला लगेच कोणीतरी इथून बाहेर गेल्याचे, कळले. आत येणाऱ्याचा ओला पाऊलाचा ठशाचा आकार मी बघून ठेवला. मग मी माझ्या मनाशी काय घडले असेल याचा, अंदाज बांधू लागलो. एक मनुष्य खिडकीबाहेर थांबलेला असतो. कोणीतरी त्याला मुकुट आणून देतो. हे तुझा मुलगा बघतो. तो चोराच्या मागे धावतो. त्याच्याबरोबर मारामारी करतो. त्यांच्यात मुकुटाची खेचाखेची होते. बहुधा, दोघाना जखमाही होतात. तुझा मुलगा मुकुट घेऊन परत येतो. परंतु मारामारीत मुकुटाचा एक तुकडा, त्याच्याशी भांडणाऱ्याकडे जातो. इतका अंदाज मी करू शकलो. आता प्रश्न असा होता की हा मनुष्य कोण होता व मुकुट परत आणणारा, नक्की कोण होता?

हा माझा एक जुना अंदाज आहे की जेव्हा अशक्य असे काही तुम्ही वगळता, मग ते काहीही असो, तेच सत्य असते. आता मला हे माहिती आहे, की तू काही तो मुकुट खाली आणला नाहीस. मग आता उरले कोण तर तुझी पुतणी व नोकर मंडळी. पण जर नोकर स्त्रिया असतील तर तुझ्या मुलाला, त्यांच्याबद्दल स्वतः शिव्याशाप झेलायचे काय कारण? त्यामुळे तसे नसावे. त्याचे मेरीवर प्रेम होते. म्हणून त्याने, तिचे गुपित न फोडता, तिला पाठीशी घातले असावे. कारण हे गुपित लाजिरवाणे होते. मला आठवले, की तू मेरीला खिडकीशी पाहिले होतेस. आणि मुकुट घरात पाहून, ती चक्कर येऊन पडली होती. मग माझा अंदाज खात्रीत बदलला.

मग प्रश्न उरला, की चोरीतील तिचा साथीदार, कोण होता? प्रियकराशिवाय कोणासाठी, ती तुझ्याबद्दल तिला वाटणारे प्रेम व ऋण, धुडकावून टाकणार? मला माहिती आहे, की तू फारसा बाहेर जात नाहीस व तुझी मित्रमंडळी मोजकीच आहेत. सर जॉर्ज बर्नवेल हा त्यापैकी एक आहे. मी यापूर्वी, त्याची बायकांच्या बाबतीतली वाईट कीर्ती, ऐकली होती. तेव्हा तो बूटवाला, तोच असला पाहिजे व त्याच्याकडेच ते तीन रत्ने असली पाहिजेत, असा अंदाज मी केला. जरी त्याला माहिती होते की आर्थरला तो सापडलेला आहे, तरी तो सुरक्षित आहे, असे त्याला वाटत होते. कारण आर्थर स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तीची, बदनामी करायला कचरेल.

तू आता चाणाक्षपणे जाणू शकतोस, की मी पुढे काय केले असेल. मी एका रिकामटेकड्या सामान्य माणसाच्या वेषात, सर जॉर्जच्या घरी गेलो. त्याच्या नोकराशी, ओळख वाढवली. त्याच्याकडून मला माहिती मिळाली, की त्याच्या मालकाला, आदल्या रात्री डोक्याला लागले होते. शेवटी पाच शिलिंग खर्च करून, त्याच्या मालकाचे खराब झालेले बूट मी विकत घेतले.. एवढ्या कारवाईनंतर, मी स्ट्रीथॅमला आलो व त्याच बुटांचे ते ठसे असल्याची खात्री केली.

मिस्टर होल्डर म्हणाले, “काल मी गल्लीत एक फाटके तुटके कपडे घातलेला भटक्या माणूस पाहिला.”

“बरोबर. तो मीच होतो. मला चोर कोण होता, हे खात्रीपूर्वक कळल्याने, मी माझ्या घरी जाऊन कपडे बदलले. मग मला एक नाजूक काम करायचे होते. ते म्हणजे मला हे प्रकरण कोर्टात जाऊ द्यायचे नव्हते. मला माहिती होते, की तो चलाख

खलनायक समजेल, की घराण्याची अब्रू वाचवण्यासाठी, आपले हात बांधले गेले आहेत. मी जाऊन त्याला भेटलो. अर्थात आधी त्याने सर्व काही, अमान्य केले. पण जेव्हा मी घडलेली प्रत्येक बारीकसारीक गोष्ट त्याला सांगितली, तेव्हा त्याने मोठमोठ्याने बडबड करायला सुरवात करून, जवळच्या भिंतीतून माझ्यावर हल्ला करण्यासाठी, एक शस्त्र काढले. मला त्याचा अंदाज असल्याने, त्याने मला काही करण्यापूर्वी, मी ताबडतोब माझे पिस्तुल त्याच्यावर रोखले. मग तो जरा, ताळ्यावर आला. मी त्याला म्हटले, की आम्ही तुला, तुझ्याकडे असलेल्या रत्नांची, १००० पौंड प्रत्येकीप्रमाणे, किंमत देऊ. तेव्हा कुठे त्याने पहिल्यांदा, त्याला दुःख झाल्याचे दाखवले. तो म्हणाला, "का? मी ते सहाशे पौंडाला तीन असे विकून टाकले."

मी लगेचच त्याच्याकडून, त्याने ते कोणाला विकले, त्याचा पत्ता घेतला व त्याला खात्रीपूर्वक सांगितले, की हे प्रकरण कोर्टात जाणार नाही. मग मी त्याच्याकडून घेतलेल्या, पत्त्यावर गेलो. बरीच घासाघीस केल्यावर, मला ती तीन रत्ने ३००० पौंड खर्च करून मिळाली. मग मी तुझ्या मुलाला भेटलो. त्याला सर्व सांगितले. आणि या सगळ्या धावपळीनंतर, शेवटी रात्री दोन वाजता अंथरुणाला पाठ टेकवली."

बँकर उठत म्हणाला, "आजच्या दिवशी इंग्लंड, मोठ्या सार्वजनिक मानहानीकारक प्रकरणातून, सुटले. सर, आपले आभार मानायला माझ्याकडे शब्द नाहीत. पण मी यापुढे, कायम तुमचा ऋणी राहीन. मी ऐकले होते, त्यापेक्षा तुमचे चातुर्य काहीच्या काहीच, जास्त आहे. आणि आता मला मी जे काही चुकीचे वागलो आहे, त्याबद्दल माफी मागण्यासाठी, माझ्या मुलाला गाठले पाहिजे. तुम्ही मला

बिचाऱ्या मेरीबद्दल, जे काही सांगितले, त्यामुळे माझे हृदय शतशः विदीर्ण झाले आहे. आता ती कुठे आहे, कुणास ठाऊक?"

होम्स बोलला, "मला वाटते आपण असे म्हणू शकू, की जिथे सर जॉर्ज बर्नवेल असेल, तिथेच ती असणार. पण हे नक्की आहे, की तिने केलेल्या पापांबद्दल, तिला पुरेशी शिक्षा मिळेलच."

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची पंधरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, वृषाली जोशी यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान